मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

वर्षा अंक

वर्ष सहावें — अंक सहावा — किंमत आठ आणे

★

पत्रव्यवहाराचा पत्ता :
"युगवाणी" कार्यालय
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रोड
धंतोली, नागपूर १.

शैली आणि शैलीकार

डॉ. के. ना. वाटवे

★

ललित वाङ्मयाचें माध्यम भाषा आहे हें 'वाक्+मय' या वाङ्मयाच्या व्युत्पत्तीवरूनच उघड आहे. पण ही भाषा कोणती? रोजच्या दैनंदिन व्यवहारांत आपलें मनोगत प्रकट करण्यासाठी आपण वापरीत असतों ती कां तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास इत्यादी शास्त्रांच्या विवेचनासाठी शास्त्रज्ञांनी उपयोजिली असते ती? कां कथा-कादंबऱ्या, काव्य-नाटकें इत्यादींमध्ये लेखकांनी वापरलेली असते ती? कां डॉ. जान्सन्, कार्लाइल्, जॉर्ज मेरिडिथ, 'किरात' कर्ता भारवी, 'अभंग वाणीचा उद्गाता तुकया, पंडित जगन्नाथराय, 'माला'कार विष्णुशास्त्री, काळकर्ते शिवरामपंत परांजपे, सानेगुरूजी इत्यादी लेखकांच्या व्यक्तिमत्त्वानें मुद्रित झालेली? वस्तुतः एकच भाषा या चारीहि ठिकाणीं आहे. मराठीचेंच उदाहरण घ्यावयाचें तर महाराष्ट्रांत आपण रोजच्या व्यवहारांत वापरतों तीच सर्वजनसमान मराठी भाषा 'गीतारहस्य' 'हिंदूंचें समाजशास्त्र' केतकरांचा'ज्ञानकोश' इत्यादि ग्रंथांत आहे. तिच्यांतच तांबे, गडकरी, कोल्हटकर, अत्रे, फडके, खांडेकर, माडखोलकर यांनी आपलें मनोगत व्यक्त केलें आहे व विष्णुशास्त्री, तुकाराम, परांजपे, साने गुरुजी इत्यादि मंडळी तीच मराठी योजतात. तेव्हा प्रश्न असा येतो कीं एकाच मराठी भाषेच्या या चार प्रकारां पैकी नेमका कोणता प्रकार मराठी ललित वाङ्मयाचें माध्यम आहे? या चार प्रकारांतील फरक कोणता? व तो कां पडतो? या प्रश्नांचीं उत्तरें जिला आपण शैली असें मराठींत, style असें इंग्रजींत, किंवा 'रीति' असें संस्कृतांत संबोधितों तिच्या विचारांत येतात.

एकाच भाषेचे वरील चार प्रकार ती भाषा वापरणाऱ्या व्यक्ति व त्यांचे उद्देश यांमुळे उत्पन्न होतात. या चार व्यक्ति म्हणजे सर्वसामान्य व्यवहारी माणूस, शास्त्रज्ञ, ललित लेखक व व्यक्तिमत्त्वसंपन्न ललित लेखक या होत. पहिल्याचा उद्देश सामान्य व्यवहार चालविण्याचा असतो. दुसऱ्याचा 'जग जसें आहे तसें' निश्चित व काटेकार शब्दांत–स्वत्व, भावना किंवा कल्पना यांचा स्पर्शहि त्यांना कोठे न होईल अशा बेतानें व केवळ आपली तर्कनिष्ठ बुध्दि चालवून दाखविण्याचा असतो. तिसऱ्याचा उद्देश 'जग आपल्यास दिसतें तसें" दाखविण्याचा म्हणजे मानवी इच्छा-आकांक्षांच्या दृष्टीने मानव व त्याच्या भोंवतालचें जग यांचा आपण काय अर्थ केला, त्यांचें कोणतें मूल्यमापन केलें हें आपलें स्वत्व, आपल्या भावना, आपल्या कल्पना व आपली बुद्धि वापरून व्यक्त करण्याचा असतो. सामान्य ललित लेखकाचें स्वत्व सामान्यपणे इतरांच्या स्वत्वाशी बव्हंशीं जुळणारे असूं शकतें. पण

व्यक्तिमत्त्व संपन्न लेखकाचा दृष्टिकोण खास त्याचाच असून तो आपल्या विशिष्ट

मनोवृत्तीने व भाषेवरहि आपला ठसा उमटवून त्याचें प्रकटीकरण करतो. म्हणून चवथ्याचा उद्देश आपल्याला दिसलेलें जग, खास आपल्या मनोवृत्त्यनुरूप व खास आपल्या भाषेनेहि दाखविण्याचा असतो. एकच भाषा वापरणारे हे चौघेजण आपापल्या विशिष्ट उद्देशानुसार एकाच भाषेचा वापर करूं लागले कीं तिचें रूप कसें पालटतें तें पाहाण्यासारखें आहे.

व्यवहारी माणसाची भाषा, साधी प्राय: वाच्यार्थ व्यक्त करणारी, क्वचित् भावना कल्पना व बुद्धि यांनी स्पर्शिलेली म्हणून संमिश्रस्वरूपाची, शिथिल, मोंगळ पुनरुक्तिमय, घासून घासून गुळगुळीत झालेल्या नाण्यासारखी, सर्व-जन-समान व साधें मनोगत व्यक्त करण्यासाठीच वापरलेली असते. सामान्यलोकांच्या चातुर्याने म्हणा किंवा ललित लेखकांच्या भाषाप्रयोगाच्या अनुकरणाने म्हणा तिच्यातहि कांही लाक्षणिक व्यंग्य, अर्थ, काव्यालंकार वगैरे आलेले असतात. पण तिचें असें विशिष्ठ रूप निश्चित नाहीं. शास्त्रज्ञाची भाषा काटेकोर, निश्चित अर्थ व्यक्त करणारी, तर्क प्रधान, भावना व कल्पना यांचा स्पर्शहि नसलेली, वस्तुनिष्ठ, केवल सत्यस्वरूप दर्शविणारी असते. जिच्याविना 'तिन्ही जगांचा स्वामी भिकारी' वाटतो त्या भक्तिविषयभूत 'आई'ची व्याख्या एखादा नैय्यायिक पुढील प्रमाणे करील—'गर्भधारण, प्रसूति इत्यादि स्त्रीत्वसामान्य गुणधर्मांनी युक्त मानवव्यक्तिविशेष' 'पानपतच्या संग्रामराक्षसाने दख्खनची सव्वालाख बांगडी फोडली' असें न म्हणतां 'पानपतच्या लढाईत सुमारे सव्वालाख महाराष्ट्रीय शिपाई मरण पावले' असें एखादा निर्लेप वृत्तीचा इतिहासकार म्हणेल. उत्प्रेक्षा, दृष्टान्त, विरोध-असंगती इत्यादी अलंकार खरा शास्त्रज्ञ टाळील. किंवा उपमेसारख्या अलंकार शिरोरत्नाला काव्यसंपदेच्या सर्वस्वाला किंवा ललित लेखकांच्या साक्षात् मातेला सुद्धा जॉन् लॉकसारखा एखादा तत्त्वज्ञ आपल्या लिखाणांतून हद्दपारहि करील.

ललितलेखनाचें माध्यम म्हणून वापरलेली भाषा ही वरील दोन प्रकारची नसते. उरलेले दोन प्रकारच 'शैली व शैलीकार' या विषयाच्या विवेचनांत मुख्यत्वे करून अभिप्रेत आहेत. 'मुख्यत्वे करून, प्राय:' वगैरे सावधगिरीचे शब्द घालण्याचें कारण व्यवहारी माणूस, शास्त्रज्ञ, ललित लेखक व व्यक्तिमत्त्वसंपन्न ललित लेखक हे नेहमीच आपापल्या भूमिका अगदीं काटेकोरपणे सांभाळूनच लिहितील असें नाहीं. पहिले दोन क्वचित् दुसऱ्या दोघांची तर दुसरे दोघे क्वचित् पहिल्या दोघांची भूमिका घेतील. व्यक्तिपरत्वे असें होईल. म्हणून ही क्षेत्रविभागणी किंवा हा भूमिका-भेद स्थूलमानाने कल्पिला आहे असें समजावें.

डॉ. जॉन्सन्, मेकॉले, कार्लाईल, विष्णुशास्त्री इत्यादि लेखक हे केवळ ललित लेखक नव्हेत. असें असूनहि त्यांना शैलीकार म्हणण्यांत येतें त्याचें कारण त्यांचें लिखाण संपूर्णतया वस्तुनिष्ठ नाही. कोठेना कोठें तरी त्यांचें स्वत्व किंवा व्यक्तिमत्त्व सारखें डोकावतच असतें. म्हणून ज्या लिखाणांत लेखकाचें स्वत्त्व उठून दिसत असेल तें लिखाण-मग तें ललित किंवा ललितेतर असो, लिहिण्याच्या पद्धतीला शैली किंवा style हें नांव देण्यांत येतें. सर्वच ललित लेखकांनाहि स्वत्व प्रगट करतां येतें असें नाही. म्हणून अन्वय-व्यतिरेकानें स्वत्व प्रकटीकरणयुक्त लिखाण हाच शैलीचा खास विषय होय, व असलें लिखाण त्यांतल्यात्यांत ललित वाङ्मयाचें निर्मात्याकडून होत असतें. म्हणून ललित वाङ्मयाची भाषा हा शैलीच्या विचाराचा मुख्य विषय ठरतो.

ललित वाङ्मयाच्या भाषेचा-शैलीचा-विचार करावयाचा तर त्याच्या अगोदर ललित लेखकाच्या स्वभावाचा व मनःस्थितीचा विचार केला पाहिजे. कारण ललित वाङ्मयाची भाषा ही ललित लेखकाच्या स्वभावाची व त्याच्या मनःस्थितीचीच निदर्शक असते. मग तो ललितलेखक भावकवि असल्यास तो आपलें मनोगत आपल्याच शब्दांत व्यक्त करो, किंवा नाटककार, महाकवि, कादंबरीकार किंवा कथालेखक असल्यास तो आपल्या पात्रांच्या द्वारे आपलें मनोगत बोलून दाखवो. शैलीविचारांतील ह्या महत्त्वाच्या बाबींकडे भरतमुनींपासून सर्वांचें लक्ष कमी अधिक प्रमाणांत आहे. नटानें आपलें मनोगत सात्त्विक, वाचिक आंगिक व आहार्य अशा चार अभिनयांनी व्यक्त करावें अशी भरताची योजना आहे. (ना. शा. ६-२४) यांतील सात्त्विक अभिनय म्हणजे करुण, भयानक, वीर इत्यादि रसांच्या आविष्करणापूर्वी नटानें आपल्या मनोभावनांची करावयाची योग्य ती पूर्वतयारी होय. आणि वाचिक अभिनय म्हणजे त्या त्या भावनांना अनुकूल अशी शब्दयोजना करणें होय. तसेंच भरतानें भारती, सात्त्वती वगैरे नटांच्या चार वृत्ति (आविर्भावाचे प्रकार) सांगितल्या आहेत [ना. शा. २०-६२] त्यांचाहि संबंध नटांच्या आंगिक अभिनयांतील भूमिकासदृश भावनाविष्काराशींच आहे. याच वृत्ती जेव्हा वाचिक अभिनयांत व्यक्त झाल्या तेव्हा त्यांना रीतींचें स्वरूप आलें व पुढे काव्य प्रकाशकाराचे काळीं तर त्यांनी रीतींचीच जागा घेतली (का. प्र. ९ पहा). रीतींना वृत्तीचें स्वरूप यावें हें कोणास बरें वाईट वाटो. आपल्याला येथे पहावयाचें तें हें कीं मुळांत दोहोंचाहि संबंध भावनाविष्काराशींच होता. पुढे 'रीति' हें निश्चित नांव जिला पडलें त्या विशिष्ट पदरचनेचीं' बीजें भरतानेंच आपल्या लक्षणें, अलंकार, गुण व दोष यांच्या विवेचनांत पेरून ठेविली आहेत [ना. शा. १६]. व मुख्य म्हणजे त्या साऱ्यांचा संबंध त्यानें रसांशीं लाविलेला आहे. [१६-४-११३ पहा]

वामन हा रीतिमताचा मुख्य प्रवर्तक असला तरी तिचें विवेचन भामह व दण्डी, या तत्पूर्व व रुद्रट, आनंदवर्धन, कुन्तल, मम्मट, विश्वनाथ इत्यादि तदुत्तर ग्रंथकारांनी केलें आहे. वामन व तत्पूर्व ग्रंथकार यांची मुख्य मदार विशिष्ट पदरचनेवर आहे. पण हें पदरचनेचें वैशिष्ट्य ज्या गुणांमुळे येतें त्या गुणांचें मानसशास्त्रीय विवेचन त्यांनी केलें नाही. गुणांचीं नांवें व त्यांनीं युक्त पदरचनेचीं उदाहरणेंच त्यांनी दिलीं. त्यामुळे त्यांचें रीतिविवेचन Diction च्या स्वरूपाचें झालें. त्या काळांत रसमत थोडेसें मागेंच पडल्यासारखें झालें होतें. पण पुढे रुद्रटानें रीतींचा संबंध रसांशी लावला व आनंदवर्धनापासून तर रसध्वनि हेंच मुख्य काव्य तत्त्व मानलें गेल्यानें रीति विचार योग्य मार्गावर आला. मम्मटानें तर शैली विचारांतील गुणांना मानसशास्त्रीय अधिष्ठान दिलेलें आहे. पण दण्डी-पासून जगन्नाथापर्यंतच्या ग्रंथकारांमध्ये एक आश्चर्यकारक जाणीव दिसते, ती ही कीं, ' रीति ही कविस्वभावाची द्योतक असते ' ही गोष्ट त्यांनी मुद्दाम नमूद केली आहे. याचें विवेचन प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनी आपल्या 'वैदर्भी रीति' या निबंधांत केलें आहे तें अवश्य वाचण्याजोगें आहे.

वरलि जाणीवेला मीं आश्चर्यकारक म्हटलें याचें कारण असें कीं संस्कृत काव्यशास्त्रांतील रीति संकट बहुतेक सारा विचार रसिक-निष्ठ आहे; कविनिष्ठ नाही. होतकरू कवीस, फार झालें तर, काव्यरचनेचें मार्गदर्शन करणें हाहि

त्यांतील दुसरा हेतु असावा. म्हणून संस्कृत ग्रंथकार रीतिविवेचनांत कवि-मनाचें विश्लेषण करीत न बसतां त्यांनी योजलेल्या शब्दांचें व रचनेचें सोदाहरण विवेचन करतात आणि 'रीति विचार' तर कविस्वभावाचें वैशिष्ट्य व त्याची विशिष्ट मनःस्थिति या गोष्टींच्या साहाय्यावांचून होणें अशक्य. त्यांतून प्राचीन संस्कृत कवि व त्यांची परिस्थिति यांचें ज्ञान आपल्याकडील साहित्यशास्त्रकारांना जवळजवळ नव्हतें. अशा परिस्थितींत संस्कृतांतील रीतिविचाराबद्दल कोणाचा गैरसमज झाला असल्यास तो अगदींच अयोग्य होता असें म्हणतां यावयाचें नाही. म्हणून या गैरसमजाचें निराकरण आज उपलब्ध असलेल्या सामग्रीवरून जेवढें करता येणें शक्य आहे तेवढें येथे करण्याचें योजिलें आहे. यासाठी केवळ काव्यावरूनच कविस्वभाव (किंवा आजच्या भाषेंत कवीचें व्यक्तिमत्त्व) व त्याची मनःस्थिति यांचें विवेचन पाश्चात्य विचार जमेस धरून करूं.

पाश्चात्य टीकाकारांत सुद्धा शैलीचा विचार दण्डी–वामनाप्रमाणेच करणारे कांही होते हे पुढील शैलीच्या (style) व्याख्यांवरून दिसून येईल. कोलेरिज व जॉन्सन् हें दोघे आपल्या काव्याच्या लक्षणांत अनुक्रमे शब्दांच्या योग्य रचनेवर व तालबद्धतेवरच जोर देतात. हें त्यांच्या 'the best words in the best order' किंवा 'poetry is musical composition' या व्याख्यांवरून स्पष्ट होईल. स्विफ्टने तर 'proper words in proper places make the true definition of style' असें म्हटलें आहे. 'style is the dress of thought' हीहि व्याख्या एकाने केली आहे. 'the right vocabulary' ही पेटरची कल्पना आहे. पण कांही व्याख्यांतून style चा विचार प्रगत झाल्याचें दिसतें. 'style is not the coat of a writer, but it is rather his skin' ही कार्लाइलची व्याख्या व पेटरने केलेलें 'right vocabulary चें पुढील विश्लेषण (vocabulary faithful to the coloring of his own spirit and in the strictest sense original and absolutely proper to the single mental presentation or vision within) यावरून style चा कविमनाशी संबंध जोडला गेला. व शेवटीं बुफॉन् जॉर्जेसने तर लेखक व शैली यांचें आपल्या व्याख्येंत (style is the man) संपूर्ण ऐक्यच कल्पिलें. यावरून पाश्चात्य शैली-विचारांतील विकासाची किंचित् कल्पना होईल.

आपल्या कडील गुणाविचार हा शैलीच्या मानसशास्त्रीय विवेचनाचा पाया आहे. पण त्याचें तसें दिग्दर्शन प्रथम आनंदवर्धन व शेवटी मम्मट यांशिवाय कोणी केलें नाही. त्यांच्या विवेचनाचा रोख ध्यानीं घेऊन गुण म्हणजे काय तें येथे स्पष्ट करूं. मम्मटानें माधुर्य, ओज व प्रसाद हे तीनच गुण मानले व मुख्य म्हणजे त्यांचें कार्य–म्हणजे रसिकाच्या चित्तवृत्तींवर होणारा परिणाम म्हणजे अनुक्रमे द्रुति, दीप्ति व विस्तार ह्या मानसिक अवस्था सांगितल्या. आमच्याकडील रीतिविचार रसिकनिष्ठ असतो असें वर म्हटलेंच आहे. त्यामुळे ही मांडणी त्याने केली. पण कवि व समानधर्मी रसिक यांची मनःस्थिति एकच असते (कविस्तु सामाजिक तुल्य एव) या अभिनवगुप्ताच्या सर्वमान्य सिद्धान्ताप्रमाणे आपण असें म्हणूं शकतों कीं माधुर्य, ओज व प्रसाद या गुणांनी युक्त रीति निर्माण करणाऱ्या कवीची ज्ञानतंतुसंस्था (Nervous system) सुद्धा द्रुति, दीप्ति

व विस्तार या अवस्थांनी युक्त असलीच पाहिजे. जें कारणांत असेल तेंच कार्यांत दिसेल. आतां कविमनाची तरी द्रुत, दीप्त किंवा विस्तृत अशी अवस्था कां होतें ? तर त्याचें उत्तर कवीच्या मनांत त्या त्या प्रसंगीं शृंगार, वीर किंवा शान्त-भक्ति या रसांना कारणीभूत होणाऱ्या भावना उत्कट झालेल्या असतात. म्हणून हें मानसशास्त्रीय सत्य ध्यानी आणून गुणांचें कविमनःस्थित स्वरुप पुढील प्रमाणे सांगतां येईल. प्रथम कवीच्या मनांत शृंगारादि रसांची भावना उद्दित होते. तिच्यामुळे त्याच्या ज्ञानतंतुसंस्थेमध्ये क्षोभ उत्पन्न होतो व तो त्याच्या शरिरावरहि परिणाम करतो. अशा मानस शारिर [psycho-physical) अवस्थेंत त्यांच्या लेखणींतून विशिष्ट पदें व त्यांची विशिष्ट रचना बाहेर पडते. कवीच्या मनः-स्थितीशी असा संबंध असण्याचा जो पदरचनेचा धर्म त्यालाच ‘ गुण ’ म्हणावें. भोजानेहि गुणांचा व रीतींचा (कवीच्या किंवा पात्राच्या) अनुभावांतच समावेश केला आहे. गुणरीतिंना अनुभाव (expressions of the emotjon) म्हणणें हें संस्कृत शैली विचारांतील मर्मच सांगण्याप्रमाणे आहे. माणूस रागावला, दैन्य भाकूं लागला, लाडांत आला, भ्याला किंवा आश्चर्यचकित झाला म्हणजे त्याच्या चर्येत, हावभावांत, आवाजांत, डोळ्यांत एकदम फेरबदल होतो. अशा वेळीं तो जर कांही शब्दयोजना करुं लागेल तर तिच्यांतहि वरीलप्रमाणे फेरबदल होईलच. अशी बदललेली शब्दयोजना म्हणजे रीति होय असा भोजमताचा आशय आहे. बोलणाऱ्याच्या मनोवृत्त्यनुसार भाषेंतहि बदल होतो हें तत्व शैली विचारांत ॲरिस्टॉट्ल-नेहि सांगितलें आहे.

मम्मटाने सांगितलेलें शैली विचारांतील दुसरें तत्त्व म्हणजे ‘ माधुर्यादि गुण सामान्यपणे उचित वर्णांनी व्यक्त होत असले तरी ते केवळ वर्णांवरच सर्वस्वी अवलंबून नसतात. ’ (माधुर्यादयो रसधर्माः समुचितैववर्णैर्व्यज्यन्ते, नतु वर्णमात्राश्रयः । का. प्र. ८–६६) यामुळे अमुक वर्णांनी अमुक रस निर्माण होतो, तमक्या गाढ, किंवा शिथिल रचनेने तमुक गुण साधतो असल्या वामनादींच्या निबंधलेखन-पद्धतीच्या बाह्य नियमांना आळा बसून शैली विचारांत मनःस्थिति व स्वभाव यांचें महत्व प्रस्थापित झालें. मम्मट गुणांना रसधर्म मानतो; व गुण हे वर्णविशेष नसून चित्तवृत्तिविशेष आहेत असा त्याचा स्पष्ट अभिप्राय आहे. मल्लामोठ्या धिप्पाड शरीरावरूनच एखाद्यास शूर मानणें व कृश शरीरावरुन दुसऱ्यास नेभळट समजणें जितकें समंजस तितकेंच केवळ वर्णांवरुन गुण ठरविणें होय असें त्याचें मत आहे ! यांतून एक ध्वनि निघतो तोहि लक्षणीय आहे. शकारासारखा एखादा रानवट व उद्धट माणूस आपली शृंगारभावना वसंतसेनेला शेलक्या दहा शिव्या देऊन (पहा. मृ. १-२३) व्यक्त करतो, श्रीकृष्ण आपला शिशुपालावरील राग फार सौम्य पण मोजक्या शब्दांनी व्यक्त करतो, व धर्म किंवा भीष्मासारखे धीरोदात्त पुरुष आपला शोकहि संयमाने व्यक्त करतात. अशावेळी शैलींतील शब्दयोजनेचें धोरण वर्णांवर ठेवण्यापेक्षा त्या त्या पुरुषांच्या स्वभावावर व त्या स्वभावानुरूप असणाऱ्या त्यांच्या मनोवृत्तीवरच ठेवणें अधिक युक्त होईल. नीलकंठ दीक्षिताने आपल्या ‘ गंगावतरण ’ काव्यांत शैलीची (तिला तो मार्ग किंवा पंथाः म्हणतो) एक लक्षणीय व्याख्या दिली आहे. तो म्हणतो ‘ सर्वजनसमान भाषेंत वाटेल तेवढे शब्द असून ते निरनिराळे अर्थ व्यक्त करतात. भाषेंत अक्षरावडंबरहि

 कांही कमी असतें असें नाही. पण शब्दयोजनेच्या त्याच पद्धतीला शैली किंवा

पंथाः ' म्हणतां येईल कीं जिच्यामुळे उक्तीला शोभा येईल. अर्थात् शब्दयोजनेच्या शोभेचें बीज रस व ग्रंथकार किंवा तन्निर्मित पात्र यांच्या मनःस्थितीबद्दलचें औचित्य साधण्यांतच आहे हें सांगावयास नको. (सत्यर्थे, सत्सु शब्देषु, सति चाक्षर-डम्बरे। शोभते यं विना नोक्तिः स पन्था इति घुष्यते। १-१०] तसेंच विद्याधराने आपल्या ' एकावलींत शैलीला ' पाक ' असा फार समुचित शब्द वापरून त्याचें ' रसानुकूल शब्दार्थांची योजना ' [रसोचित शब्दार्थ निबंधनम्।] असें लक्षण केलें आहे. या दोन व्याख्यांत व पेटरच्या style विषयक कल्पनेंत कांहीच अंतर नाही.

[१] कांही ठरीव ठश्यांच्या नियमानुरूप किंवा संकेतानुरूप वर्णयोजना किंवा पदरचना असणें [२] ती पदरचना केवळ वर्णनिष्ठ किंवा संकेतनिष्ठ न राहता ती मनोवृत्तीला अनुकूल असणें, म्हणजेच रसानुकूल व पात्राचित्तवृत्यनुकूल असणें या रीति विवेचनांतील दोन पायऱ्यांचा विचार झाला. आतां तिसरी पायरी खुद्द लेखक व त्याची शैली यांचें तादात्म्य. या तिसऱ्या पायरीचीहि स्पष्ट जाणीव संस्कृत साहित्यशास्त्राला आहे हें वर सांगितलेंच आहे. [१] शैलीचें बारीक भेद प्रत्येक कवीवर (त्याच्या स्वभावावर) अवलंबून आहेत. (प्रतिकवि स्थिताः। दण्डी.) [२] रीति गुण हे नियम घालून देऊन आणतां येणार नाहीत (न पाठ धर्माः। वामन.) [३] कवि आपल्या काव्यांत आपल्या शृंगारी किंवा विरागी वृत्ती प्रमाणे भोंवतालचें जग रंगवीत असतो. (आनंदवर्धन) [४] जसा कवि तसें त्याचें काव्य. जसा चित्रकार तसें त्याचें चित्र. (यादृश्यः कविस्तादृशं तस्य काव्यम्। राजशेखर.) [५] कवीच्या भिन्न स्वभावाप्रमाणे त्याची शैली भिन्न असते. (कवि स्वभाव भेद-निबंधनत्वेन काव्य प्रस्थान भेदः समञ्जसतां गाहते। कुंतक) [६] काव्य निर्मात्याच्या व्युत्पत्तीचा (अध्ययन, व्यासंग वगैरेंचा) परिपाक घेऊनच वैदर्भी वगैरे रीति प्रवृत्त होतात. (व्युत्पत्ति मुद्गिरन्ती निर्मातुः। जगन्नाथ.) (७) ' तुझ्या वाणींत तुझा अभिप्राय स्वच्छ दिराला.' इत्यादि विधानांनी वक्त्याच्या आशयानुरूप त्याची शब्दयोजना असते ही कल्पना भारवीने अनेकदा मांडली आहे. (पहा. किरात २.२८, ११.४१, १४.३ वगैरे)

परंतु हें मात्र प्रांजलपणे कबूल केलें पाहिजे कीं वरील स्पष्ट जाणिवेचें स्पष्टीकरण मात्र—कवींचा स्वभाव व त्याची शैली यांचा मेळ बसवून—कोणीहि केलेलें नाही. कालिदास हाच पाचुर्यानें वैदर्भी कां वापरतो? भारवि, भूवभूति किंवा बाण हे प्राधान्ये करून गौडी किंवा पांचाली या रीतींचाच अवलंब कां करतात? आणि इतर कवींचीहि काव्यें किंवा त्यांच्या काव्यरीति त्यांच्या त्यांच्या स्वभावाप्रमाणे कशा झाल्या? या प्रश्नांची चर्चा संस्कृत साहित्यशास्त्रांत नाहीं. याचीं कारणें वर दर्शविल्या प्रमाणे (१) आमच्या शास्त्राची वाचकनिष्ठता, (२) कवीबद्दलचें अज्ञान व (३) ग्रंथांची शिक्षापद्धती हीं तीन आहेत. तथापि त्यांच्या काव्यांवरून त्यांचा त्या काव्यांत व लेखन शैलींत प्रतिबिंबित झालेला स्वभाव आपल्यास आजहि अजमावतां येईल व style is the man हें प्रमेय पूर्ण करतां येईल. हें करण्यास कवीची काव्यनिर्मितिकालीन मनःस्थिति पाहिली पाहिजे. असा प्रयत्न मिडलटन् मरे याने आपल्या The problem of style या ग्रंथांत केला आहे. त्याचा मागोवा घेत ह्या मुद्याची चर्चा करूं.

प्रत्येक ललितलेखकाचा जो विशिष्ट भावनात्मक किंवा वैचारिक अनुभव असेल त्या अनुभवप्रकारांत त्याच्या शैलीचें मूळ असतें. सर्वजनसमान भाषेत आपल्या विशिष्ट अनुभवाच्या व्यक्तीकरणाचे कामी लावणें हें शैलीकाराचें कौशल्य. कवि हा संवेदनक्षम व बव्हंशी भावनाप्रधान असतो. त्याचे ठायी विवेकशीलता असली तरीहि त्याची जीवनविषयक दृष्टि प्रायः भावनात्मकच असते. (However much he may think, his attitude to life is predominantly emotional; his thoughts partake much more of the nature of the residual emotions, which are symbolized in the objects which arosed them, than of discursive reasoning. p. 26) मनाच्या नैसर्गिक घटनेमुळे किंवा अनुभवाने किंवा अभ्यासाने कवीची विशिष्ट अशी जीवनवृत्ति बनलेली असते. कोणी आशावादी तर कोणी नैराश्यवादी, कोणी रंगेल तर कोणी विरागी, कोणी नम्र तर कोणी आक्रमक, कोणी क्षमाशील तर कोणी खुनशी कोणी सत्य व शिव यांचा प्रेमी तर कोणी सौंदर्यदृष्टीचा, कोणी श्रद्धालु तर कोणी तर्कप्रधान, कोणी मिष्किल तर कोणी प्रांजल, कोणी गर्विष्ट तर कोणी विनयसंपन्न, कोणी हळवा, तळमळीचा, गंभीर, थिल्लर अशा अनेक वृत्तीचे लेखक असतात. त्यांच्या या वृत्तीप्रमाणे ते जगांतील प्रसंग, व्यक्ति व वस्तु यांकडे पहातात. जग अवलोकित असतां त्यांच्या मूळ वृत्ती प्रमाणे त्यांना सहानुभूति, तुच्छता, प्रेम, आदर, द्वेष, भय आश्चर्य इत्यादि भावनांचे अनुभव येतात. हे अनुभव वरचेवर आल्याने त्यांच्या मनांत त्या भावनांचे कायम संस्कार बनतात. त्या अनुभवांची त्यांना संवय जडते. कवीच्या विशिष्ट भावनानुभवाचें मूळ कारण ही त्याची भावनात्मक वृत्ति (Emotional bias or predisposition) होय. अशा जीवन विषयक दृष्टीस कोणी लेखकाचें तत्त्वज्ञान किंवा साक्षात्कार म्हणो कोणी, तिला त्याचा दृष्टिकोण म्हणो, कोणी स्वभाव म्हणो. कोणी आणखी कांही म्हणो. असल्या भावनात्मक वृत्तीतूनच खऱ्या जिवंत शैलीचा उगम आहे. कृत्रिम, उसनी, अभ्यासाने घटविलेली व संकेतबद्ध शैली असू शकते. पण ती खरी शैली नव्हे. तेथे लेखन व लेखक यांचें मीलन झालेलें नसतें. भाषेचा मोहक पसारा, शब्दभांडाराचें प्रदर्शन, शब्दांची किंवा अर्थाची चित्रविचित्र मांडणी म्हणजे शैली नव्हे. तो केवळ भाषेचा प्रभाव होय. पण भाषेवरच प्रभाव गाजविणें हें शैलीचें कार्य आहे. आणि हा प्रभाव गाजविता येण्याला कवीला आपल्या विशिष्ट भावनात्मक वृत्तीचें सिंचन भाषेतील शब्दांवर करावें लागतें. तेव्हांच ती संजीवित व नवी होऊन कवीचें मनोगत आपुलकीने बोलू लागते ? जुन्यांतून नवें बनविणें, किंवा सामान्याला विशिष्ट करणें आणि अशा प्रकारच्या नवीन सर्जनप्रक्रियेने वाचकांना सुद्धा आपल्याबरोबर सर्जनशीलतेचा अनुभव चाखविणें हें सर्जनशील शैलीचें कार्य होय. ' the magic ot style is creative. Its possessor himself creates and he inspires and enables his readers to create after him. ' हें अर्नोल्डचें मत या बाबतींत निःसंशय विचारणीय आहे.

कवीच्या संस्कारक्षम वृत्तीमुळे त्याचे ठायीं वस्तुप्रतिमांचीं, पात्रांचीं व विषयांचीं संवेदनें सिद्ध झालेलीं असतात. यांसच sensations म्हणतात. ही संवेदनात्मक घटना कविमनांतील स्थायिभावासारखी आहे. हेच कविगत स्थायिभाव काव्य-निर्मितीचे कालीं रसत्व पावतात. म्हणजेच वर वर्णिलेली emotional

predispositions जाग्रत होतात. यालाच अभिनवगुप्ताने 'कविगतरस' म्हटलें असून तोच रसिकगत रस-वृक्षाचें मूळ आहे असें त्याचें मत आहे. (म. साहित्य पत्रिका अंक ९५, जुलै-सप्टेंबर१९५० माझा ' संवेदना ' वरील लेख पहा) या कविगत-रसाने त्याची शैली सिंचित झालेली असते. म्हणून तिला नवजीवन प्राप्त होतें.

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वापर्यंत शैलीचा संबंध पोहचवून जर 'style is the man' हें विधान सिद्ध करावयाचें असेल तर रीती बद्दलच्या आपल्या पूर्व कल्पना टाकून द्याव्या लागतील. उदाहरणार्थ रीति म्हणजे शब्दार्थ निबंध. व म्हणून तें केवळ काव्याचें बाह्य शरीर आहे. फार झालें तर रीतीवरून 'कसें सांगितलें आहे' हें कळेल पण काय सांगितलें आहे' तें कळणार नाही. विचार किंवा भावनागर्भ विचार व्यक्त करण्याचें केवळ बाह्य साधन म्हणजे रीति असल्या कल्पना टाकून देऊन 'रीति म्हणजेच कविमन' किंवा 'the idea exists because of its form' असल्या सामग्र्य-विचाराच्या कल्पना पत्करल्यावांचून चालावयाचें नाही' रीति म्हणजे काव्यांत वापरलेले नुसते शब्दार्थ नसून रीति म्हणजेच काव्य असें मानावें लागेल. असें करतांना style ची व्याख्या अतिव्याप्त होते आणि काव्याची व्याख्या अव्याप्त होते असें कोणास वाटेल. पण त्याला इलाज नाही. कला किंवा काव्यकला हा कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आहे हें मत जर मान्य असेल तर काव्य म्हणजे शब्दांत आविष्कृत झालेला कवि व कवीचा शब्दाविष्कार म्हणजे काव्य, म्हणजेच रीति हेंहि म्हणणें मान्य करावें लागेल. कवीच्या व्यक्तिमत्त्वाकडे आमच्या संस्कृत ग्रंथकारांचें लक्ष नसल्याने, म्हणजेच आमचें साहित्य-शास्त्र कविनिष्ठ नसल्यानें, आम्ही असल्या सामग्र्य-कल्पना फारशा आत्मीयत्वाने पत्करलेल्या नाहीत. व म्हणूनच 'रीती'चें काव्यात्मत्व दूर लोटून आम्ही रस, ध्वनि, वक्रोक्ति, औचित्य, आणि अलंकार यांच्याकडे आपलें लक्ष वळविलें. 'रीति हाच काव्याचा आत्मा' असें म्हणतांना वामनाच्या मनांत काय होतें व तें त्याला कितपट सिद्ध करतां आलें या गोष्टी थोड्या बाजूला ठेऊन असें सांगावेंसें वाटतें कीं वामनानें 'रीति म्हणजेच काव्य' या सिद्धांताचा निदान उच्चार तरी केला आहे. यालाच जर आपण 'काव्य म्हणजेच कवि' या सिद्धांताची जोड दिली तर 'रीति म्हणजे कवि' हें समीकरण आपोआपच सिद्ध होतें ! पण तें वामनाच्या मनांत होतें कीं नाही कोणास ठाऊक ? म्हणून वामनाचा 'रीति' हा शब्द सोडून 'शैली' हा शब्द आज वापरणें अधिक श्रेयस्कर होय.

शैली म्हणजे नुसते शब्द नव्हेत, शब्द रचना नव्हे, शब्दार्थ–निबंधनहि नव्हे. तर शैली म्हणजे संबंध कवि असें म्हटलें की संबंध कविमनाची प्रतिमा त्यांच्या शैलींत उतरली असली पाहिजे हें गृहीत धरावें लागतें. त्याचे विशिष्ट विचार, भावना, अन्तःप्रेरणा [intuitions], कल्पना, अभिरुचि, प्रज्ञा, अध्ययन, संस्कृति, मतें, स्थलकालादी मर्यादा, भाषाज्ञान इत्यादि अनेक गोष्टी किंवा त्याच्या विशिष्ट मर्यादांनी मर्यादित झालेलें त्याचें सहजात किंवा संपादित संस्कारांनी युक्त असें संपूर्ण वैचारिक आणि भावनात्मक जीवन या सर्वांचें प्रतिबिंब त्याच्या शैलींत उतरलें पाहिजे. कुन्तकानेहि कवि व शैली याचा विचार करतांना कविस्वभावानुरूप त्याचें अध्ययन व अवलोकनादि असतात असें विधान केलें आहे. [अनादि वासना भ्यासाधि—वासितचेतसः स्वभावानुसारिणौ एव व्युत्पत्त्यभ्यासौ प्रवर्तेते । तौच

स्वभावाभिव्यञ्जनेनैव साफल्यं भजतः ।] काव्यांत नुसता तर्कनिष्ठ विचार नसतो. व्याकरण व तर्क यांच्या नियमांनी युक्त वाक्यांत व्यक्त केलेली भावना म्हणजेच काव्यांतील विचार. (The thought that plays a part in literature is systematized emotion.) असले विचार किंवा भावनागर्भ मतें (convictions) काव्यांत व्यक्त झालेलीं असतात. शिवाय कवीचें असलें सर्व मनोगत संपूर्णपणे व्यक्त करण्याच्या परिणामकारक पद्धतीचाहि शैलींत अन्तर्भाव केला कीं शैली म्हणजे काव्य म्हणजेच कवि हें समीकरण सिद्ध झालें. स्टेन्डहाल नांवाच्या एका फ्रेंच कादंबरीकाराने style ची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. तो म्हणतो 'style is this : To add to a given thought all the circum:tances fitted to produce the whole effect that the thought is intended to produce.' या व्याख्येप्रमाणे काव्यांतील वर वर्णन केलेला भावनागर्भ विचार पूर्णतया व्यक्त करावयाचा म्हणजे रसनिर्मितीच्या सर्व तऱ्हा म्हणजे अलंकार योजना, ध्वनि, औचित्य, वक्रोक्ति वगैरे रीतींतच आल्या म्हणायच्या !

ही गोष्ट वैदर्भी रीतीचा प्रभु कालिदास याच्याच एका प्रसिद्ध श्लोकाच्या आधारे स्पष्ट करूं. शकुन्तला कण्वाश्रमांतील झाडांस पाणी घालीत असतां तेथलाच एक भ्रमर त्या गडबडीत उडाला व शकुन्तलेच्या मुखा भोंवतीं गुंजारव करीत घोटाळूं लागला. त्याच्याकडे आणि शकुन्तलेच्या सुंदर मुखाकडे पहात असतां दुष्यन्ताची जी मनोवस्था झाली तिचें संपूर्ण वर्णन पुढील श्लोकांत आहे. आतां या वर्णनांत विचार आहे, कीं भावना आहे, कां भावनागर्भ विचार आहे, ध्वनि आहे, कां अलंकार आहे, औचित्य आहे कां वक्रोक्ति आहे, कवि आहे कां काव्य आहे, कां या सर्वांचा समावेश आपल्यांतच करणारी वैदर्भी शैली आहे याचा विचार रसिकांनीच करावा !

चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं
रहस्याख्यायीव स्वनसि मृदु कर्णान्तिकचरः ।
करौ व्याधुन्वत्याःपिबसि रतिसर्वस्वमधरं
वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृती ।

(शाकुन्तल-१-२३)

पहिल्या तीन ओळींत भ्रमराच्या कृतीचें व हालचालीचें वास्तव चित्रण आहे. म्हणून येथे 'स्वभावोक्ति' अलंकार आहे. पण येवढ्यावरच थांबावें तर 'नेत्र स्पर्श' 'कर्णामध्यें रहस्य कथन' व 'अधरपान' या भ्रमराच्या स्वप्नीं हि नसलेल्या गोष्टींचा आरोप त्याच्यावर करून त्याला दुष्यन्ताने कामुक ठरविला आहे! (म्हणून येथे 'समासोक्ति' अलंकाराची छटा आली.) व दुष्यन्त स्वतांच वरील गोंधळामुळे अधिक सुंदर दिसणाऱ्या शकुन्तलेवर अधिक आसक्त झाला असल्याने त्या भ्रमराबद्दल असूया दाखवीत आहे. आपल्या शकुन्तलेच्या नेत्रांना इतक्या जवळून व इतक्या वेळा (बहुशः) भ्रमराने स्पर्श करावा, अगदी तिच्या कानाशीं लागून (आपल्या विरुद्ध) कांही कानगोष्टी तिच्याशी कराव्या व ती 'नको' म्हणत असतां तिचें अधरपान (दांडगाईने) करावें म्हणजे काय तरी गोष्ट झाली? पण

 ही असूयेची छटा लगेच त्याने टाकली. व शेवटीं त्यास वाटावयाला लागलें कीं

सुंदर स्त्रीच्या बाबतींत भ्रमराने जो धृष्टपणा केला तोच बरोबर. धर्माधर्म, न्यान्या न्याय्य, उचितानुचित यांचा विचार करीत बसणारे आमच्यासारखे लोक असल्या सुखाला नेहमीं असेच पारखे व्हावयाचे !

दुष्यन्ताचे ठिकाणीं उत्पन्न झालेली शकुन्तलेबद्दलची उत्कट रतिभावना हा या ठिकाणचा पात्रगतरस. हा रस ध्वनि पद्धतीने व्यक्त करण्यासाठी आपली संयोजक कल्पना (Associative Imagination) वापरून कवीने भ्रमरावर कामुकत्वाचा आरोप केला. व त्याच्याबद्दल असूया दाखविल्याने तर दुष्यन्ताचा रतिभाव चांगलाच सूचित झाला. 'स्पृशसि', 'स्वनसि,' 'पिबसि' यांत अर्थश्लेष आहे. व त्याच्या साहाय्यानेच भ्रमर व कामुक यांतील साधर्म्य प्रगट होऊन 'समासोक्ति' अलंकार सिद्ध झाला. 'हताः' व 'कृती' हे शब्द दुष्यन्ताबद्दलची अवमानना व भ्रमराबद्दलची बहुमानता दाखवीत असून शिवाय ते शब्द ध्वनियुक्त म्हणजे व्यंजक आहेत. कारण त्यांत 'मीहि असेंच कां वरें वागू नये ?' असा अभिलाष सूचित होतो. यांत उपमाहि आहे (रहस्याख्यायी इव) व तींतूनहि 'असूया' सूचित होते. दुष्यन्तापेक्षा भ्रमरच श्रेष्ठ ठरल्याने व्यतिरेकाचीहि छटा येथे आली आहे. तींतूनहि दुष्यन्ताभिलाषच सूचित होतो. विशेषतः येथील साम्याधिष्ठित अलंकार व इतरहि रसध्वनि, औचित्य, वक्रोक्ति इत्यादी गोष्टी या श्लोकांतील शब्दरचनेंत अशा चपखल आणि बेमालूम सांधजोडीने बसवून दिल्या आहेत कीं त्यांचे रीति व्यतिरिक्त निराळें अस्तित्व सांगितल्या शिवाय लक्षांतच येत नाहीं. त्यामुळें कालिदासाच्या विचाराचीं अथवा भावनागर्भ विचाराचीं तीं अंगेंच आहेत असें वाटतें. म्हणजे कालिदासाने आपला विचार परिणामकारक करण्यासाठीं; स्टेन्ढ्हॉलच्या style च्या कल्पनेप्रमाणें, जें जें करावयास पाहिजे होतें म्हणजे–to add to a given thought all the circumstances fitted to produce the whole effect that the thought ought to produce तें तें सर्व केलें असल्याने सर्वतत्त्वसमावेशक' असें हें वेदर्भी रीतीचें एक लहानसें उदाहरणच झालें म्हणावयाचें.

स्टेन्ढ्हॉलच्या शैलीच्या कल्पनेशीं संस्कृतमधील रीतिकल्पना ओढूनताणून जुळविण्यासाठी मीं हें लिहिलें नाहीं. संस्कृत रीतिविवेचनांतहि याचा आढळ होतो. उदाहरणार्थ वामन, भोज व जगन्नाथ उत्कटरसत्व हें कान्ति गुणाचें स्वरूप मानतात. वामनानंतरच्या कांहीं ग्रंथकारांनीं कान्तिगुणाचा अन्तर्भाव रसध्वनींत केला आहे. दण्डीच्या मतें 'समाधि' गुणांत एका वस्तूंमधील धर्माचे आरोप दुसऱ्या वस्तूवर केलेले असतात. (वर भ्रमरावर कामुक नायकाचा आरोप केला आहे त्या प्रमाणें.) त्यामुळें या गुणांत साध्यवसाना लक्षणा, अप्रस्तुत प्रशंसा (तुल्ये प्रस्तुते तुल्यस्य), समासोक्ति व इंग्रजीमधील Parsonification हीं येतात. त्याचप्रमाणें ओज, उदारता इत्यादि अर्थ गुणांत कवीमधील कल्पनावलोकन (Visualization) अभिप्रेत असून वर्ण्यवस्तु साऱ्या अंगांनी व उत्कटपणे चित्रित करणें या काव्यधर्माचा (Vividness) त्यांत समावेश केलेला आहे. यावरून वस्तु-निष्ठ समजल्या जाणाऱ्या रीतींतहि व्यक्तिनिष्ठतेचीं कांहीं बीजें सहजासहजीं येऊन गेलीं होतीं हें ध्यानीं येईल.

'शैली म्हणजे कवि' आणि 'शैली म्हणजे काव्य' या थोड्याशा लाक्षणिक अर्थाच्या वाक्यांनी कांहींच्या मनांत गैरसमज निर्माण होईल अशी भीति वाटते.

व ही भीति येथील लाक्षणिक अर्थ कांही लोक वाच्यार्थ मानतील या संबंधीची आहे. काव्याचा विषय, पात्रें, प्रसंग, संविधानक, वृत्तें, त्यांत उल्लेखिलेलें शास्त्रज्ञान, अनुभव इत्यादि काव्याचीं सारीं अंगें शैलींतच येतात असा कोणाचा समज होईल. त्यांच्यासाठी हें सांगणें आवश्यक आहे कीं कवीच्या शैलींत कवीची फक्त वृत्ति (attitude) व्यक्त होते. म्हणजे तो कवि जें जं कांही वर्णीत असेल त्याच्या त्याच्या बद्दल त्याला काय वाटतें, त्याच्या काय भावना—कल्पना आहेत, तो त्यांचा काय अर्थ लावतो इत्यादि गोष्टी त्याच्या शैलीवरून दिसून येतात. कवीचें व्यक्तिमत्त्व (personality) काव्यांत दिसतें या विधानाचाहि अर्थ तोच आहे. पण टी. एस्. ईलियट् सारख्याचा सुद्धा या विधानाबद्दल गैरसमज व्हावा/ हें आश्चर्य आहे. त्याचा आक्षेप असाः—'A poet has not a personality to express. Impressions and experiences which become important in the poetry may play quite a negligible part in the man—the personality.' ईलियट् म्हणतो त्या प्रमाणे 'काव्यांत महत्त्वाचे ठरणारे ग्रह, मतें वा अनुभव यांना प्रत्यक्ष कवीच्या जीवनांत कांहीच अर्थ नसेल किंवा फार थोडा अर्थ असेल तर तो कवि एक अप्रामाणिक तरी असला पाहिजे किंवा त्या कवीला त्याने काव्यांत व्यक्त केलेल्या मतां प्रमाणे प्रत्यक्ष आचरण करतां आलें नसलें तरी त्यांवर त्याचा निदान वैचारिक विश्वास तरी असला पाहिजे. पण शैली-विचारांत आपण प्रामाणिक कवीच ग्रहीत धरला आहे! आणि त्याच्या आचारात्मक जीवनापेक्षां त्याचें विचारात्मक जीवनच आपल्या नजरेसमोर आपण धरलें आहे. म्हणून या अर्थी तरी ईलियट्चा आक्षेप आपल्यास नडत नाही!

ईलियट्च्या म्हणण्याचा अर्थ 'कवीने निर्मिलेल्या प्रसंगांचा, पात्रांचा किंवा मतांचा खुद्द कवीला अनुभव नसतो' असा घेतला तरी ते प्रसंग, तीं पात्रें व तीं मतें यांच्याकडे पहाण्याची दृष्टि किंवा वृत्ति मात्र खासच कवीची असते. हें कोणा-सहि मान्यच करावें लागेल. व ही दृष्टि किंवा वृत्ति त्याच्या खास व्यक्तिमत्त्वानु-रूप बनलेली असते. व्यक्तिमत्त्वाच्या काव्यांतील आविष्काराचा हा अर्थ होय. आणि त्याच व्यक्तिमत्त्वाचें प्रतिबिंब त्याच्या शैलींत पडलेलें असतें. वर उल्लेखिलेलीं काव्याचीं इतर अंगें–काव्यविषय, पात्रें, प्रसंग वगैरे–यांचा रीतींत कोणी समंजस माणूस समावेश करीत नाही हें खरें. तथापि हें मात्र सांगणें आवश्यक आहे कीं या अंगांची निवड व सजावट खास कविवृत्तीस अनुसरूनच होत असतें. तेंच रामायण आणि तेंच महाभारत हा संस्कृत कवींचा समान विषयाधार असतांना सुद्धा कालिदास, भारवि, भूवभूति, श्रीहर्ष हे कवी त्यांतले निरनिराळे प्रसंग कां निवडतात व क्वचित् तेच प्रसंग व तींच पात्रें निवडीत असले तरी त्यांची सजावट मात्र वेगवेगळी व भिन्न कां करतात याचें रहस्य वरील सिद्धान्तांतच आहे. भारतांतील 'शकुन्तलोपाख्यानांत' नसलेला वरील भ्रमर-प्रसंग कालिदासाने कां योजला व दुष्यंताच्याहि स्वभावरेषेला वेगळें वळण कां दिलें याचें उत्तर कालिदासाच्या जीवन-वृत्तींत सापडेल!

या प्रमाणे संस्कृतांतील शैली-विचाराचें विवेचन करून तो पाश्चात्य शैली-विचाराशी तुल्यबल आहे हें दाखविल्या नंतर एकच गोष्ट आतां करावयाची राहिली. आणि ती म्हणजे वर विवेचिलेल्या शैलीच्या स्वरूपावरून कांही शैलीकारांचें

व्यक्तित्व शैलींत कसें दिसतें व अमूक शैलीकार अमूकच शैली कां वापरतो याचें दिग्दर्शन करणें. असें केल्याने या विषयाला पूर्णत्व येईल. 'जसा कवि तशी त्याची शैली' याचा अर्थ जसे कवीचे मनोधर्म तशी त्याची काव्यभाषा. कवीच्या मनोधर्मात विशिष्ट भावनात्मकता, कल्पनाशक्ति व प्रज्ञा यांचा समावेश होतो. कवीच्या नैसर्गिक मनोरचनेप्रमाणे व अनुभवाप्रमाणे तो विशिष्ट भावनांच्या आविष्कारांतच जास्त रमतो. तसें करतांना कल्पनेचें कमी अधिक साहाय्य घेतो व आपला आशय आपल्या प्रज्ञेच्या व सौंदर्यदृष्टीच्या साहाय्याने व्यवस्थित रूपांत-औचित्य, संयम व भाषानियम पाळून—व्यक्त करतो. या तीन गुणांच्या उत्कृष्ट व उच्च अवस्थेसच प्रतिभा असें समुच्चयात्मक नांव आहे. कालिदासाच्या मनोधर्माचें त्यांच्या रीतीवरून (व थोडें वर्ण्यविषयाचेंहि साहाय्य घेऊन) निरीक्षण केल्यास असें दिसतें कीं त्याचे मनोव्यापार अत्यंत संयमित, समतोल, प्रमाणबद्ध व सुसंघटित आहेत. श्रृंगार, भक्ति, वात्सल्य, करुण ह्या कोमल भावनांतच तो अधिक रंगतो. वीरादी इतर रसांचा त्याचा आविष्कारहि ललितच असतो. मृदु, कोमल, सुंदर, संपन्न अशाकडेच त्याचा ओढा. म्हणून, कुन्तक म्हणतो त्या प्रमाणे, त्याचा सुकुमार मार्ग आहे. त्याचे शब्द साधे, सोपे, अक्लिष्ट, रचना बरीचशी समास-विरहित असते—म्हणजे त्याचे ठायीं प्रसाद असतो, याचें कारण त्याचा जिव्हाळा व स्वच्छ मन. विचारांत गुंतागुंत नाही, कल्पनेंत बाणासारखा धाडशीपणा नाही, भावनेंत भूवभूतीचें अतिरिक्त उत्कटत्व नाही कीं शब्द योजनेंत श्रीहर्षाची पाण्डित्य प्रदर्शनाची आवड नाही. जगन्नाथाचा अहंकार नाही, भारवीची विचार प्रवणता व अर्थगौरव नाही, सर्वत्र लालित्य व माधुर्य यांचें साम्राज्य.

या अन्तर्गत कारणांमुळेच माधुर्यगुण व्यंजक, शब्दांनी युक्त, ललित, साधी व आकर्षक वैदर्भी शैली कालिदास लिहितो. बेफाट कल्पना, उत्कट भावना, असंयमित व विघटित मनोव्यापार, अस्पष्ट विचार अशी मनोघटना असली कीं मोठीं व गुंगागुंतीचीं वाक्यें, प्रचण्ड समास, विषम रचना इत्यादी गोष्टी अपरिहार्य होऊन शैली दोषयुक्त होते. आशय चांगला व कविमन एकंदरीने संपन्न असूनहि बाण, भवभूति व श्रीहर्ष इत्यादी कवींनी गौडी, किंवा पांचाली रीतींचा आश्रय प्राधान्याने केला हें त्यांच्या मनोघटनेस धरूनच झालें. वास्तव कल्पना (Realistic imagination) टाकून बेफाट व धाडशी (Fantastic) कल्पनेच्या मागे कवी लागला व त्याच्या मध्यें जिव्हाळा–भावनात्मकता—नसली कीं त्याची शैली माघाच्या शैली प्रमाणे कृत्रिम, बोजड व अवघड होते.

वर्ण्यविषय, वाचक व स्वतः आपण यांकडे पाहण्याची कवीची किंवा लेखकाची वृत्तिहि त्याच्या शैलींत प्रगट होते. पंडित्य आणि धाडशी कल्पना यांच्या साहाय्याने वाचकांस चकित करावें या वृत्तीने प्रेरित झालेले लेखक मोठे समास, भारदस्त भाषा, अपरिचित शद्ब व उत्कट भावना शैलीमध्ये उपयोजितात. अज्ञ वाचकांना नवें कांही सुनाविणारे आपण आहोंत असें कित्येकांस वाटतें. कित्येक विषयाच्या भव्यतेने वा नवीनपणाने दिपून जाऊन भव्यशैली (Grand style) निर्माण करतात. विष्णुशास्त्री चिपळोणकरांच्या भारदस्त व भव्य शैलीची ढब त्यांच्या वाचक व आपण स्वतः यांबद्दलच्या मनोवृत्तींतून उगम पावली आहे.

"मराठीभाषेचें हें असें प्रचंड सामर्थ्य आहे, ज्ञान हें अफाट आहे, तुम्हांला तें अजून उमगलें नाही, मी तर 'मराठीचा शिवाजीच' आहे, कसा तें पहा", या स्वाभिमानी वृत्तीने लिहिणाऱ्या शास्त्रिबुवांच्या लेखर्णातून संस्कृत प्रचुर शब्दरचना, पल्लेदार वाक्यें, शेकडों उल्लेख व भव्य उपमा उत्प्रेक्षा उतरल्या यांत काय नवल ? याचें उलट साने गुरुजी पहा. 'मी पंडित नाही, मी तुमच्याहून निराळा नाही, मी तुमचा व तुम्ही माझे, मी तुमची आई व तुम्ही माझीं लेंकरें किंवा मी तुमचें लेकरूं व तुम्ही माझी आई, तुमचें दुःख पाहून मी तळमळतों, माझी तळमळ व अश्रु पाहून तरी तुम्ही माझें म्हणणें लक्षांत घ्या' या विनम्र, वत्सल व कोमल वृत्तीने वाचकांच्या अन्तरंगाचा ठाव घेऊं पाहणारे साने गुरुजी छोटीं व साधीं वाक्यें, सोप्या उपमा, परिचित व घरगुती शब्द वापरुन आपल्या शैलीतून करुण व भक्ति यांचे पाट वाहवतात. मराठींत, संस्कृताप्रमाणे, शैलीला निरनिराळीं नांवें अद्याप रूढ व्हावयाचीं आहेत-म्हणूनच मी तीं वापरीत नाही.

शिवरामपंत परांजपे यांच्या मनांत स्वातंत्र्यप्रीतीचें जबरदस्त संवेदन (Sensation) पक्कें झालें असल्याने भारतीय स्वातंत्र्यभक्ति व स्वातंत्र्यापहारक इंग्रज राज्यकर्ते याबद्दल द्वेष, या दोन भावनांनी त्यांचें मन व्याप्त झालें होतें, पण या भावना उघडपणे बोलण्याची मुभा त्यावेळीं नसल्याने परांजपे यांच्या मुळांतच मिष्किल वृत्तीने उपरोधाचा आश्रय केला. व त्यांच्या कल्पकतेंतून पांडित्याच्या विलासाने नटलेली रम्य वक्रोक्ति-प्रधान शैली निर्माण झाली. ज्ञानेश्वर व तुकाराम हे दोघेहि सारख्याच योग्यतेचे संत असले तरी ते दोघे आपापल्या मनोधर्माप्रमाणे आपली वेगळी शैली वापरताना दिसतात. तुकारामांच्या मनोरचनेंत जिव्हाळा, तळमळ, प्रांजलपणा, सडतोडपणा, जरूर तेथे नम्रता व आवश्यक तेथे कठोरता असल्याने त्याची रचना साधी, सरळ, जोरकस व मोकळी झाली. त्यांचा संस्कृताशी फार परिचय नसल्याने व बहुजनसमाजांत राहून व त्यांना उद्देशूनच ते आपली रचना करीत असल्याने त्यांची भाषा घरगुती व सोपी झाली. त्यांच्या थोड्या फटकळ निर्भिड व निर्भय वृत्तिमुळे त्यांनी दांभिकांवर कडक व ग्राम्य शब्दांत कोरडे ओढण्यास हि कमी केले नाही. याच्या उलट ज्ञानेश्वर संयमी, विनबोलके (म्हणजे स्वतावद्दल किंवा स्वताच्या मतांबद्दल उघड न बोलणारे) गंभीर व नागर असल्याने त्याच्या शैलींत निराळेपणा आला.

या प्रमाणे व्यक्ति-मनोधर्माप्रमाणे शैलीचें रूप बनत असतें. शैलीत नुसतें व्यक्तिमत्व प्रगटलें येवढ्यावरूनच तिला चांगली शैली म्हणत नाहीत. चांगलें व्यक्तिमत्व व्यक्त करणारी शैलीच चांगली ठरते. म्हणून उत्तम शैलीकार होऊं पाहणाराने आपण उत्तम-व्यक्तिमत्व संपन्न आहों कीं नाही हें प्रथम पहावें; व 'कविः प्रथमात्मानं कल्पयेत्' हा राजशेखराचा बहुमोल उपदेश ध्यानीं घ्यावा हीच प्रार्थना.

ग्रंथ परीक्षण

(१) आमची माती आमचें आकाश

आपल्या मराठीचिये नगरीमध्ये काणेकरांच्या जातीचे लेखक फारच विरळा आहेत. काणेकरांनी जें जें काय लिहिलें तें त्यांनी चांगलें करून सोडलें आहे. काणेकरांच्या कवितांना वाङ्मयांत विशेष स्थान आहे. काणेकरांचे लघुनिबंध हा दुसरा एखाद्या प्रदीर्घ निबंधाचा विषय होऊं शकेल. काणेकरांनी अनुवादलेलीं नाटकें नमुनेदार अनुवाद म्हणून गाजलीं आहेत. तसेच काणेकरांच्या प्रवास वर्णनाचें. त्यांच्या 'धुक्यांतून लाल ताऱ्याकडे' ह्या प्रवास-पुस्तकाने तसल्या पुस्तकांना वेगळीच दिशा दाखविली.

'आमची माती, आमचें आकाश' ह्या पुस्तकांत दोघांची भागीदारी आहे. शब्दांचे धनी काणेकर असून त्यांतील रेखांचे निर्माते दीनानाथ दलाल आहेत. साधारणतः असें आढळून येतें कीं जे चित्रकार आहेत त्यांची वाङ्मयाशी तोंड-ओळख सुद्धा दिसून येत नाही. मग वाङ्मयीन श्रेष्ठ कलाकृतीचा अस्वाद तर दूरच राहिला. वाङ्मयकृतीचें सक्रिय रसग्रहण करून जें शब्दांत आहे तें चित्रांत वठवून त्याचें महत्व द्विगुणित करणारे, समसमा संयोग घडवून आणणारे रसग्राहक चित्रकार आमच्यांत नाहीतच. लेखणीचे कलावंत आणि कुंचल्याचे 'कलावंत' ह्यांचा परस्पर संबंध सहसा येतच नाही. ह्याचे अपवादा दाखल उदाहरण दलालांचें देतां येईल. ह्यामुळे दलालांचें आपल्या कलाक्षेत्रांत अनन्य स्थान आहे.

आपल्या Path to Rome ह्या प्रवास ग्रंथांत हिलेर बेलॉक ह्याने स्वतःच काढलेलीं रेखाचित्रें दिलीं आहेत. तर Donald Maxwell सारखा एखादा चित्रकार आपल्या स्केचेसच्या जोडीला Adventures with a sketch-book असें एखादें प्रवास वर्णन जोडतो. असा बहुढंगीपणा आपणाकडे सहसा आढळून येत नाही. त्यामुळे काणेकर-दलाल ह्या जोडगोळीचें आपण विशेष प्रेमाने स्वागत केलें पाहिजे.

ग्रंथास नांव देण्याच्या बाबतींत सुद्धा काणेकरांचें वैशिष्ट्य आहे. 'आमची माती, आमचें आकाश' हें नामकरण आपाततः एका संभाषणांतून स्फुरलें असलें तरी त्या मागे असलेला "आमचेपणा" आपल्या नूतनोपार्जित स्वातंत्र्याचाच द्योतक नाही काय ?

काणेकर-दलालांचा प्रवास फक्त ४८ दिवसांचा आहे. आणि त्याचें वर्णन वाचायला पुरते ४८ तासहि नको आहेत. गतवर्षी १० मार्चला त्यांनी मुंबईची माती नि आकाश सोडलें आणि ते परत त्या नगरीला २७ एप्रिल ला येऊन दाखल झाले. ह्या अवकाशांत त्यांनी उत्तर हिंदुस्थानांत जी राघो भरारी केली त्याचें वर्णन ह्या पुस्तकांत आहे. पंधरावर जास्त अशीं प्रमुख शहरें, कलाक्षेत्रें आणि धर्मक्षेत्रें

ह्या अल्पकाळांत त्यांनी अवलोकिलीं. अहमदाबाद–अबूपासून त्यांचा प्रवास सुरू होतो तो मारवाड–मेवाड ओलांडून अजमेर-जयपूरला वळसा घालून वर आग्रा-दिल्ली अमृतसर घेऊन हरिद्वार-डेराडून करीत अलाहाबाद-लखनौ–बनारस ह्या पूर्वेच्या रोखाने थेट कलकत्त्या पर्यंत जाऊन थडकतो.

माणूस ज्या दृष्टिकोणाने प्रवास करील त्यावर तो प्रेक्षणीय स्थळांत काय प्रेक्षणीय करील हें अवलंबून असतें. काणेकर-दलाल केवळ सुंदर स्थळें पाहण्याचा आनंद लुटावयास निघाले होते. त्यांनी आरंभी प्रास्ताविकांत सांगितल्याप्रमाणे त्यांचा ऐतिहासिक, समाजशास्त्रीय किंवा तसलाच जाडा उद्देश नव्हता. त्यामुळे त्यांनी सुंदरस्थळें मुळीच डावललीं नाहीत. उलट आपल्या वाचकांना त्या त्या स्थलांच्या परिसरांत विशेष प्रेक्षणीय काय ह्याचें सम्यक ज्ञान करून दिलें आहे. त्याबरोबर अनुषंगाने त्यांना प्रवासांत जे व्यक्तिविशेष आढळले त्याचें चित्रण त्यांनी शब्दांत करून ठेवलें आहे. आणि दलालांनी ती मंडळी 'होती कशी आननीं आणि शरीरीं' हें रेखांनी दर्शविलें आहे. गेमानदास, कुमुद, विजयसिंहजी, बाळभक्त महंमद हुसेन, बाटाच्या पॉल, डॉ. शुक्ल इत्यादिंच्या अंतरंगाचा ओझरतां स्पर्श काणेकरांनी शब्दांत करून त्यांचें बाह्यांगदर्शन दलालांनी सुलभ करून ठेवलें आहे.

प्रवासवर्णनाची मधुरता स्थलांच्या वर्णनांत असतेच. परंतु तीं पाहतां पाहतां त्यांच्या आधारे स्वतःच्या तज्जन्य भावनांचें चित्रण जेव्हा लेखक करतो तेव्हा त्या वर्णनास खरी रुचि येते, मानवी स्पर्श लागतो. अबूतील सनसेट पॉईंट, अविस्मरणीय मारवाडी राम, ताजमहालचें सौंदर्य आणि हक्सले, बाबर, शिवाजी, रानडे ह्यांचा डेहराडून मधील समकालीन वृक्ष, बौद्धांचीं देवळें आणि हिंदूंचा हिमराशी हिमाचल ह्या नांवातील काव्य धर्म क्षेत्रांतील पंडेगिरी आणि गुंडगिरी. जोशी "इफेक्ट" ने प्रकाशावर अधिक प्रकाश, किंवा डून मधील सेंट डस्टन्स होम फॉर इंडियन बॉइज् मधलीं मुलें, Don't hurt the tree. इत्यादि इत्यादि अनेक गोष्टी कधीं सहृदयतेने, कधी तन्मयतेने, कधी चिकित्सक वृत्तीने तर कधी मंद उपहासाने, तर कधी रेशमी चिमटे घेऊन, क्वचित कडवटपणाने त्यांनी वर्णिल्या आहेत. त्याची मजा वाचल्या शिवाय कळावयाची नाही.

वाचता वाचता आपल्या मुखांवर सहज स्मिताची रेखा उमटून जावी असाहि पुष्कळ भाग ह्या वर्णनांत आहे. I go humanity service, my mother, he is trembling हे इंग्रजीचे मजेदार नमुने. किंवा अहमदाबादच्या 'लारी' ह्या मालवाह-नवरा-बायको हमालीसाठी ओढणाऱ्या–गाडीचा उल्लेख करतांना 'संसाराचा गाडा नवराबायकोने जोडीने ओढावा' वगैरे वगैरे कल्पना सद्गदित कंठाने सांगणाऱ्या कवींचें काव्य अहमदाबादच्या हमालांनी अगदी रस्त्यावर आणून सोडलें आहे अशी खुसखुशीत वाक्यें ह्या प्रवास वर्णनाचा कुरकुरीत आस्वाद घ्यावयास लावतात. माणसें फार अन्याय सहन करितात. तसा त्यांनी कां करावा ही समाज व्यवस्था आहे तरी काय? असा अस्वस्थ विचार मधे कोचून जातो. हा भाग वाचत असतांना मला साहजिकच इटलीच्या दुःखाने चिडून व्हेसुव्हियस पेटला पण आपला हा हिमालय अजून थंडच कसा आहे अशा आशयाची काणेकरांची एक कविता आठवली.

मनोविनोदनाच्या साठी कोणत्याहि उत्कृष्ट कादंबरीला हें प्रवासवर्णन हार जाणार नाही. वाचक मधे मधे अडखळतो तो फक्त दलालांच्या चित्रावर नजर खिळून. ज्यांनी ह्या विभागांत प्रवास केला आहे अशांच्या स्मृति ह्या प्रवासवर्णनाने जागून उठतील. आणि ज्यांनी त्याचा अनुभव घेतला नाही अशांना काणेकर—दलाल ह्यांनी अनुभवलेल्या आनंदाचे वाटेकरी निःसंशय होता येईल आणि त्यामुळे प्रत्यक्षात नसली तरी कल्पनेच्या ह्या प्रवासांत घडलेली काणेकर-दलालांची सोबत त्याला नेहमीच हवीशी वाटेल.*

मा. नी. गलगलीकर.

★

(२) हळवें भिंग

प्रा. य. द. भावे यांचा हा दुसरा कवितासंग्रह आहे. 'आर्द्रा' या पहिल्याच काव्यसंग्रहाने त्यांना नवकवींच्या नामावलींत मानाचें स्थान प्राप्त झालें. या दुसऱ्या संग्रहाला त्यांनी सविस्तर प्रस्तावना लिहिलेली असून त्यांनी स्वतःची नवकाव्य-विषयक मतें मांडलेलीं आहेत. या प्रस्तावनेमुळे वाचकांची मोठीच सोय झालेली आहे. कारण कवीची काव्यदृष्टि समजल्याने त्या दृष्टिकोणांतून त्याच्या काव्याचें समीक्षण करणें सोपें होतें. ही प्रस्तावना सिद्धांतरूप आहे. तिच्यांत नवकाव्यावर झालेल्या टीकेचा परामर्श घेण्यांत आलेला नाही. त्यामुळे टीकाकारांनी घेतलेले आक्षेप अनुत्तरित राहिलेले आहेत. प्रा. भावे यांनी आपल्या प्रस्तावनेंत जे विचार मांडले आहेत त्यांत नवीन असें कांही नाही. मर्ढेकरांच्या कवितांमुळे जें वादंग माजलें होतें त्यांत नवकाव्याच्या समर्थकांनी जसें विवेचन केलें होतें त्याच पद्धतीचें विवेचन प्रा. भावे यांनी आपल्या प्रस्तावनेत केलेलें आहे. नवी कविता व जुनी कविता यांतील फरक सांगतांना कवि म्हणतात, केवळ मुक्तछंदाचा उपयोग अगर वृत्तवैचित्र्य नव्या प्रतिमा, अगर नवे संकेत यांत नवकाव्याचें वैशिष्ट्य नाही तर जुनी कविता व नवी कविता यांतील फरक आंतरिक आहे, वैचारिक क्रांतीचा निदर्शक आहे. कवीने हें सांगून टाकलें हें बरें झालें कारण बहुतेक नवकवींची अपद्यागद्य रचना जुने संकेत मोडून नवीन संकेत निर्माण करणें, नव्या प्रतिमांचा उपयोग करणें आणि आजपर्यंत काव्याविषयाला पारख्या झालेल्या कल्पनांचा कसाहि वापर करणें यालाच 'नवी' कविता समजतात. आता त्यांच्या मतें केवळ एवढ्याने नव काव्याचीं हीं लक्षणें नाहीत असें सांगितल्यामुळे 'नाविन्यवादी' कवींची मोठीच गैरसोय होईल. उफाळून येणाऱ्या भावनांचा व विचारांचा आविष्कार सुगम व्हावा म्हणून मुक्तछंदाचा आश्रय घेणें कांही कवींना इष्ट वाटलें. कांहींना जुन्या काव्याविषयक संकेतांचें जोखड झुगारून द्यावेसें वाटलें व म्हणून त्यांनी नवे संकेत प्रचारांत आणले. चालू काळाचें दर्शन व्हावें म्हणून यंत्रयुगाच्या प्रतिमा वापरणें कांहींनी सुरू केलें तर कांहींनी नवीन प्रतिकें शोधून काढलीं. परंतु प्रा० भावे यांच्या मते हीं नवकवितेचीं वैशिष्ट्यें नव्हत. अर्थ हाच काव्याचा आत्मा आहे आणि नवा अर्थ सांगणें हेंच नवकवीचें कार्य आहे. आणि हा नवा आशय

* नागपूर नभोवाणी केंद्राच्या सौजन्याने

कोणता तर 'मानव्य' टिकविणें. नवकाव्याची ही साधी टेमेटोक व्याख्या कोणालाहि जुन्या पारंपारिक विचारसरणींच्या काव्यास्वादकांनाहि पटावयाला हरकत दिसत नाही. आतां हा नवा आशय कसा प्रकट करावयाचा व त्याचें आवाहन कसें करावयाचें याबाबत मतभेद होण्याची शक्यता आहे. प्रस्तावनेच्या आठव्या छेदकांत प्रा. भावे यांनी आपली सामाजिक क्रांतीची कल्पना सांगितलेली आहे. या नव्या आशयाची अभिव्यक्ति सुगम असावयास पाहिजे परंतु भावे यांच्या या संग्रहांतील कोणतीहि कविता वाचल्यास तिचा अर्थ चटकन् लक्षांत येईल असें वाटत नाही. कवीचें भाषेवर–शब्दकलेवर–प्रभुत्व नसल्याने त्याची कविता अभिव्यक्ति व भावाविष्कार या बाबतींत शिथिल बनली आहे. सामाजिक क्रांतीचा उद्घोष करणाऱ्या कवीची रचना ओजस्वी व प्रभावशाली असावयास पाहिजे. परंतु ती तशी नाही कारण त्याच्या 'मन गव्हरांत वैचारिक संघर्ष व भावनाकल्लोळ प्रकर्ष पावलेला नाही. कवीचें मन हें एक "हळवें भिंग" आहे आणि "विजेच्या चापल्याने वास्तवाचीं चित्रें टिपून घेणारें" तें आहे येवढीच कवीची कल्पना असल्यामुळे त्याची रचनासुद्धा त्याच प्रमाणांत त्रुटित व प्रसादविहीन आहे. मानव्याच्या पूजकाने केशवसुतांप्रमाणे/दणदणीत वाणीने आपली कविता गावयास पाहिजे. केशवसुतांची कविता लोकांच्या जिभेवर नाचते आहे कारण तिच्यांत ओज आणि प्रसाद आहे. जसे त्यांचे विचार तशीच त्यांची ठणठणीत कविता आहे. रामदासांनी अशीच कविता लिहिली कीं, ती लोकांच्या स्मरणांत राहावी. अर्थात् अशा तऱ्हेच्या कवितेची अपेक्षा भाव्यांसारख्या "तोकड्या वैखरी"च्या कवीकडून करण्यांत अर्थ नाही कारण ज्याची काव्याची कल्पनाच मुळीं "जागृत मन व सुप्त मन यांच्या अनुभवाचा मेळ काढून आलेल्या अनुभूतींचा आविष्कार किंवा अभिव्यक्ति" ही आहे त्याच्याकडून नव्या विचारांच्या ताकदीची कविता निर्माण होणें कदापि शक्य नाही, मग विश्व बदलून टाकावयाच्या व सांप्रतच्या समाजरचनेवर हल्ला चढविण्याच्या त्याने कितीहि घोषणा केल्या तरी तें अशक्य आहे. क्रांतीची घोषणा करणारा मायकोव्हस्की संज्ञा-प्रवाहांत बुडून गेला नाही अगर वास्तवाचीं त्रुटित चित्रें रेखाटत बसला नाही. कवीने आपल्या प्रस्तावनेंत सामाजिक क्रांतीसंबंधाने विवेचन केलें असल्यामुळे येवढी चर्चा करावी लागली. कवि प्रस्तावनेंत म्हणतात कीं, "त्याला (नवकवीला) समाजांतील रोगी, भेकड मनोवृत्तीची उबग येते, त्यांतून संतापाचे फटकारे, वा ठिणग्या बाहेर पडतात." भाव्यांच्या त्रुटित. 'बिंदुस्रावी' काव्यांत असे फटकारे वा ठिणग्या कांही ठिकाणीं आढळतात. "तेजोवलया", "सूर्याच्या भट्टींत" "वेळ जाईना", "गजा आडच्या", या कवितांतून कवीने वर्णिलें आहे—

घडघडत्या होमकुंडांतून
जन्मास आलेल्या तेजो वलया
आणलास संगे विराट नाश
उडाले सुरुंग घरटीं खाक
थरथरलीं रक्ताचीं कारंजीं
रपरपला मांसाचा चिखल

किंवा

धावतो गाढव
धावतो सदाच
खावया गवत

अनुक्रमणिका

किंवा

काळ्या डांबरी वितळूं लागल्या रस्त्यावरचे
बेकारांचे तांडे, हाडांचे सांगाडे घुमूं लागतात
वेळ जाईना
उरलें सुरलें जळतें मांस, जळती कैंस
तयांची दुर्गंधी लागते श्वासूं
वेळ जाईना, वेळ जाईना.

अथवा

नाही चालूं देणार तुमचे थेर.

ही वर्तमानपत्री जाहिरनाम्यासारखी कविता वाचल्यास कवीला आजच्या रोगट अन् विकृत जीवनाची घृणा आलेली आहे येवढें मान्य करण्यास हरकत नाही. परंतु "जीवनांतील मांगल्य व सौंदर्य शोषून घेणारी आजची दोषपरिप्लुत समाजरचना बदलून टाकण्याचें व आर्थिक गुलामगिरी नष्ट करण्याचें" ध्येय राखणाऱ्या कवीची कविता तितकीच ओजस्वी असावयास पाहिजे. विशाल ध्येय ठेवणाऱ्या कवीची प्रचीती तितकीच व्यापक असावयास पाहिजे. ध्येय विशाल परंतु अभिव्यक्ति तोकडी अशी कवीची स्थिती झालेली आहे याचें कारण त्याचें व्यक्तिमत्व सकस व परिणत नाही. आंतरिक जाणीवेशिवाय काव्य परिणामकारक होत नाही. कवीच्या मनांत भावनाकल्लोळ निर्माण झाला तरच त्याची कविता जातिवंत होईल. पोकळ ध्येय ठेवून अस्सल कविता निर्माण होत नसते. जनस्वी व मनस्वी कवीच प्रभावशाली काव्य निर्माण करूं शकतो. इतरांची कविता वांझ ठरते.

"हळवें भिंग" या संग्रहाचे कर्ते हे इलिअट, ऑर्डन या आंग्लकवींचे अनुवादक आहेत. त्यांच्या प्रस्तावनेंतील छेदक ४ ते ७ वाचल्यास ते इलिअटच्या काव्य-विषयक विचारांचे अनुयायी आहेत हें स्पष्ट होईल. त्यांनी आंग्लकवींचा—अत्याधुनिक (Modernist) आंग्लकवींचा ऋणनिर्देश प्रस्तावनेंत केला आहेच. त्यांच्या कविताशैलीवर आंग्ल काव्याची छाप उमटलेली आहे. भावे यांच्या काव्यावर इलिअटच्या काव्याचा फार परिणाम झालेला आहे. मनोगाहन पद्धतीने अंतर्मनाचीं रेखाचित्रें काढण्याची भावे यांना फार हौस दिसते. तरळते स्मृतितरंग टिपून घेऊन त्यांचा काव्यांत उपयोग करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी आधुनिक कल्पना-प्रतिमांचा उपयोग त्यांनी केलेला आहे परंतु त्यांची कविता सकस उतरलेली नाही. असंबद्ध स्वप्नसृष्टि रेखाटण्याची कष्टशील उत्कंठा कवीच्या ठिकाणी दिसून येते. मनाच्या आंत दडलेल्या विसंगत भावना रंगविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. या पद्धतीचा इलिअट हा अध्वर्यु समजला जातो. त्या पद्धतीची मनोगाहनी कविता त्रुटित कां होईना नवकवींमध्ये भावे यांनीच जास्त प्रमाणांत निर्माण केली आहे. या संग्रहातील कवितांतून "मनकांठावर", "मनतनूवर", "मनगव्हरांत", "मनव्योर्मी", "मनाचें फ्यूज", "मनाचे परावर्तक", "मनाचें कवाड", असे शब्द कवीने पेरलेले आहेत "मनोमनाचा स्वर्ग", "मनोमनांतील स्पंदन ध्वनि" असे अपरिचित शब्दप्रयोग कवीने "मनाची कविता" लिहितांना केले आहेत. या शब्दांवरून कवीने सुप्त मनाची, अंतर्मनाची, असंज्ञ मनाची कविता लिहिली आहे

अनुक्रमणिका

याची वाचकांना कल्पना येईल. कवीने मनांतील विचार ज्या विसंगतपणे मनात उद्भवतात तसे प्रकट करण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतु त्याचा प्रयत्न सफल झालेला नाही व त्यांची अभिव्यक्ति कलापूर्ण नाही. इलिअटने आपल्या प्रतीकात्मक पद्धतीने उत्कृष्ट स्मृतिचित्रें रंगविलेलीं आहेत. त्याच्या वर्णनांतून त्याचा आशय जोरकसपणे प्रकट होतो. भावे यांच्या काव्यांत केवळ कारागिरी दिसते—

मनांत माझ्या चाललें आहे
कसलें तरी अज्ञात 'शंटिंग'
अन् कुठेतरी अस्ताव्यस्तलेले बाजूला गेलेले
स्मृतींचे डबे येत आहेत एके ठिकाणीं···

किंवा

आकाशांतलें
सूर्याचें बिंब बनलें आहे खिळ्यांचे डबडें
आणि गुंगले
भेसूर दारयांत मैलच मैल उलटे लोंबते रिकामे खिसे,

अथवा

स्वप्नांचे कपटे
ढोसले छडीने लहानपणीं कांही पंतोजींनी
माझ्या मेंदूत फडफडतात अधून मधून.

असली चमत्कृतीपूर्ण रचना कवीने केलेली आहे.

खरें पाहिलें असतां प्रा. भावे यांची काव्यप्रकृति romantic आहे. सामाजिक कविता लिहिण्याच्या असफल प्रयत्नांतूनहि त्यांची सौंदर्यलक्षी वृत्ति ताजी राहिलेली आहे. भावनोत्कटता व कल्पनासौंदर्य यांनी त्यांच्या कांही कविता रसपूर्ण झालेल्या आहेत आणि त्यांच्या अभिनव प्रकटन पद्धतीने निराळाच रसानुभव वाचकांना प्राप्त होतो. "अश्रु आणि इंद्रधनुष्यें" "आतां कशाला"—"विखुरत रंग" "केंसामध्ये" "हस्तनक्षत्रांतील रात्र" या कविता वाचनीय आहेत. कवीची मूल प्रवृत्ति romantic असल्यानेच त्याच्या कल्पनारम्य कविता उत्कृष्ट उतरलेल्या आहेत. याचा अर्थ असा नव्हे कीं, कवीने मनोगाहनी कविता लिहिण्याचा केलेला प्रयत्न उपेक्षणीय आहे. मराठींतील या प्रयत्नांचें रसिकांनी कौतुक करावयास पाहिजे. त्यांच्या कवितांत जी मनोगाहनाची सूचकता व कुशल प्रतिमायोजना आढळते तिची नवीन प्रयत्न म्हणून रसिकांनी प्रशंसा करावयास पाहिजे. कवीने आपल्या जाणीवेची कक्षा वाढविली तर तो आजच्या पेक्षा जास्त प्रभावी, परिणामकारक कविता लिहूं शकेल व त्याच्या काव्याचें आवाहन बहुजनरसिकांना होऊं शकेल. तसेंच कवीचें सामाजिक क्रांतीचें ध्येय टीकाविषय नसून त्याची अभिव्यक्ति विवाद्य आहे. कारण कवीची प्राचिति व आत्मानुभव व्यापक व सखोल नाही. जातिवंत कविता लिहिण्यास कवीच्या मनांतील विचारसंघर्ष व भावघनता तितकीच जातिवंत पाहिजे. उत्कृष्ट काव्य हे महात्म्याच्या मनांतील विचारांचे, भावभावनांचे पडसाद असतात तेव्हा कवीचें व्यक्तिमत्त्व जितकें उन्नत व संपन्न तसें त्याचें काव्य निर्माण होईल.

मराठी नवकवितेची दिशा ओळखण्यासाठी रसिकांनी ' हळवें भिंग ' हा काव्यसंग्रह एकदां नजरे खालून घालावा अशी विनंती करून हें परीक्षण आटोपतें घेतों.

पां. ब. गाडगीळ.

★

३ गांवाकडच्या गोष्टी

श्री व्यंकटेश माडगूळकरांनी या संग्रहांत गांवाकडच्या गोष्टी सांगितल्या आहेत. प्रत्येक गोष्टीमध्ये विशेष स्वरूपाचीं माणसें आणि विशेष प्रकारचे प्रसंग वर्णन केले आहेत. या गोष्टींचा उल्लेख करतांना अनेकांनी त्यांना लघुकथा म्हटलें आहे. पण "माणदेशी माणसं" हा जसा निव्वळ व्यक्तिचित्रांचा संग्रह आहे, लघुकथांचा नाही त्याचप्रमाणे "गांवाकडच्या गोष्टी" ह्या गोष्टी आहेत लघुकथा नाहीत. लघुकथेंत तिची बांधणी, आरंभ, विकास आणि अखेरी या सगळ्यामध्ये एकसंधीपणा, एकजीवपणा आवश्यक असतो. लघुकथेचें उद्दिष्ट ध्यानांत ठेवूनच एखादा प्रसंग अथवा व्यक्ति तींत प्राविष्ट होईल. आरंभ आणि अंत यांच्यामध्ये एकसूर राहील पण या प्रकारच्या कथा संग्रहामध्ये 'बोजा' 'भुताचा पदर' अशा क्वचितच आढळतात. इतर गोष्टींमध्ये गोष्ट सांगण्यापलीकडे दुसरा कोणताच हेतु आढळत नाही. "झोंबी"मध्यें कथेच्या बांधणींतील उणीव खटकते. "सोन्याच्या माडींत" सोन्याची माडी बांधण्यांतील उद्देश आणि माडी बांधून झाल्यानंतरचा समाधानाचा विचार यांच्यामध्ये काहीच मेळ नाही. अनेक कथांच्या बाबतींत अशाच उणीवा आढळतात. परंतु 'गांवाकडच्या गोष्टी' लघुकथा म्हणूनच महत्वाच्या नसल्या तरी त्या गोष्टींमध्यें लघुकथाकाराला आवश्यक असलेली साधनसामुग्री विपुल आहे. स्वतः माडगूळकरांना गोष्ट परिणामकारक व्हावी म्हणून विशेष रीतीने मांडणी करण्याची आवश्यकताच वाटत नाही. पण हा सगळा प्रकार असतांहि ज्याला मनोरंजक गोष्ट वाचायला हवी त्याची अपेक्षा मात्र हा संग्रह पुरेपुर पूर्ण करील. श्री. माडगूळकरांनी आपल्या वैशिष्टयपूर्ण घटनांच्या निवडीने मराठी वाचकांना गेल्या दोन वर्षात ज्या गोष्टी आणि व्यक्तिचित्रें वाचावयास लाविलीं तिच्याकडे पाहतां असें म्हणावेंसें वाटतें की ते एक उत्कृष्ट लोककथाकार आहेत. लोक-जीवनाशी आणि लोकभाषेशी त्यांचा परिचय अतिनिकटचा आहे पण तो प्रादेशीक असल्याने भाषा व विषयांची निवड अलिकडे ठराविक ठशाची होत आहे. तथापि सर्वसामान्य वाचकांची वाचनाची हौस आणि भूक शमविणारी जीं थोडीं फार पुस्तकें मराठींत हल्ली प्रसिद्ध होत आहेत त्यांत श्री. माडगूळकरांचें हें पुस्तक फार वरच्या दर्जाचें आहे.

गो. रा. दोडके.

१९५१
ऑगष्ट

आम्ही–
अनिल

★

करणार जें आम्ही होतों
आणि केलें नाही
मिळवणार जें आम्ही होतों
आणि मिळवलें नाही
वाटलें जे आम्ही आहों
तोहि आम्ही नाही
आणि वर जें बोलतों
ते बोल आमचे नाहीत
घडवूं म्हणतों एक
घडतें भलतें कांही !
विश्वास मागूं पाहतों
आमचा आम्हां विश्वास नाही !

अरे, जें जें विसरलों आम्ही
जेथे जेथे घसरलों
लालचावून फितुर झालों
बेमान झालों, बेभान झालों,
मस्तावलों, सुस्तावलों
जें केलें—केलें नाही
त्या सर्वांचा पश्चात्ताप
आह्मां होऊन, न होऊन काय !
आमची आत्मवंचना
आहे इतकी जबर की
आश्चर्य नाही, मानलें जर
आम्ही अम्हांला संत कोणी !

आम्ही आहों जाणून
हे लोक भोळे
विसरतात आमचे चाळे
आम्हांवर विश्वासून
आह्मांवाचून आहे कोण
त्यांना तरी !

विसरतील हे लोक
विसरेल वर्तमान—आहे खरें
—पण इतिहास— !
इतिहास विसरणार नाही
क्षमा करणार नाही—हेंहि असेल खरें !
घडतील जे परिणाम
चुकवू आम्ही
भोगेल ते पुढची पिढी
उलटेल जर आह्मावरी
गर्जून उठेल
"तुह्मी जें केलें नाही
तें करणार आहों
घडविलें जें तुम्ही नाही
तें घडविणार आहों"

—तेव्हा आम्ही नसूं—
आणि असलों तरी
म्हणूं आह्मी
आमच्या वंचनेनेच
घडविली ही क्रांति
श्रेय त्याचेंहि घेऊं
आम्ही— !!!

अनुक्रमणिका

विचित्र 'तो' !

द. चिं. सोमण

★

पटलें क्षणांत जरी तें त्याला
नवल तथापि
एवढेंच हें मुळीं न पटलें !

कधी मध्यंतरीं
रंगवीत त्रसे जधी मी देखावा
वदला कानीं येत कुठूनसा,
"सुरम्य किती रंग हा हिरवा !"
निमूट करितां निश्चित सत्वर पिवळा निळा
म्हणे तात्काळ,
"हिरवा जरी लपवी पोटीं दुसरेच रंग,
लव न संशय !"
—करी नच मान्य स्वप्नांतहि परी
'वाटतो तसा नसावा निसर्ग.'

विचारमग्न असतां कधीं मी निश्चल अगदी
ओरडला कानीं अचानक तो,
"वाटलें मज पुतळाच तव
पूर्ण अचेतन आसनस्थित !"
पटे जरी तदा क्षणांत त्यास
"अचेतन जरी भासलें कांही
शाश्वती नसे असे अचेतन !"
—आतां मात्र मुळी घे न पटवून
'असावा निसर्ग सारा सचेतन; नसे अशक्य'

आणिक एकदां
रानटीं फुलें कुठूनशीं चार करून गोळा
दावीत मज वदला निश्चये,
"पिवळी धमक बघ तरी फुलें !"
दाखवितां पण पाकळ्यांवरचे तुषार लाल
कबूल केलें तात्काळ त्याने,
"पिवळालाल दोन्हीहि रंग फुलांमधे या !"
—करी न कबूल परी क्षणभर
'निसर्गाचाच मानव अंश.'

आणिक आज गांठली सीमा याने खरोखर
येऊन असाच वदला सहसा,
"जड निसर्ग प्रज्ञाशून्य पूर्ण !"
वदतां त्यास,
"निसर्गाचा अंश मानव प्राणी सप्रज्ञ परी !
करूं या समेट
म्हणूं निसर्गांश प्रज्ञाप्रधान !"
परी किंचाळत,
"मूढ तूं अत्यंत !"
गेला तो कुठेसा.

आपण

मनोहर म. देशपांडे

★

आपुल्याच अंधारांत
आपुल्याच एकांतांत
आपुल्याच दीप्तीसाठी
आपुलीच जळे ज्योत !
आपुल्याच एकांतांत
आपुल्याशी व्यभिचार
अंगावरून वाहती
जगताचे व्यवहार !
दुसऱ्याच्या डोळ्यांतुनी
आपणाला न्याहाळावे
सभोंवार कल्लोळांत
शब्द आपुले शोधावे !
आपलाच गळा कधी
दाबुनिया जीव घ्यावा
आणि आपुल्याच पोटीं
आपणच जन्म घ्यावा !
अशा अंधारीं जगावें
चांचपडत जीवन
ऐकूं न ये स्वतःलाच
स्वतःचेंच आक्रंदन !

चला भाई चला

व्यं. व. पुराणिक

★

चला भाई चला
भिकार – भोजना
सावरा लक्तरें
आवरा चिर्गुटें

आला धनिकांना
दयेचा रे पान्हा
पर्वणीचा लाभ
धावूं या घेण्याला

नयनांच्या खाचा
जरी तुट्का हात
पांगूळले पाय
घासतच चला

बसूं दाटी वाटी
नसे थाली वाटी
भूमीचेंच ताट
भूमीचीच वाटी

माध्यान्हीची वेळ
प्राण होती गोळा
नकोत किंकाळ्या
नको गलबला

फुगवून छाती
धनिक वाढती
फेकती जे हातीं
शीघ्र फस्त करा

नाही तरी रोज
नासकें कुजकें
टाकिती तुकडे
हांसडून शिव्या...

आजच्या निमित्ते
आकंठ गिळूं या
गोडगोड घांस
पोटांत भरूं या

बोलतात सारीं
वारला पुढारी
आठवून त्याला
देतात खायाला

मरोत पुढारी
असे वारंवार
येऊं दे दयेला
धनिकांच्या पूर

नाही तरी रोज
एकेका घासाशी
शिरीं पडतात
शिव्यांच्याच राशी

शिशिराच्या शेतां

य. द. भावे

★

शिशिराच्या शेतां
उन्हेचा विसावा
काळ्या निळ्या ओठीं
हुळहुळे शब्द
ढगाळले शब्द
मनपोकळींत
ओला ओला तळ

घातला वळसा
घेण्यासाठी.
अडखळतात
ढगाळले.
अंतरीं गिळले;
आली ओल.
ओल्या उंच भिंती

जाईल ही कधी
नसे तुझ्या मनीं
पडूं दे तयांना
चुकलीं माकलीं
प्रवास करीत
परावर्ती तेथे
रंगल्या उन्हेंत

हुडहुडी ?
पाडायाच्या भिंती
कांही भेगा.
येतील किरणें
ओलींतून.
होतां वक्र तेज
विसावांच !

दोन क्षणिका

मा. नी. गलगलीकर

★

(१)

खेळुं लागलीं मुलें अंगणीं
पडणाऱ्या घनधारांत
कपडे ओले, अंगहि ओलें
निथळति ओले केश मोकळे
थरथरती अन् सजल पापण्या
जधी गर्जती बादल काळे !
खेळुं लागलीं मुलें अंगणीं
पडणाऱ्या घनधारांत
तरीं दटावूं त्यांस लागलीं
वडीलधारीं रागांत !
स्तब्ध राहिला खिडकी मधला
मिटुनी पुस्तक मिटुनी डोळे
त्यास बोलवूं मात्र लागलें
खद्खदतें जळ अंगणांतलें !!

(२)

नवीन हिरवळ हिरवी हिरवी
नवे तृणांकुर लोहित हिरवे !
तसे तृणांकुर हस्तीं कवळुन,
दातीं चोखुन
तशा हिरवळीं स्वस्थ पहुडणें
जळ निळें...नभ निळें
निवांत अपुलें बघत राहणें
तोवर सगळी चिंता मिटणें
नसेल नसुं दे खोपट चिमणें
किलबिल करती पक्षी चिमणे
सावधान ती चिवचिव श्रवणें
तुडुंब भरल्या सुखीं नाहणें—
हें करण्याला वेळ न उरला
धिक् हें जीवन, धिक् हें जगणें !

परमेश्वराचा आवाज

लुई मुनोज मारिन*

★

शिपाई जसा
गंजलेल्या तलवारीचे
गुडघ्यावर टेकून दोन तुकडे करतो
तसेंच
माझ्या हृदयावर—
मी इंद्रधनुष्य मोडलें आहे.

लाल गुलाबी मेघांना—
मीं क्षितिजा पल्याड पळीवलें आहे.
नि माझीं स्वप्नं
तीं मी पार विसरून गेलों आहें.

कारण
मला जाणायचीं आहेत तीं स्वप्नं—
जीं नसानसांत मूर्च्छित आहेत—
लोकांच्या
जीं माझ्या चहासाठी घाम गाळतात.

क्षयाने चाळण झालेल्या फुप्फुसांची—
तीं स्वप्नं...
(थोडी हवा...थोडं सोनेरी ऊन)

भुकेने हुळहुळ्या झालेल्या आंतड्यांची—
तीं स्वप्नं...
(भाकर! नीट गुलाबी शेकलेल्या भाकरीचा
एक तुकडा)

अनवाणी पायांचीं स्वप्नं...
(देवा ! दगड गोटे कमी असूं दे...
फुटक्या वाटल्या कमी असूं दे...)
ओबड धोबड हातांचीं स्वप्नं
(थोडी मऊ हिरवळ ! मऊ मऊ रेशीम)
कुंठित, पददलित लोकांचीं स्वप्नं
(प्रेम ! जीवनाचें उन्मत्त चैतन्य) !!

मी परमेश्वराचा आवाज आहें
त्यासाठींच मी प्रचंड आंदोलन करतों
ते तारे
नि हे भुके कंगाल
सोबतीस घेऊन, मी निघालों आहें
नव्या पहाटे कडे...

---

* पोर्टोरिकन तरुण नवकवि.

कवि आणि कविता

'Bee' आणि 'पिंगा'

माधव गोपाळ देशमुख

★

'कवि आणि कविता' या भाषणमालेंतील आजच्या भाषणासाठी मी आधुनिक मराठी कवींपैकी पहिल्या दर्जाचे परंतु लोकप्रियतेपासून अत्यंत दूर असलेले 'बी' हे कवि निवडले असून आधुनिक मराठींतील फार कठीण समजली जाणारी त्यांची 'पिंगा' ही कविता चर्चेसाठी घेतली आहे. लोकप्रियतेच्या दृष्टीने 'बी' कवींचें नांव 'माझी कन्या' या कवितेशी विशेष निगडित आहे. अबालवृद्ध स्त्रीपुरुषांना ती बरोचशी मुखोद्गत आहे. 'माझी कन्या' ही महाराष्ट्रकाव्यसुंदरीच्या अंगावरील एक अमोल लेणें आहे, यांत शंकाच नाही! गाई पाण्यावर आल्या, गंगायमुना मिळाल्या, लंकेची पार्वती, विलासाची मोगरी, देवाच्या गांवाला जाणें अशा परिचित वाक्प्रचारांमुळे, अर्थानुकूल वेचक शब्दयोजनेमुळे, शब्दार्थश्लेषापासून तों उपमाव्यतिरेकादि अलंकाराच्या खुमारीमुळे, रसानुकूल छंद, माफक तत्वज्ञान व करुणाच्या तळावर जमलेल्या विविध भावच्छटा यांच्या संसृष्टीमुळे 'माझी कन्या' रसिकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडते, हें खरें. पण हे सर्व गुण म्हणजे कांही 'बी' कवींचें खरेंखुरें वैशिष्ट्य नव्हे!

किंबहुना 'माझी कन्या' मधील आत्मपर आशय, व हळुवार भावाविष्कार हे 'बी' कवींच्या काव्यांतील केवळ अपवाद होत. विभा आपटे आणि विमला प्रधान या बालमैत्रिणींचीं नांवें साक्षेपाने काव्यांत गोवणारा कवि आपलें स्वतःचें खरें नांव मात्र अगदी गुलदस्तांत ठेवतो व शेक्सपिअरच्या चालीवर—

What's in a name? that which we call rose,
By any other name would smell as sweet!

'नांवांत काय आहे?'—असें म्हणून स्वतः मात्र गुलदस्तांतील म्हणजे पुष्पपात्रांतील भ्रमर 'Bee' बनतो! 'फुलांची ओंजळ' या त्यांच्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिणारे आचार्य अत्रे म्हणतात की, "लाजाळूच्या पानाप्रमाणे 'बी' कवींचा लाजरा व हळुवार स्वभाव आहे" सर्वसामान्य प्रसिद्धिलोलुप कवींप्रमाणे त्यांची वृत्ति गाजावाजा करण्याची नाही ही गोष्ट खरी पण एवढ्यामुळे त्यांना 'दगडाआड दडून बसलेलें लाजरें फूल' समजणें बरोबर नाही. उलट, 'नांवांत काय आहे?' या कवितेंत 'बी' कवींचा दुर्दम्य आत्मविश्वास दिसतो. या कवितेचें रसग्रहण करण्यासाठी एका आचार्य देशपांड्यांनी नागपूरच्या 'पूजा' मासिकांत (जानेवारी १९४८) एक लेख लिहिला, त्यांनाहि या कवितेंत कवीची निरहंकारवृत्ति व सुमधुर शालीनतेची वृत्ति दिसली. त्यांनीहि 'या प्रमदवनांतरि शिरले—जे जन.

तरुलताचि अंगे झाले—आपण,
निजनामरूपाहि गेले—विसरुन,

या पंक्तींचा अर्थ आचार्य अत्र्यांप्रमाणेच रसिकपर लावून कवितेच्या आशयाचा विपर्यास केला! वस्तुतः निजनामरूपाहि विसरून जाणारे 'रसिक' नसून 'कवि' होत. नांवात काय आहे? याचा अर्थ 'बी' कवींचा नाजूक स्वभाव नाही किंवा 'नांवांत जादू आहे' हें हि त्याचें उत्तर नाही. खरा कवि आपल्या नामरूपादि उपाधि विसरून वर्ण्यविषयाशी तन्मय होतो. त्या तल्लीन अवस्थेतील काव्यानंद लुटणें हें रसिकाचें मुख्य कर्तव्य हा या कवितेचा आशय फारच थोडयांनी लक्ष्यांत घेतला! 'बी' कवींच्या इतरहि कितीतरी कवितांच्या बाबतीत अशीच दुर्मतें पसरलेलीं आढळतात. 'दीपज्योतीस' ही एकाकी स्त्रीवरील एक रूपकात्मक कविता आहे. पण तींत मर्मज्ञ टीकाकारांना हिंदु बालविधवेचा साक्षात्कार घडतो. यांत बिचाऱ्या 'बी' चा काय दोष? यवतमाळचे श्री. वामनराव देशपांडे व आचार्य अत्रे यांनी केलेल्या परिचयसत्कारामुळेच 'बी' हे कवि सर्वसामान्य वाचकांच्या विशेष करून डोळयांत भरले. परंतु आमचे 'आधुनिक कविपंचक' कार, 'पांच कवि' कर्ते आणि 'काव्यचर्चा' करणारे यांनी मात्र त्यांची दखलहि घेतली नाही! थोडक्यांत म्हणजे सामान्य जनांपासून 'बी' हे असामान्य कवि दूरच राहिले, हेंच खरें!

'बी' कवि लोकप्रियतेपासून जास्तींत जास्त दूर राहण्याचें मुख्य कारण म्हणजे त्याचें काव्य फार अवघड आहे असा पसरलेला गैरसमज, हें होय. त्यांच्या 'बेडगाणें' 'चांफा' आणि 'पिंगा' ह्या एकाहून एक अवघड कविता आहेत म्हणे! त्यांचा सुगम अर्थ लावावयाला हिमालयांतला एखादा सिद्ध पुरुषच पकडून आणावयास पाहिजे अशा अफवा उडालेल्या आहेत. विशेषतः 'पिंगा' ही कविता तर जणू-कांही क्लिष्टतेचा मेरुमणीच आहे. कारण येथे कवि शब्दमाधुर्याच्या मोहिनीला बळी पडला. त्यामुळे या कवितेंतील प्रत्येक शब्दाचा व कल्पनेचा सुसंगत अर्थ लावणें कठीण आहे. 'वेदांताविषयांतील क्लिष्ट परिभाषा यांची वृत्तबद्ध गुंतावळ प्राकृत मराठी वाचकांना उकलणें कालत्रयीहि शक्य नाही! —या कवितेसारख्या आणखी दुसऱ्या कविता लिहिण्याचा 'बी' कवींना मोह झाला नाही, या ठीकपणा-लाहि आधुनिक मराठी कवितेचें सुदैवच समजलें पाहिजे. हें झालें टीकाचार्यांचें भाष्य.

खरी गोष्ट अशी आहे की, वेदांतविषयांतील एक अगदी साधें तत्व 'पिंगा' या लहान मुलींच्या प्रसिद्ध खेळावरून काव्यात्मक रीतीनें अत्यंत बालबोध करून दाखविणारी फक्कड कविता, प्राचीन संतवाङ्मय हिशेबांत घेऊनहि, तमाम मराठी वाङ्मयांत दुसरी नाही! याच विषयावरील एकनाथांचीं तीन व तुकारामाचीं दोन प्रसिद्ध पदें लक्षांत घेतलीं तर ज्या अप्रतीम कवितेला स्वतः 'बी' नी 'पिंगा' या विषयावरील "माझें हें सहावें पद आहे" असें विनयाने म्हटलें, त्याची योग्यता सहजच कळून येईल.

(१) 'पिंगा' या कवितेचे पांच भाग पडतात. प्रास्ताविक भागांत कवीने 'हा पिंगा कुणाचा?' हें स्पष्ट केलें आहे.

माझा पिंगा गोड गडे
अद्वयरंगी रंगु चढे!

हे उद्‌गार काढणारी व्यक्ति म्हणजे कांहीं लोक समजतात त्याप्रमाणे 'आत्मा' नसून 'प्रकृति' आहे. "मी मूळची मोठी नाचण आहे व माझ्या पोटीं अनेक वृत्ति उत्पन्न झाल्या" असें अर्थात 'प्रकृती'च म्हणते. प्रकृतीचाच स्वभाव वृत्तिरुपाने नाचत राहणारा असा केला आहे. प्रकृतिपासून वृत्ति उत्पन्न होतात. "प्रकृति अहंकार, मन, मनाच्या वृत्ति आणि चैतन्ययुक्त काया (देह) इतक्यांचा मिळून पिंगा हा खेळ झाला आहे" असें खुद्द 'श्री'नीच या कवितेचें एका पत्रांत स्पष्टीकरण केलें आहे.

'पिंगा' या खेळांत एक मुलगी मधोमध उभी असते व बाकीच्या मुली तिच्याभोवतीं फेर धरून एकतानतेने नाचत असतात. कांहीं वेळाने तीहि बाकीच्या मुलींबरोबर त्या नृत्यवर्तुळांत भाग घेते व सर्वजणी जणू कांही एकपणाने पिंगा घालतात. त्या भर रंगांत आल्या म्हणजे त्यांच्या ठिकाणीं कुठलाहि आपपर भाव उरत नाही. तल्लीनतेच्या आनंदांत त्या दंग होतात. या दंग होण्यांत आपण दंग होत आहों, याची जाणीव त्यांना असतेच, व खेळ संपल्यावरहि आधीची दंग स्थिती न विसरतां आल्यामुळे गुंगीत त्या स्वतःभोवतीं फिरतच असतात. ही पिंगा खेळांतील मध्यवर्ती कल्पना लक्षांत ठेवली पाहिजे. 'पिंगा' कवितेच्या पहिल्या भागांत प्रकृतीपासून अनेक वृत्ति कशा निर्माण होतात याचेंच मोठें सुंदर वर्णन केलें आहे.

नाचण मुळची मी मोठी
उद्‌भवल्या माझ्या पोटीं
कोमल नवनीतापरिस
ज्योत्स्नेहुनि कांती सरस
दिग्‌रागाहुनि दिव्यतर
चंचल चपलेच्याहि पर
वृत्ति गोरट्या अकलंकी—
माय तशा झाल्या लेकी !

(२) प्रकृतीपासून निर्माण झालेल्या वृत्ति जेव्हा अंतर्मुख होतात तेव्हा वृत्ति आणि प्रकृति हा जन्यजननीसंबंध उरत नाही. प्रकृतीचा वृत्तीनिशी खेळ म्हणजे कमलाने आपल्या गाभ्यांत भ्रमरांना गोवून घेऊन स्वतःच्या सौरभरसराशीचा स्वतःच आस्वाद घेणें होय. ज्याप्रमाणे कमलाच्या प्रसन्न कोषांत सौरभरसराशी असतात, त्यांचा आस्वाद केवळ भ्रमरच घेऊं शकतात त्याप्रमाणे आपल्याच हृदयांत असलेला आत्मगंध व आत्मरस पोटभर लुटण्यासाठी वृत्ति ह्या भ्रमरी झाल्या व "जैसे भ्रमर परागु नेती । परि कमलदलें नेणती ।" असें हलुवारपणे स्वीकारून 'इंद्रियां नेणतां भोगिजे' अशा आत्मानंदाचा अनुभव घेतात.

गोंगाटाला थांबविलें
श्रवण मनाला कळुं न दिलें.
कौराल्याची नवलाई
रस चोरुन प्याल्या, बाई !

अंतर्मुख वृत्तीचा पिंगा हा अर्थात् प्रकृतीबरोबर चालणार; म्हणून प्रकृति म्हणते की, माझ्या वृत्तिरूपी प्रमदांचा संभार अनिवारपणे लोटून आला व त्यांनी माझा हात बळेंच धरून आपल्या नृत्यवर्तुळांत मलाहि सामील केलें. ज्यावेळी आम्ही सर्वजणींनी मिळून एकपणाने नाच मांडला त्यावेळी नेत्रांत धुंद नशा भरली होती, गात्रांत जीवन मुसमुसलें होतें; मी मोठी त्या लहान—असा कृत्रिम भेदभाव पार उडून गेला होता. मला म्हणजे प्रकृतीला वृत्तींचें बळ मिळतांक्षणींच सर्व विश्व आत्मसात् करतां आलें. म्हणजे प्रकृति आणि तिच्या वृत्ति यांच्या पिंग्यांत आता अशी स्थिति आली की वृत्तींचें साहाय्य घेऊन प्रकृतीने विश्व आत्मसात् केलें व पिंगा खेळांत ज्यावेळी भोवतालच्या मुलींबरोबर मधली मुलगीहि फेर धरून नाचूं लागते त्यावेळच्या स्थिती-प्रमाणे, प्रकृति व वृत्ति यांचीहि स्थिति—

अनेक नेत्रांचें बघणें,
अनेक कंठांचें गाणें,
अनेक चरणांचें जाणें,
अनेक चित्तांचें स्फुरणें,
दृष्टी, वाणी, गती, मती—
एकच येथुन—तेथुन ती.

अशी एकमुख झाली. कवि 'बी'नी केलेलें वर्णन म्हणजे 'सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।' या श्लोकावरील ज्ञानेश्वरीप्रमाणे (अ. १५, ४२१)—

दों होटिं एक बोलणें । दोहिं चरणीं एक चालणें
तैसें पूसणें, सांघणें । तूझें माझें ॥

याची आठवण करून देणारेंच आहे. किंवा 'अमृतानुभवां'तील पहिल्या प्रकरणांतील प्रकृतिपुरुषाहून सृष्टि भिन्न नाही हें सांगतांना ज्ञानेश्वरांनी काढलेल्या—

दों कानीं एक श्रुति । दों फुलीं एक दृति
दों दिवीं दीप्ति । एक जैसी ॥१८॥
दों ओठीं एक गोठी । दों डोळां एकी दिठी
तेविं दोघें जिहीं सृष्टीं । एकाचि जे ॥ ९॥

या ओव्यांचा हा कळत—नकळत केलेला सुंदर अनुवादच होय !

(३) विश्वाभास मावळवून टाकणारा हा अद्वय प्रकाश मिळतांच पिंग्याचें लौकिक स्वरूप जाऊन तो अलौकिक बनला. आत्मानंदाच्या अनुभवामुळे प्रकृतिसिद्ध दुर्बलपण नष्ट होऊन लौकिक आनंदाचें अलौकिक स्वरूपांत कसें रूपांतर होतें याचें शब्दचित्रण ज्ञानेश्वरानंतर कविवर्य 'बी'च करूं जाणोत. माझा वैभवशाली पिंगा द्वैताच्या मर्यादा टाकून अद्वयरंगांत कसा रंगला; जारज, स्वेदज, अंडज ह्या चारी खाणी व परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चारी वाणी त्याला कशा आकलन झाल्या व तो पिंगा स्वर्गाला जाऊन त्याने स्वर्गाला पृथ्वीवर कसें आणलें, स्वर्गसुख देखील तळपायाखाली दडपून त्यावर प्रकृतीने आपला नाच कसा मांडला हें वर्णन मूळांतूनच वाचलें पाहिजे. प्रकृतीचे जीर्णबंध तुटून तिला आत्मस्वरूपाचें ज्ञान कसें झालें हें Bee नी

मी माझी मज सापडलें !

या चारच सूचक शब्दांत केलें आहे. आता पिंगा म्हणजे ही स्थिति राहिली नाही; कारण—

तारा सारंगीवरल्या
समसूरी लागुनि गेल्या
भूतें आलीं साम्याला
मोहर आनंदा आला !
विश्वबंधुता एकांगी
न पुरे माझ्या पासंगीं
भूतें मी— मजला नातें—
द्वैत कसें हें संभवतें ?

आत्मज्ञानाच्या सामर्थ्यावर भूतें आणि मी हा वेगळेपणाच जेथे नष्ट होतो तेथे जाणें —येणें (जन्म—मरण), भाव-अभाव हीं द्वंद्वें कुठून राहतील ?

ऐसिया प्रतीतिबोधसागरीं । तूं आपणपेंयातें कल्लोलु एकु करीं
मग एऱ्हवीं पाहसि तंव चराचरीं । तूंचि असती ।। ज्ञा. ९.९२ ।।

या ज्ञानेश्वरोक्ती प्रमाणे कवि Bee यांनीहि—

बुद्बुद हो की कल्लोळ
अर्णवपद माझें अढळ !

असे उद्गार काढून प्रतीतिबोधसागराची अविचल स्थिति वर्णिली आहे. या वेळी कवीच्या दृष्टीसमोर संस्कृताचा महाकवि भवभूति याच्या पुढील पंक्ति असतील. काय ?—

आवर्तबुद्बुदतरंगमयान् विकारान्
अंभो यथा सलिलमेव हि तत्समग्रम् ।।

(४) आत्मज्ञान झालेला मनुष्य देखील आत्म्याच्या वेगळेपणाचें ज्ञान विसरूं शकत नाही ! प्रकृतीलाहि आपल्या अढळपदाचें कांही झालें तरी विस्मरण होऊं शकत नाही म्हणून प्रकृति म्हणते—

काय करूं—पण कसें करूं !
मीपण माझें कां विसरूं ?
' दीपकळे गे ! दीप्तीला
सोड '—म्हणे का बुध तिजला ?

दीपकळी आणि तिची दीप्ति यांच्या अद्वैताचा दृष्टान्त ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवाचें' कोंदण करून ठेवला आहे. दीपकळीला तिची दीप्तीचीं लुगडीं 'वेढी' हि म्हणतां येत नाही किंवा 'सोड' हि म्हणतां येत नाही. ती त्यांवाचून राहीलच कशी ?

दीप्तीचीं लुगडीं । दीपकाळेके ! तूं वेढी
हें न म्हणतां ते उघडी । ठाके काई ? अ. ९.४६

ज्ञानेश्वरांच्या या दृष्टान्ताचाच 'बी' कवींनी किती समर्पक उपयोग करून घेतला आहे? दीपकळीची जशी दीप्ति तद्वत् माझें म्हणजे प्रकृतीचें स्वयंपण हें म्लानपणाविण लावण्य, क्षीणपणाविण तारुण्य, मंगल मांगल्यायतन, नित्यानंद निरावरण व विश्ववैभवालंकरण आहे!

(५) पिंगा जसजसा अद्वयाच्या भर रंगांत येत आहे तसतसा प्रकृतीच्या अंगाला आत्मभाव भिडत आहे. आत्मभावाची प्रतीति झाल्यावर पिंगा किंवा ज्ञानेश्वरांच्या शब्दांत हें 'द्वैत स्वप्न' वाया जायला पाहिजे पण तुकारामांच्या अभंग वाणींत 'बी' सांगतात—

पिंगा आला भर रंगा
आत्मभाव भिडला अंगा.
नाच परी मम राहीना,
स्वभाव मुळचा जाईना.

कुंभाराचें चाक मडकें तयार झाल्यावरहि पूर्वी मिळालेल्या गतीमुळे निदान कांही काळ तरी स्वयंपणाने फिरतच राहतें त्याप्रमाणे कुलालचक्रवत् आत्मज्ञान झालेल्या माणसाकडूनहि जगराहटीप्रमाणे देहधर्माच्या क्रिया घडतच असतात. पिंगा खेळणाऱ्या मूळ प्रकृतिरूप मधली मुलगी हिच्यासगट भर रंगांत दंग झाल्यानंतर चक्राकार भ्रमणामुळे आधीची दंग स्थिति विसरता न आल्यामुळे खरोखर खेळ संपल्यानंतरहि त्या गुंगींत स्वतःभोवती फिरतच राहतात, खेळ संपल्यावरहि खेळाची गुंगी टिकून राहते. आनंद अवीट राहतो. आत्मानुभवी माणसाचें जीवन देखील आत्मानंदाच्या मूळ स्वभावधर्मास अनुसरून जीवनानंद घेत घेत सकल विश्वांत आपल्या सिद्धराहणीने शांतीचें साम्राज्य स्थापन करीत राहते. म्हणूनच मूळचीच 'नाचण' असलेली प्रकृति आपला 'मूळ स्वभाव जाईना!' म्हणून आपल्या वृत्तींना उद्देशून सरते शेवटीहि हेंच सांगतें—

नाचा माझ्या वृत्तींनो!
नाचा भुवन समूहांनो!
नाच आपला भूतांला—
होवो शांतिप्रद सकलां!

आत्मज्ञानी माणसाची ज्ञानोत्तर वागणूक ही देखील 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः' अशीच नसते कां?

आपल्या जीवनाच्या अनुभवाचें व विचाराचें सार अत्यंत प्रतिभाशाली, संस्कारपूर्ण अशा काव्यमय शब्दांनी सुलभ करून सांगणारी अशी ही एक सरळ, सुसंगत व सुगम कविता आहे. पिंग्याचा विषय, त्याची मांडणी व त्यांतील भावगर्भ तत्त्वज्ञान हें संपूर्ण मराठी वाङ्मयांत अजरामर आहे. येथे क्लिष्टता, अवघडपणा यांचा सवालच नाही. सवाल काव्याच्या स्वरूपाचा आहे. मराठीच्या सर्वश्रेष्ठ आचार्योंनी काव्यस्वरूपाचें परम ध्येय आधीच सांगून ठेवलें आहे—

वाचें बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व
रसिकत्वींहि परतत्त्व — स्पर्शु जैसा॥

या परतत्त्वाचा साक्षात्कार घडवून देणारे आधुनिक कवींत दोघेच झाले. एक केशवसुत आणि दुसरे बी. परतत्त्वाचा स्पर्श घडविण्यासाठी केवळ शब्दार्थ वा अभिधालक्षणा या तोकड्या पडणारच. केवळ अलंकार, गुण व रीति हें साहित्य, अथवा वक्रोक्ति, अनुमान, औचित्य किंबहुना रसतत्त्व हींहि येथे ठेंगणें होतें. वस्तुध्वनि आणि अलंकारध्वनि यांचें पर्यवसान सर्वथा रसांतच होतें हा अभिनव सिद्धान्त मान्य करूनहि पिंगा या काव्यांत 'शांत' रसाची परिपुष्टि सिद्ध केल्याने त्याचें आकलन विशेष हृद्य होईल असें नाही. कारण 'पिंगा' म्हणजे केवळ रूपक ध्वनि नव्हे! 'पिंगा' हें एका जीवनव्यापि आत्मतत्त्वाचें सूक्ष्मातिसूक्ष्म असें एक प्रतीक आहे. या प्रतीकाचें मूळ केशवसुतांच्या 'झपूर्झा' मध्ये शोधणें उचित नव्हे. खुद्द 'बी' कवींनीच सूचित केल्याप्रमाणे 'पिंगा' हा शब्द व त्याचा विषय त्यांनी मराठी संतकवींपासून उचलला एवढें मात्र खरें. केवळ शब्द योजनेकडे लक्ष दिलें तरीहि—

माझा पिंगा गोड गडे
अद्वयरंगीं रंग चढे!

× × ×

पिंगा गेला स्वर्गाला
भूवरि त्या घेउनि आला—

या पंक्तींचें साम्य 'झपूर्झा'त शोधण्याऐवजी एकनाथांच्या याच विषयावरील अभंगांतील—

निराकाराचा आकार झाला
त्यातच माझा पिंगा जन्मला
निराकारासी घेऊन आला ॥१॥ एक० गाथा १७८

या ठिकाणीं सापडणें अधिक संभवनीय आहे.

अर्थात् पिंग्याचें प्रतीक हें 'झपूर्झा'इतकें अद्ययावत् नसलें तरी त्याचें आयोजन हें प्रतिभापूर्ण व अभिनव आहे. रचनेंतील नावीन्यामुळेच हें सत्काव्य सखोलपणांत 'झपूर्झा'हूनहि वरच्या दर्जाचें व वेगळेंच वाटतें. झपूर्झाची पार्श्वभूमि ही कांही प्रमाणांत पाश्चात्य सुवर्णनिधीची आहे तर पिंगा हा आपल्याच सुवर्णभूमीवर खेळला गेला आहे; आपल्याच बगिच्यांत फुलला आहे! टिलियर्ड या इंग्रजी टीकाकाराने आपल्या "काव्य—ऋजु आणि वक्र" (Poetry–Direct and Oblique) या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणे—

'एखादें पक्कें झालेलें प्रतीक पुनः पुनः वापरलें तर तें यशस्वी म्हणजे परिणामकारक होत नाही! (Any very wide use of the fixed symbol is not likely to succeed)' पण आधारासाठी 'पिंग्याचें' रूळलेलें व स्थिर झालेलें प्रतीक घेऊन त्यावरील 'बी' नी केलेलें हें सहावें पद, आजहि पहिलेंच वाटेल इतकें ताजें तवानें आहे!

याचीं कारणेंहि उघडच आहेत. अकोल्यासारख्या ठिकाणी एका कारकुनाचें साधें जीवन जगूनहि त्यांतील सुखदुःखाचे कढ त्यांनी आपल्या काव्याला लागू दिले नाहीत.

ते ' रसरीत्यादिक साहित्यांतील दगडांच्या चुरांत ' कधी चूर झाले नाहीत. आपल्या खऱ्या नांवाप्रमाणे त्यांनी आपलें खरें व्यक्तित्व हेंहि अथांग अव्यक्तांत ठेवून दिलें. तेथूनच तें निजलीलेने वस्तुनिष्ठ झालें व तिने अभियुक्त प्रसाधनशासनहि निर्माण करून दाखविलें. 'कविवंदन' या सुप्रसिद्ध कवितेंत त्यांनी—

काव्य नव्हे शब्दांचा सुंदर नादमधुर खेळ
अर्थचमत्कृतीचाहि नोहे डोंबारी खेळ
निसर्ग सृष्टींचीं सादृश्यें नीतिपाठ भव्य
थाटदार घाटाची रचना केवळ नच काव्य !

अशी अन्यव्यावृत्ति करून त्यांनी ऐश्वर्यात्मक सामर्थ्याच्या निर्माणक्षमतेमुळे जें सौंदर्याचें दिव्य प्रस्फुरण निर्माण केलें तें स्वानंदाचें जिव्हारच आहे. रांजणांत मृगजळाचें पाणी घालून गीर्वाणप्रचुर हीनरचना करणारे पढीक त्यांतच भलेहि कुजून जावोत परंतु सौंदर्याच्या कुजांत रुंजी घालणारा हा भ्रमर मराठी काव्यरसिकांना नेहमीच खरें समाधान देत राहणार ! त्यांच्या काव्यामुळे आमची अभिरुचि सुधारून, सहानुभूतीची क्षितिजें विशाल होतील. आधुनिक काव्यांत अभावानेच जाणवणारा भक्कम आशावाद आमच्या पाठीचा कणा ताठ ठेवील व भारतीय सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या या कठीण काळांतहि त्याच्या डंकाचा बंडखोर आवाज आम्हाला सुधारणेचा मार्ग आक्रमण करण्यासाठी धीर देईल. हें सर्व करण्यासाठीच सरस्वतीच्या या कंठमणीपुढे आम्ही नतमस्तक होऊन आनंदसमीरणाने डोलणाऱ्या त्यांच्या काव्यतरूची टपटपां खालीं पडणारीं कुसुमें आदरांजलींनी लुटून घेऊं* !

सूचना

युगवाणीचा हा वर्षा-अंक वाचकांना देतांना एक सूचना करावयाची, ती अशी की वि. सा. सं. च्या सभासदांना जानेवारी ते डिसेंबर पर्यंत अंक मिळत असतात. यापूर्वी जे सभासद झाले त्यांना जानेवारी ते जुलै पर्यंतचे अंक मिळाले नाहीत अशी तक्रार कानीं येत आहे. जानेवारी फेब्रुवारीचे अंक शिल्लक नाहीत. जूनचा अंकहि संपला आहे पण बाकी अंक आम्ही सभासदांनी पत्रद्वारे ता. ३१ ऑगस्ट पर्यंत कळविल्यास पाठवूं. तरी सभासदांनी एकदा लक्ष घालून स्वतःची आणि आमची गैरसोय दूर करावी अशी विनंति.

—कार्यकारी संपादक

* भारतीय आकाशवाणी, नागपूर, यांच्या साभार अनुज्ञेने.

टिपणें

(१) राजभाषा अधिनियमांत दुरुस्तीची आवश्यकता

भारतांतील दुभाषी व बहुभाषी राज्यांत भाषाभाषांतील संघर्ष व तज्जन्य भाषिक राजकारण अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण करतात. हे प्रश्न सोडविण्याचा एक मार्ग म्हणजे भाषावार प्रांतरचना तात्वडतोब अमलांत आणणें हा होय. पण जोंवर हें घडून येत नाही तोंवर भाषिक संघर्ष विकोपास जाऊं नयेत यासाठी कांही दुय्यम प्रतीच्या मार्गांचाहि अवलंब करणें भाग पडतें. या दुय्यम मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे द्विभाषी अथवा बहुभाषी राज्यांतील प्रत्येक महत्त्वाच्या भाषेला कायद्याने प्रादेशिक राजभाषेचा मान देणें आणि भाषाभाषांतील संघर्ष काटेकोर न्यायबुद्धीने शक्य तितकें कमी तीव्र होतील अशी व्यवस्था करणें.

या दृष्टीने पाहतां मध्यप्रदेश सरकारने 'राजभाषा अधिनियम, १९५०' या नांवाचा जो कायदा प्रांतीय विधानसभेंत पास करून घेतला तो स्वागतार्हच मानला पाहिजे आणि या कायद्याचें या प्रांतांतील मराठी व हिंदी जनतेने स्वागत केलेंहि आहे. पण हें स्वागत करतांना या अधिनियमांत जे दोष राहून गेले आहेत त्याकडेहि मराठी जनतेच्या पुढाऱ्यांनी सरकारचें लक्ष वेधलें आहे. या बाबतींत विदर्भ साहित्य संघाने जे प्रयत्न चालविले आहेत ते विशेष महत्वाचे मानले पाहिजेत. वि. सा. संघाच्या कार्यकारिणीने ता. २१ जानेवारी १९५१ इ. रोजीं या प्रश्नाबाबत एक महत्वाचा ठराव केला. या ठरावानुसार सरकारकडे एक शिष्टमंडळहि गेलें आणि एवढ्याने हा प्रश्न समाधान कारक रीतीने निकालांत न निघाल्यामुळे अकोल्यास भरलेल्या संघाच्या वार्षिक संमेलनाने कार्यकारिणीच्या ठरावाला पाठिंबा देऊन हा प्रश्न धसास लावण्यासाठी एक उपसमिति नेमली. या उपसमितीने कायदे-पंडितांच्या सहकार्याने राजभाषा अधिनियमाला एक रीतसर दुरुस्ती तयार केली व ती प्रांतीय विधानसभेच्या अनेक सदस्यांकडे रवाना केली. सुमारे सहा सात सदस्यांनी (आमदारांनी) या दुरुस्ती बिलाची रीतसर सूचना मध्यप्रदेश विधान सभेच्या अधिकाऱ्यांना दिली आहे आणि म्हणून येत्या ता. २० ऑगस्ट पासून मध्यप्रदेश विधान सभेचें जें अधिवेशन सुरू होणार आहे त्यांत या दुरुस्ती बिलाचा विचार होईल असा संभव दिसत आहे.

दुरुस्तीचें स्वरूप

राजभाषा अधिनियमांत ही दुरुस्ती कां सुचवावी लागली व तिचें स्वरूप काय, हें स्पष्ट करणें जरूर आहे.

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमांत फक्त चार कलमें आहेत. पहिलें कलम 'लघु संज्ञा व व्याप्ति' या बाबतचें आहे आणि दुसरें कलम व्याख्येबाबतचें आहे.

हीं दोन्ही कलमें अविवाद्य अशीं आहेत: कलम ३ व ४ यांबाबतच दुरुस्तीची आवश्यकता आहे. ती कां तें आपण पाहूं.

कलम ३ चें पोटकलम (१) येणे प्रमाणे आहे.

" ३ (१) यापुढे केलेल्या तरतुदीस पात्र राहून हिंदी आणि मराठी या सर्व कामासाठी ह्या राज्याच्या राजभाषा राहतील. "

हें कलमहि निर्विवाद आहे. एवढेंच नव्हे, तर या कलमामुळे हिंदी व मराठी या दोन्ही भाषांना मध्यप्रदेश राज्यांत राजभाषेचा कायदेशीर मान प्राप्त झालेला आहे. मध्यप्रदेश सरकारचें या राजभाषा अधिनियमाबाबत जें स्वागत करण्यांत येतें तें यासाठी कीं, त्याने हिंदीच्या बरोबरीने मराठी भाषेलाहि मध्यप्रदेशांत राजभाषेचा मान प्राप्त करून दिला आहे. मुंबई राज्यांत देखील हें अद्याप घडून आलेलें नाही, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

येथपर्यंत सर्व कांही ठीक आहे. पण अधिनियमांतील या पुढचा भाग मराठीला दुय्यम स्थान व हिंदीला अधिक मानाचें स्थान प्राप्त करून देणारा असल्यामुळे त्यांत दुरुस्ती होणें आवश्यक आहे, असें विदर्भ साहित्य संघाचें मत आहे. पहिली दुरुस्ती कलम ३ (२) ला सुचविण्यांत आली आहे. हें कलम येणे प्रमाणे आहे.

—कलम ३ [२]—

" ३ (२) अधिसूचनेंत निर्देशिलें असेल त्या कोणत्याहि प्रदेशांत आणि निर्देशिलें असेल त्या तारखेपासून निर्देशित केलें जाईल त्या सरकारी कामाकरतां हिंदी किंवा मराठी अथवा या दोन्ही भाषा वापरल्या जातील, असें अधिसूचनेद्वारे फर्मावण्याचा राज्यसरकारास अधिकार आहे"

हें कलम सकृद्दर्शनी विशेष आक्षेपार्ह वाटत नाही. हिंदी व मराठी या दोन्ही भाषांना राजभाषेचा समान दर्जा कलम ३ (१) मध्ये दिल्यानंतर मध्यप्रदेशाच्या कोणत्या भागांत हिंदी व कोणत्या भागांत मराठी ही राजभाषा म्हणून प्रत्यक्ष उपयोगांत आणली जाईल, अथवा कोणत्या भागांत व कोणत्या बाबीसाठी ही अगर ती अथवा दोन्ही भाषा राजभाषा म्हणून वापरली जाईल, हें अधिसूचनेद्वारे जाहीर करण्याचा अधिकार कलम ३ (२) प्रमाणे राज्यसरकारास देण्यांत आला आहे. हें उचितहि आहे. पण हा कलम ३ (२) चा नियम आहे तसाच राहूं दिला तर एखादें राज्यसरकार एखाद्या मराठी विभागांत हिंदी अथवा मराठीच्या जोडीला हिंदी ही भाषाहि अधिसूचनेद्वारे राजभाषा म्हणून उपयोगांत आणूं शकेल. निदान असें करण्याला या अधिनियमांत मुळींच प्रत्यवाय दिसून येत नाही. सामान्यतः अशी चूक कोणतेंहि राज्यसरकार करणार नाही हें मान्य केलें तरी हिंदी भाषी वा मराठी भाषी लोकांना अधिसूचनेबाबतच्या आपल्या अधिकारामुळे अन्याय करण्याचा अधिकार राज्यसरकाराकडे ठेवणें हें रास्त नाही. म्हणून या कलम ३ (२) च्या नियमाला एक दुरुस्ती सुचविण्यांत आली आहे. ही दुरुस्ती या नियमाला एक पुस्ती (proviso) म्हणून जोडण्यांत यावी, अशा स्वरूपाची आहे. ती इंग्रजींत येणेप्रमाणे आहे. " A proviso be added to section 3 (2) as follows —

" Provided however that while issuing the notification the State Government will ensure that Marathi shall be used in respect of official purposes in all areas of the State in which the population is predominalntly Marathi speaking and that Marathi shall have equal treatment in all official purposes."

याचा सारांश असा की, मध्यप्रदेशाच्या कोणत्या विभागांत कोणती भाषा 'राजभाषा' म्हणून सरकारी कामासाठी उपयोगांत आणली जाईल हें अधिसूचनेद्वारे जाहीर करतांना ज्या विभागांत मराठी भाषा बोलणारे लोक बहुसंख्य असतील त्या विभागांत मराठी हीच सरकारी कामाची भाषा म्हणून वापरण्यांत येईल याची दक्षता राज्यसरकारने बाळगली पाहिजे आणि मराठीला सरकारी कामांत समानतेची वागणूक मिळाली पाहिजे.

ही पुस्ती जोडणें कां आवश्यक आहे हें वर सांगितलेंच आहे. मराठी भाषी विभागांतहि सरकारी कामासाठी हिंदी भाषा वापरली जाईल अथवा हिंदी व मराठी अशा दोन्ही भाषा वापरल्या जातील असें अधिसूचनेद्वारे जाहीर करण्याचा जो अतिव्याप्त अधिकार कलम ३ (२) मध्ये राज्यसरकारास देण्यांत आला आहे तो मर्यादित होईल. आणि मराठी विभागांत मराठी भाषा आणि हिंदी विभागांत हिंदी भाषा हींच सरकारी भाषा म्हणून उपयोगांत आणली जाईल, असें बंधन या पुस्तीमुळे राज्यसरकारावर लादलें जाईल व त्यामुळे अधिसूचनेच्या अधिकाराचा संभाव्य दुरुपयोग अशक्य होईल.

दुसरी दुरुस्ती

वरील दुरुस्तीपेक्षाहि दुसरी एक जी दुरुस्ती सुचविण्यांत आली आहे, ती अधिक महत्त्वाची आहे. ती केवळ दोन शब्दांचीच आहे. पण हे दोन शब्द जोडले गेल्यास मराठी भाषेवर होणारे सर्व संभाव्य अन्याय ताबडतोब संपुष्टांत आणले जातील आणि हिंदी व मराठी या दोन्ही भाषांना खऱ्याखुऱ्या अर्थाने समान दर्जा प्राप्त करून देण्याचें श्रेय सरकारला मिळेल. ही दुसरी दुरुस्ती अधिनियमाच्या कलम ४ ला सुचविण्यात आली आहे. हें कलम ४ येणेप्रमाणे आहे :

विधेयकें वगैरेंत वापरण्याची भाषा

" ४ (१) पुढील बाबींसाठी वापरण्याची भाषा ही, राज्यसरकार त्यांपैकी प्रत्येक बाबतींत् अधिसूचनेद्वारे नेमून देईल त्या तारखेस व तेव्हापासून, हिंदी राहील " ज्या बाबींचा यात उल्लेख केला आहे त्यांची जंत्री या कलमाच्या पुढील भागांत (अ) ते (ड) या पोटकलमांत दिली आहे. " (अ) राज्यविधानसभेंत सादर करावयाचीं सर्व विधेयकें व त्यासाठी मांडावयाचीं सर्व संशोधनें; (ब) राज्यविधान सभेने संमत केलेले सर्व अधिनियम; (क) भारत संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये जारी करावयाचे सर्व अध्यादेश; (ड) भारत संविधानान्वये किंवा संसदेने अथवा राज्य विधानमंडळाने केलेल्या कोणत्याहि कायद्यान्वये राज्यसरकारने काढलेले सर्व हुकुम, नियम, नियमनें आणि पोटकानू".

दुरुस्ती जी सुचविली आहे ती कलम ४ (१) चा आरंभीचा भाग जो वर दिला आहे त्यांतील ' हिंदी राहील ' असे जे शब्द शेवटी आहेत त्या ऐवजी " हिंदी व मराठी राहील " असे शब्द सुचविले आहेत. ' व मराठी ' हे दोनच शब्द नवे सुचविले आहेत.

पं. मिश्रजींचें समर्थन

शिक्षण मंत्रि माननीय पं. मिश्रजींच्याकडे विदर्भ साहित्य संघाचें शिष्टमंडळ गेलें असतां पं. मिश्रजींनी असा खुलासा केला की, ' ' कलम ४ मध्ये दिलेल्या बाबींसाठी ' हिंदी ' या एकाच भाषेचा उपयोग जरी नमूद करण्यांत आलेला असला तरी प्रत्यक्षांत हिंदी व मराठी ह्या दोन्ही भाषा या सर्व बाबींसाठी वापरण्याचा प्रघात सरकारने चालू केला आहे. उदाहरणार्थ, विधेयकें, सूचना, अधिनियम, अध्यादेश हुकुम इ. सर्व हिंदी व मराठी अशा दोन्ही भाषांतून जाहीर केले जातात. व्यवहार हा असा असल्यामुळे कायद्यांत दुरस्ती करण्याचें कारण नाही. कायद्यांतील या कलमांत हिंदीच्या जोडीला ' मराठी ' न घालण्याचें कारण असें की, कोर्टांत ह्या बाबींबाबत एखादें प्रकरण निवाड्यासाठी गेल्यास कोणत्या तरी एकाच भाषेंतील मजकूर (version) हा प्रमाण मानला जावा या हेतूनेच वरील बाबींसाठी हिंदी हीच भाषा नमूद करण्यांत आली आहे. अधिनियमादि प्रकारासाठी दोन्ही भाषांतील ' व्हर्शन्स ' प्रमाण मानलीं गेल्यास न्यायनिवाड्याच्या कामांत फारच गोंधळ माजण्याचा संभव आहे. म्हणून न्यायनिवाड्याच्या सोयीसाठी हिंदी भाषेंतील ' व्हर्शन ' हें प्रमाण राहील व जनतेच्या उपयोगासाठी ह्या सर्व बाबींच्या बाबतींत मराठी भाषेचाहि उपयोग केला जाईल, अशी व्यवस्था आम्ही केली आहे. '

पं. मिश्रजींचें हें समर्थन अगदीच अर्थशून्य आहे असें म्हणतां येणार नाही. न्यायालयांत एकाच अधिनियमाचीं, आदेशाचीं वा हुकमाचीं मराठी व हिंदी हीं दोन्ही रूपें सारखींच प्रमाण मानलीं गेल्यास त्यांचा अर्थ लावतांना न्यायाधिशांना फार अडचण जाईल, हें खरें आहे. पण हें समर्थन सादर करतांना पं. मिश्रजींच्या हें ध्यानांत आलें नाही की, न्यायालयांच्या आणि केंद्रीय व प्रांतिक कायदे मंडळांतील विधेयकें, अधिनियम, इत्यादींच्या बाबतींत, ' मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमांत ' कांहीहि असलें तरी भारत संविधानाच्या (घटनेच्या) आर्टिकल ३४८ मध्ये असें नमूद केलें आहे की, या बाबींची अधिकृत भाषा ही इंग्रजीच राहील आणि जोंवर भारत संसद या बाबत निराळा कायदा करणार नाही तोंवर कायदे व न्यायालयें यांची अधिकृत भाषा इंग्रजी हीच चालू राहील. म्हणून ' मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५० ' यांतील कलम ४ मध्ये त्यांत नमूद केलेल्या बाबींसाठी हिंदी हीच अधिकृत भाषा म्हणून जरी घोषित करण्यांत आलेली असली तरी तेवढ्यामुळे इंग्रजीचें अधिकृत भाषा म्हणून जें स्थान भारत संविधानांत ग्रथित झालें आहे तें हिरावून घेतलें जाऊं शकत नाही. कारण घटनाकायद्यांतील कलम ३४८ प्रमाणे कायदेमंडळांत मांडण्यांत येणारी सर्व विधेयकें, अधिनियम इत्यादि यांची अधिकृत भाषा आणि कोर्टांतील अधिकृत भाषा ही अद्याप इंग्रजी हीच आहे.

कायद्याची वस्तुस्थिति ही अशी असल्यामुळे मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमांतील कलम ४ मध्ये हिंदी व मराठी ह्या दोन्ही भाषा निर्देशिल्या गेल्यास कोणतीहि कायदेशीर वा न्यायालयीन अडचण निर्माण होणार नाही. कारण कोर्टांत अधिकृत

भाषा म्हणून या दोन्ही भाषांना मारख्याच मन्जात्र आहे आणि संसदेने या बाबत नवीन कायदा पास करीपर्यंत कोर्टात इंग्रजी हीच अधिकृत भाषा मानली जाणार आहे.

कायदा व प्रादेशिक राजभाषा

असें जर आहे तर 'मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०' याला कायद्यांत अर्थ तरी काय उरतो, असा प्रश्न कोणी विचारील. या प्रश्नाचें उत्तर येणे प्रमाणे आहे:—

भारत संविधानाच्या विभाग १७ (Part XVII) मध्ये 'सरकारी भाषा' अथवा 'राजभाषा' (official language) याबाबतचे नियम देण्यांत आले आहेत. या विभागाचा पोटविभाग २ (chapter II) मध्ये 'प्रादेशिक भाषा' ही कोणत्याहि राज्यांत (State) 'राजभाषा' करावयाची झाल्यास काय केलें पाहिजे हें नमूद केलें आहे. या पोटविभागांतील नियमांचा आधार घेऊनच 'मध्य प्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०' तयार करण्यांत आला आहे व म्हणून तो संविधानांतील नियमांशी पूर्ण सुसंगत असा आहे. पण संविधान, विभाग १७, पोटविभाग ३ मध्ये सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट, इ. साठी कोणती भाषा प्रमाण मानली जाईल याबाबतचे जे नियम आहेत त्यांत आरंभीच असें म्हटलें आहे की, ' Notwithstanding any thing in the foregoing provisions of this Part, until Parliament by law otherwise provides—" म्हणजे संविधान विभाग १७ मधील पोटविभाग १ व २ यांत कांहीहि म्हटलेलें असलें तरी देखील सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट यांत पेश केलीं जाणारीं विधायकें, संशोधनें आणि केंद्रीय व प्रांतीय कायदेमंडळांत पास झालेले अधिनियम (कायदे) आणि सरकारी हुकुम इ. यांची अधिकृत भाषा इंग्रजी हीच राहील. (The authoritative texts...shall be in the English language ").

याचा अर्थ असा की, न्यायालयाखेरीज इतर सरकारी कामासाठी कोणत्याहि प्रादेशिक भाषेला संविधान—विभाग १७, पोट विभाग २ मधील नियमानुसार सरकारी वा राजभाषा म्हणून राज्य-कायद्याने मान दिलेला असला तरी न्यायालयांच्या क्षेत्रांत अधिकृत भाषा इंग्रजी हीच मानली जाईल. आणि जोंवर भारतीय संसद संविधान कलम ३४८ मध्ये म्हटल्याप्रमाणे या बाबत नवीन कायदा करीत नाही तोंवर न्यायालयांत इंग्रजी हीच प्रमाण भाषा म्हणून कायम राहणार आहे. सारांश, 'मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०' हा कायदा संविधान-विसंगत नसला तरी न्यायालयांच्या क्षेत्रांत या अधिनियमांत म्हटल्याप्रमाणे हिंदीला प्रमाण भाषेचें माहात्म्य प्राप्त होऊं शकत नाही. आणि म्हणून पं. मिश्रजींचा वर दिलेला युक्तिवाद अर्थशून्य ठरतो.

या सर्व कारणांस्तव आमचें म्हणणें असें की, (१) ज्या अर्थी 'मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५० च्या कलम ३ (१) मध्ये हिंदी व मराठी या दोन्ही भाषा समान दर्जाच्या राजभाषा म्हणून घोषित केल्या गेल्या आहेत, आणि (२) ज्या अर्थी न्यायालयाच्या क्षेत्रांत म. रा. अधिनियमातील कलम ४ मध्ये दिलेल्या बाबींसाठी देखील इंग्रजी हीच प्रमाण भाषा कायम आहे, त्या अर्थी कलम ४ मध्ये

'हिंदी' या एकाच भाषेचा सरकारी भाषा म्हणून जो उल्लेख आहे तो सुधारून त्या ऐवजी 'हिंदी व मराठी' त्या दोन्ही भाषांचा उल्लेख करणें, अगत्याचें आहे. कायदा न्याय आणि हिंदी व मराठी या भाषांना या प्रांतात समान दर्जा देण्याचें धोरण, हें सर्व ध्यानांत घेता मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमांत वर सुचविलेल्या दोन दुरुस्त्या केल्या जाणें आवश्यक आहे.

आम्हास अशी उमेद आहे की, मध्यप्रदेश विधान सभेचे हिंदीभाषी व मराठी भाषी सभासद आणि मंत्रि या दुरुस्त्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करतील आणि त्यांतील आशयाला कायद्याचें माहात्म्य प्राप्त करून देतील. असें झाल्यास या आधिनियमावर महाराष्ट्रांतील अनेक वृत्तपत्रांनी व पुढाऱ्यांनी जे आक्षेप घेतले आहेत आणि मध्यप्रदेशांतील मराठी भाषी नेत्यांवर जे टीका प्रहार केले आहेत, त्यांचें संपूर्ण निराकरण होईल आणि हिंदी मराठी संघर्ष या प्रदेशापुरता तरी न्याय्य रीतीने संपुष्टांत आणल्याचें श्रेय आमच्या मंत्रिमंडळाच्या पदरी पडेल.

पु. य. दे.

(२) भाषावर प्रांतरचना व काँग्रेसचा जाहीरनामा

—— भाषावर प्रांतरचनेच्या मार्गांत आजवर ज्या अनेक अडचणी आल्या त्यांत सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या महनीय पुढाऱ्यांचा तीव्र विरोध ही सर्वांत मोठी होती. ही अडचण आता बऱ्याच प्रमाणांत निवळत चालली आहे असें दिसतें. अ. भा. काँग्रेस समितीच्या बंगलोर–अधिवेशनांत काँग्रेसचा जो जाहीरनामा तयार झाला त्यांतील परिच्छेद २८ मध्ये या प्रश्नाचा स्पष्ट उल्लेख करण्यांत आला आहे. या उल्लेखाचा आशय येणेप्रमाणे आहे :—

"दक्षिण व पश्चिम भारतांतून भाषावार प्रांतरचनेची मागणी वारंवार करण्यांत आली आहे. काँग्रेसने पुष्कळ वर्षांपूर्वी भाषावार प्रांतरचनेला अनुकूल असा आपला अभिप्राय व्यक्त केलेला आहे. या प्रश्नाचा अंतिम निर्णय संबंधित लोकांच्या इच्छेवरच अवलंबून राहील. भाषिक कारणामुळे या प्रश्नाला सांस्कृतिक व इतर प्रकारचें महत्व प्राप्त होत असलें तरी हा प्रश्न निकालांत काढतांना आर्थिक, शासनात्मक व सांपत्तिक कारणांसारख्या इतर महत्वाच्या गोष्टीहि लक्षांत घेणें आवश्यक आहे. म्हणून, भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला संबंधित लोकांच्या ऐकमत्याचा पाठिंबा मिळालेला जेथे दिसून येईल तेथे ही मागणी निकालांत काढण्यासाठी भारत संविधानांत नमूद झालेल्या नियमानुसार सीमा–निर्णय–मंडळाच्या नियुक्तिसहित इतर सर्व प्रकरची कारवाई करण्यांत येईल."

काँग्रेसच्या घोषणेचा आशय

काँग्रेसच्या ताज्या जाहीरनाम्यांतील ही घोषणा अनेक दृष्टींनी अर्थपूर्ण अशी आहे. कांही छिद्रान्वेषी टीकाकारांना व उतावीळ लोकांना ही घोषणा पूर्ण समाधानकारक जरी न वाटली तरी भाषावार प्रांतरचना घडवून आणण्याच्या बाबतींत काँग्रेसने आता निश्चयात्मक असें एक पाऊल पुढे टाकलें आहे, ही गोष्ट कोणत्याहि समंजस माणसाला नाकारतां येण्यासारखी नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व काँग्रेस सत्ताधारी झाल्यानंतर ही पहिलीच अशी घोषणा होय की, जी भाषावार प्रांतरचनेच्या तत्वाला मध्यंतरीच्या विरोधानंतर पुन्हा एकवार सुस्पष्ट अशी मान्यता देत आहे. मध्यंतरी,

कै. सरदार पटेल, पं. नेहरू व आचार्य कृपलानी यांनी भाषावारीच्या तत्त्वावर देखील जोराचे हल्ले चढविले होते व त्यामुळे धार–कमिशनच्या माध्यमांतून हा प्रश्न बेमुदत लांबणीवर पाडण्यांत आला होता, ही घटना जे ध्यानांत घेतील त्यांना हें दिसून येईल की, बंगलोर–अधिवेशनांतून बाहेर पडलेल्या कॉंग्रेसच्या या नव्या घोषणेला निश्चित असा नवा अर्थ आहे. भाषावार प्रांतरचना आज ना उद्या अमलांत आणण्याला कॉंग्रेस आता नव्याने प्रतिज्ञाबद्ध झालेली आहे.

'आज ना उद्या,' असें म्हणण्याचें कारण असें की, या घोषणेंत कांही अटीहि समाविष्ट झाल्या आहेत आणि त्यांची पूर्तता झाली तरच आणि झाल्याबरोबर सीमा निर्णय समिति नियुक्त केली जाईल, असें या घोषणेंत म्हटलें आहे. या अटी देणे प्रमाणे आहेत.

(१) भाषावार प्रांत आकारास आणतांना भाषेच्या जोडीला आर्थिक, शासनात्मक व सांपत्तिक गोष्टींची अनुकूलताहि लक्षांत घेतली जाईल. म्हणजे जिथे ही अनुकूलता असेल तिथेच भाषावार प्रांत अस्तित्वात आणला जाईल.

(२) यासाठी, संबंधित लोकांचें ऐकमत्यहि दिसून आलें पाहिजे. उदाहरणार्थ संयुक्त अथवा अखंड महाराष्ट्र आकारास आणतांना पश्चिमेकडील गुजराती लोक, दक्षिणे कडील कानडी लोक व पूर्व-उत्तर कडील हिंदी लोक यांची संमति महाराष्ट्रीय जनतेने मिळविली पाहिजे.

आमचें कर्तव्य

या दोन अटींची पूर्ती होतांच सीमासमितीची नियुक्ति करण्यांत येईल व तिचा अहवाल येतांच सावधानांतील नियमानुसार इतर कारवाई करण्यांत येईल. यापैकी पहिली अट अखंड महाराष्ट्राच्या निर्मितीच्या आड येऊंच शकत नाही. त्या अटीची पूर्तता सर्वमान्य अशी आहे. प्रश्न आहे तो मुंबई–प्रांतांतील गुजराती लोकांचा व मध्यप्रदेशांतील हिंदी लोकांचा. पैकी मध्यप्रदेशांतील हिंदी पुढाऱ्यांनी व कायदेमंडळाने देखील संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला आपला पाठिंबा वारंवार जाहीर केलेला आहे आणि कानडी लोकांना तर स्वतःचा संयुक्त कर्नाटक हवा असल्यामुळे त्यांचीहि संयुक्त महाराष्ट्राला मान्यता आहेच. प्रश्न आहे तो मुंबई प्रांतांतील गुजराती लोकांचा. परंतु या बाबतींत महाराष्ट्रीय नेते संघटितपणे आणि राष्ट्रहितदृष्टि बाजूला न सारतांहि मुसद्देगिरीने आपली मागणी नेटाने पुढे करूं शकले, तर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होण्यास कालावधि लागणार नाही.

पु. य. दे.

(३) हस्तलिखितांचें संशोधन

महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. अ. का. प्रियोळकर यांनी कारवार येथील आपल्या अध्यक्षीय भाषणांत अखिल महाराष्ट्रांतील हस्तलिखितांचें संशोधन, संग्रह आणि संरक्षण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती, व हें कार्य साहित्यसंस्था आणि सरकार यांनी सहकारितेनें करावें, अशीहि सूचना केली होती. या त्यांच्या सूचनेचा मुंबई सरकारने तत्परतेने स्वीकार केलेला दिसतो. ता. २६ जून १९५१ रोजीं मुंबई येथे मुंबईचे प्रमुखमंत्री ना. बा. गं. खेर यांच्या अध्यक्षतेखाली 'बॉम्बे स्टेट बोर्ड ऑफ हिस्टॉरिकल रेकॉर्डस् ॲण्ड ॲन्शंट मौन्युमेंट्स्'

या संस्थेची सभा भरून मुंबई राज्यांतील जुन्या इतिहासप्रसिद्ध घराण्यांकडे असलेल्या महत्वाच्या हस्तलिखितांची माहिती मिळवावी आणि शक्य तर तीं हस्तलिखितें हस्तगतहि करावींत, असा निर्णय करण्यांत आला. त्याबरोबरच, या कामासाठी चार प्रादेशिक समित्याहि नेमण्यांत येऊन, मुंबई राज्यांतील संशोधन-संस्थांच्या सहकारितेचें हें काम समित्यांनी करावें, असें ठरलें. मुंबई राज्यांत मराठी, गुजराती आणि कानडी अशा तीन भाषा बोलणारे जनसमाज एकत्र आलेले असून, शिवाय उर्दू-फारशीचा अभिमानी असा मुस्लिम समाजहि त्या राज्यांत आहे. त्यामुळे या सर्व प्रादेशिक लोकभाषा आणि प्राचीन संस्कृत भाषा अशा पांच भाषांतील हस्तलिखितांची माहिती मिळविणें आणि ती हस्तगत करणें अशीं दोन्ही कामें या समित्या करणार आहेत. ऐतिहासिक महत्वाचीं हस्तलिखितें गोळा करण्याचें काम गेलीं सवाशें वर्षें महाराष्ट्रांत सुरू असून, कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून तों डॉ. य. खु. देशपांडे यांच्यापर्यंत, अनेक विद्वान् संशोधकांनी हजारो हस्तलिखितें अत्यंत परिश्रमपूर्वक संशोधिलीं आणि संपादिलींहि आहेत. पुण्याचें भारत इतिहास संशोधक मंडळ, मुंबई आणि ठाणें येथील मराठी ग्रंथसंग्रहालयें, धुळ्याचें श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर आणि राजवाडे संशोधन मंदिर, यवतमाळचा शारदाश्रम वगैरे संस्थांजवळ व मुंबई, मध्यप्रदेश आणि हैद्राबाद या राज्यांतील विद्यापीठांजवळहि हजारों हस्तलिखितांचा संग्रह आहे. पण, भारताचा इतिहास हा किमानपक्ष चार हजार वर्षांचा दीर्घकाल व्यापणारा असल्यामुळे आणि या विशाल कालावधींत हजारों राजवंशांचे उदयास्त होऊन गेलेले असल्यामुळे, नानाप्रकारचीं नानाभाषांतील हस्तलिखितें आणि इतर ऐतिहासिक अवशेष हें अद्याप अशोधित स्थितींत पडलेले असावेत, हें अगदी स्वाभाविक आहे. त्या दृष्टीने मुंबई सरकारचा हा उपक्रम निःसंशय स्वागतार्ह आहे. अकोला येथील विदर्भ साहित्य संमेलनांत म. म. प्रि. वा. वि. मिराशी यांनी मध्यप्रदेश सरकारने या राज्यांतील ऐतिहासिक वास्तु आणि वस्तु यांचें संशोधन करण्यासाठी उत्खनन-संशोधनाचें केंद्र स्थापन करावें, अशी सूचना केली होती. त्या सूचनेकडे मध्यप्रदेश सरकार अगत्याने लक्ष देईल, अशी आशा आहे.

ग. त्र्यं. मा.

(४) सर्व प्रकाशनाच्या संरक्षणाची योजना

ता. २५ जून १९५१ रोजी पुणें येथे 'सुलभ विश्वकोशा'च्या शेवटल्या खंडाचें प्रकाशन करतांना भारत सरकारचे साहित्यमंत्री श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी भारतांत प्रकाशित होणाऱ्या सर्व पुस्तकांचा संग्रह आणि संरक्षण करण्याची जी योजना जाहीर केली, ती अत्यंत स्वागतार्ह आहे. या योजनेचें स्वरूप सूचित करतांना श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी असें सांगितलें कीं, " भारतांतील सर्वमान्य प्रांतिक भाषांचें एक मध्यवर्ति ग्रंथालय दिल्ली येथे स्थापन करण्याचें मध्यवर्ति सरकारने ठरविलें आहे. या ग्रंथालयांत भारतांतील सर्व भाषांतून प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक प्रकाशनांचा संग्रह करण्याची व्यवस्था सरकार करणार आहे; व या दृष्टीने सध्याच्या कॉपी राइटच्या कायद्यांत जरूर ती सुधारणा करण्याचाहि सरकारचा मानस आहे. प्रत्येक प्रकाशनाच्या पांच किंवा सहा प्रती सरकारला पाठविण्याची सक्ति प्रकाशकांवर करणारें कलम कॉपीराइट कायद्यांत घालण्यांत येईल; व अशा रीतीने सरकारकडे येणाऱ्या हरेक प्रकाशनाचें काळजीपूर्वक जतन या मध्यवर्ति ग्रंथालयांत करण्यांत

येईल. आज भारतांत कुठेहि अखिल भारताचें असे मध्यवर्ति सरकारी ग्रंथालय नाही. त्यामुळे भारतांतील सर्व प्रकाशनांचा संग्रह आणि संरक्षण होण्याची कांही व्यवस्थाहि पण नाही. आम्ही ही जी नवी व्यवस्था करणार आहोंत, ती इंग्लंडांतील ब्रिटिश म्यूझियमच्या पद्धतीवर करण्यांत येईल". ना. गाडगीळ यांनी जाहीर केलेली ही मध्यवर्ति सरकारी ग्रंथालयाची योजना सर्वथैव इष्ट अशीच आहे. तथापि ही योजना अमलांत आणतांना अभ्यासकांची सोय होईल, अशीहि तरतूद व्हावयाला हवी. त्या दृष्टीने, केवळ दिल्ली येथेच मध्यवर्ति ग्रंथालय काढून भागेल, असें वाटत नाही. भारतासारख्या अफाट देशांत भाषांचे प्रादेशिक गट लक्षांत घेऊनच ग्रंथालयांची योजना आंखणें लोकोपयोगी ठरेल. म्हणजे असें कीं, दिल्ली येथे जरी मध्यवर्ति ग्रंथालय स्थापन करण्यांत आलें, तरी नागपूर, मुंबई, कलकत्ता अलाहाबाद आणि मद्रास यांसारख्या शहरींहि भारताच्या त्या त्या विभागांतील प्रादेशिक भागांतल्या सर्व प्रकाशनांचा संग्रह करणारीं प्रादेशिक ग्रंथालयेंहि स्थापन होणें अवश्य आहे. तरच, अशा ग्रंथालयांचा उपयोग भाषा आणि वाङ्मय यांचें तुलनात्मक अध्ययन करणाऱ्या अभ्यासकांना होऊं शकेल.

ग. त्र्यं. मा.

(५) मोडी लिपीला उत्तेजन

काटोलचे रा. ब. भाउसाहेब खळतकर आणि वर्धाचे डॉ. यादवराव अणे यांचे मोडी लिपीला मध्यप्रदेश सरकारने उत्तेजन द्यावें म्हणून गेलीं पंधरा वर्षे सतत प्रयत्न चालू आहेत. त्या प्रयत्नांचें चीज करण्याची बुद्धि मध्यप्रदेश सरकारला जरी अद्याप होत नसली, तरी मुंबई सरकारने मात्र जुलैच्या दुसऱ्या आठवड्यांत मोडी लिपीला पद्धतशीर प्रोत्साहन देण्याची आपली योजना जाहीर केली आहे. ही योजना अशी आहे की, मुंबई, पुणें, नाशिक हे विभाग आणि धारवाड विभागांतील बेळगांव जिल्हा या चार भागांतील प्राथमिक शालान्त परीक्षा (प्रायमरी स्कूल सर्टिफिकेट) आणि प्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र (प्रायमरी टीचर्स सर्टिफिकेट) या दोन परीक्षांच्या वेळी मोडी लेखनाची चढाओढ ठेऊन तींत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला अनुक्रमें दहा आणि पांच रुपयांचीं पारितोषिकें द्यावयाचीं. अर्थात् मुंबई सरकारने मोडी लिपीला देऊं केलेलें हें उत्तेजन फारसें भरीव किंवा प्रभावी आहे, असें नाही. कदाचित् ज्या या विसाव्या शतकांत लघुलेखनाची कला पराकाष्ठेच्या शीघ्रतेला आणि पूर्णतेला गेल्याचें आपण प्रत्यही अनुभवीत आहोंत, त्या या कालांत लघुलिपी म्हणून मोडीचा पुरस्कार करण्याच्या बाबतींत मुंबई सरकारला जर फारसा उत्साह वाटला नसला, तर त्यांत कांही नवल नाही, कारण, आज मोडीचें महत्त्व एक ऐतिहासिक आणि इतिहास संशोधनाला उपयुक्त असलेली लिपी एवढेंच फक्त आता शिल्लक उरलेलें आहे. तथापि, मुंबई सरकारने जें हें मर्यादित उत्तेजन मोडी लिपीला दिलें आहे, त्याचें अनुकरण आमच्या मध्यप्रदेश सरकारने करावयाला हरकत दिसत नाही.

ग. त्र्यं. मा.

(६) तीन नवे ग्रंथ

गेल्या चार महिन्यांत जे अनेक मराठी ग्रंथ प्रसिद्ध झाले, ह्यापैकी (१) बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचें जीवनवृत्त व लेखसंग्रह, (२) वृत्तपत्रांचा

इतिहास--खंड पहिला आणि (३) माधव ज्यूलियन--जीवनकथा हे तीन निरनिराळ्या कारणांमुळे, विशेष उल्लेखनीय ठरतात. पहिला ग्रंथ म्हणजे कै. बाळशास्त्री जांभेकर यांचें चरित्र. हा सुमारे १३५० पानांचा असून, तो तीन खंडांत विभागलेला आहे. या ग्रंथाचें अद्वितीय वैशिष्ट्य असें कीं, त्याचे लेखक श्री. गणेश गंगाधर जांभेकर यांनी बाळशास्त्री यांचें चरित्र आणि काल यांचें वर्णन करण्याच्या निमित्तानें १८०० ते १८७५ पर्यंतच्या सुमारें पाऊणशे वर्षांच्या महाराष्ट्राच्या बव्हंशी अज्ञात इतिहासावर अंशतः अगदी अपूर्व असा प्रकाश पडला आहे. बाळशास्त्री (१८१२ ते १८४६) हे अव्वल इंग्रजी अमदानीतील आद्य प्राध्यापक, पत्रकार आणि सुधारक. महाराष्ट्राच्या जीवनाला एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं ज्यांनी सर्व बाजूंनी नवीन वळण लावण्याचा प्रयत्न केला, त्यांत जांभेकर हे अग्रेसर. अशा राष्ट्रनिर्मात्याचें चरित्र त्याच्या अनुपलब्ध झालेल्या वाङ्मयासह प्रकाशित करून श्री. ग. गं. जांभेकर यांनी महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाच्या पहिल्या कालखंडाचें साहित्य वाचकवर्गाला उत्कृष्ट सादर केलें आहे, यांत शंका नाही. या ग्रंथाच्या पहिल्या खंडाला लिहिलेल्या २२७ पानांच्या प्रदीर्घ उपोद्घातांत श्री. ग. गं. जांभेकर यांनी गेल्या शंभर वर्षांतील बाळशास्त्री यांच्याविषयींच्या मराठींतील विविध प्रकारच्या लिखाणाचें जें विश्लेषण केलें आहे, ते जरी उपरोधिक आणि निर्दय असलें, तरी महाराष्ट्रांतील पांडित्याबद्दल गाजलेल्या ग्रंथकारांचेंहि लिखाण किती सैल आणि गबाळ असतें, याची त्यांतील विचिकित्सेवरून विदारक कल्पना येते. या उपोद्घातांत दाखविलेल्या महाराष्ट्रांतील सुमारे पन्नास लहानमोठ्या विद्वानांच्या चुका मराठींतील ग्रंथलेखन अद्याप किती अपरिपक्व स्थितींत आहे, याची उत्तम साक्ष देतात. श्री. जांभेकर यांचा हा त्रिखंडात्मक ग्रंथ बहुमोल, अभिनव माहितीनें समृद्ध व म्हणून अभ्यसनीय आहे. या ग्रंथाला मुंबईचे प्रमुखमंत्री ना. बा. गं. खेर आणि पुणें विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मु. रा. जयकर यांनी लिहिलेल्या प्रस्तावनाहि वाचनीय आहेत.

'वृत्तपत्रांचा इतिहास' हा सुमारे सहाशे पानांचा ग्रंथ मुंबई सरकारच्या रेकॉर्ड खात्यांतील अधिकारी श्री विनायक कृष्ण जोशी आणि मुंबईच्या 'नवभारत' दैनिकाचे सहसंपादक श्री रामचंद्र केशव लेले यांनी लिहिला असून त्यांत १७८० ते १८८० पर्यंतच्या शंभर वर्षांच्या काळांतील हिंदी वृत्तपत्रांचा इतिहास आला आहे. वृत्तपत्रांचा इतिहास लिहिणें हें, एकापरीनें, जुन्या राजघराण्यांचा इतिहास लिहिण्यापेक्षा सुद्धा कठीण असतें. राजघराणीं हीं नामशेष झाल्यावर सुद्धा त्यांचे आणि त्यांच्या आश्रितांचे वंशांकुर हे त्यांच्या अस्तित्वाची आणि केव्हा केव्हा ऐश्वर्याचीहि साक्ष द्यावयाला शिल्लक असतात. शिवाय, त्यांच्या गतकालीन वैभवाचे जे नानाप्रकारचे अवशेष बऱ्या वाईट स्थितींत लोकांच्या डोळ्यापुढे उभे असतात, ते निराळेच. पण वृत्तपत्रें हीं त्यांच्या विशिष्ट काळांत कितीहि गाजलेलीं आणि गरजलेलीं असलीं तरी त्यांचें अस्तित्व संपतांच त्याची आठवणहि लोकांतून झपाट्यानें बुजून जाते; व त्यांच्या फायली जतन करणें अतिशय विकट असल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाचा प्रत्यक्ष पुरावाहि कालांतरानें कांहीं उरत नाहीं. अशा विकट परिस्थितींत श्री. जोशी आणि श्री लेले यांनी अत्यंत परिश्रमानें अखिल भारतांतील वृत्तपत्रांची माहिती कणशः संकलित केली आणि हा ग्रंथ सिद्ध केला, हे खरोखरी त्यांना भूषणावह आहे. वृत्तपत्रांच्या इतिहासाबरोबरच त्यांच्या संबंधीच्या कायद्याचाहि इतिहास

त्यांनी साधार आणि सविस्तर विवेचिला आहे. या ग्रंथाच्या रूपाने अखिल भारतांतील वैचारिक प्रगतींचा इतिहास लिहिला गेला आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. मुंबईचे दोन विख्यात पत्रकार प्रो. न. र. फाटक आणि श्री. शं. नवरे यांनी या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनाहि कांही बाबतींत मूळ ग्रंथाला पूरक अशाच आहेत.

'माधव ज्यूलियन' हा २७६ पानांचा ग्रंथ मुंबईचे चरित्रकोशकार श्री. गं. दे. खानोलकर यांनी लिहिला आहे. कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या अकाल मृत्युनंतर त्यांच्या सुविद्य पत्नी कै. लीलाबाई यांनी आपल्या वैवाहिक आयुष्याच्या अकरा वर्षांतील हृदयंगम आठवणी लिहून त्यांच्या चरित्राची एक बाजू लोकांपुढे ठेवली. श्री. खानोलकर यांनी हें चरित्र, बव्हंशीं अस्सल पत्रव्यवहार आणि माधवरावांच्या मित्रमंडळीच्या आठवणी यांच्या आधाराने, लिहिलेलें असल्यामुळे, त्याला विशेष प्रकारचें प्रामाण्य आणि त्याबरोबरच रोचकताहि प्राप्त झालेली आहे. त्या दृष्टीने 'माधवरावांच्या शब्दांत माधवरावांचें चरित्र' असेंहि या ग्रंथाचें वर्णन करतां येईल. अर्थात—या चरित्रांत वर्णिलेल्या कांही घटनांना दुसरी बाजू असणें शक्य आहे. तथापि, डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या केवळ व्यक्तित्त्वाचेंच नव्हे, तर अंतरंगाचेंहि मनोहर दर्शन या ग्रंथांत मराठी वाचकांना होईल, यांत शंका नाहीं.

ग. त्र्यं. मा.

The Madhya Pradesh Official Languages Amendment Bill 1951

A bill to amend, the Madhya Pradesh Languages Act " M. P. Act No. XXIV of 1950 ".

WHEREAS it is expedient to amend certain provisions of the Madhya Pradesh Official Languages Act " No. XXXII of 1950."

It is hereby enacted as follows :—

1. A proviso be added to section 3 (2) as follows :–

Provided however that while issuing the notification the State Government will ensure that Marathi shall be used in respect of Official purposes in all areas of the State in which the population is predominantly Marathi speaking and that Marathi shall have equal treatment in all official purposes.

2. In Section 4 the words " and Marathi " be added at the end of the last sentence.

STATEMENT OF OBJECTS AND REASONS.

There is a feeling in Marathi speaking people that under the Madhya Pradesh Official Languages Act Marathi will not receive equal treatment and that the provisions of section 4 of the Act have not recognised Marathi Language for the purposes mentioned in section 4. This Act is intended to remove the inequality and to ensure equal treatment to Hindi and Marathi which are both official languages in the State of Madhya-Pradesh under section 3 (1) of the Act for all purposes.

संघवार्ता

कार्यकारी मंडळाच्या सभेचे ठराव

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची जी सभा ता. १७ जून १९५१ रोजी नागपूर येथे सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती तींत झालेल्या कामकाजाचें प्रतिवृत्त युगवाणीच्या १९५१ जूनच्या अंकांत पृष्ठ २१७ आणि २१८ यावर प्रसिद्ध झालें आहे. पण छापखान्याच्या अडचणीमुळे हें प्रतिवृत्त पूर्ण प्रसिद्ध होऊं न शकल्यामुळे कार्यकारी मंडळाचे ५, ६, ७ आणि ८ हे ठराव त्या अंकांत प्रसिद्ध झाले नाहीत. ते पुढे दिले आहेत—

(५) युगवाणी, परीक्षा समिति आणि संघ कचेरी या तीन खात्यांचे हिशेब वेगवेगळे तयार करण्यांत यावेत. ते तयार करण्यासाठी योग्य माणसांची मदत घेण्यांत यावी व ता. १ जुलै १९५१ पर्यंत सर्व हिशेब पूर्ण करून ते संघाध्यक्षांकडे पाठविण्यांत यावेत.

(६) वि. सा. संघाच्या सर्व आर्थिक व्यवहारांची सुव्यवस्था लावून देण्यासाठी (१) सौ. कुसुमावती देशपांडे (२) श्री. बाळासाहेब ढवळे (३) श्री. रा. पु. सगदेव आणि (४) श्री. शं. के. माणकेश्वर यांची समिति नेमण्यांत येत आहे.

(७) वि. सा. संघाचे सरचिटणीस आणि तीन इतर चिटणीस यांच्या कामाच्या वाटणीसंबंधी पुढील योजना सुचविण्यांत आली.

(१) सरचिटणीस — संघाच्या सर्व कामकाजांवर देखरेख आणि संघाच्या घटनात्मक कामाची विशेष जबाबदारी.

(२) श्री. रा.पु. सगदेव—मध्यवर्ती कार्यालयाच्या कामकाजाची सर्व जबाबदारी.

(३) ,, ना. क. तांबी—अमरावती आणि यवतमाळ या दोन जिल्ह्यांतील सदस्य नोंदणी, वि. सा. मंदिरासाठी निधि जमा करणें, शाखा स्थापना, वर्ग काढणें व चालविणें. शाखा स्थापन झालेली असल्यास तिच्या कामावर देखरेख ठेवणें, सरहद्दीवरील भाषिक प्रश्नांकडे लक्ष पुरवून त्या संबंधी मध्यवर्ती कार्यालयाला माहिती देणें व मराठीच्या हितसंबंधाचें संरक्षण करण्यासाठी संघाच्या धोरणानुसार संघाध्यक्षांच्या सल्ल्याने उपाययोजना करणें.

(४) श्री. प्र. ना. खोडे—बुलढाणा व अकोला या दोन जिल्ह्यांत वरील प्रमाणे कामें करणें.

(८) संघाच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या कामासाठी एक अंशवेळेचा कारकून रुपये ४० दरमहा पर्यंत आणि पूर्ण वेळेचा चपराशी रु. २५ पर्यंत पगार देऊन ठेवण्यांत यावा.

आकोला येथील संमेलनांत मंजूर झालेले ठराव

आकोला येथे ता. २८ आणि २९ एप्रिल १९५१ रोजी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या विदर्भ-साहित्य-संघाच्या तेराव्या संमेलनाच्या अधिवेशनांत पुढील ठराव मंजूर झाले.

दुखवटयाचा ठराव

(१) मराठी भाषा आणि साहित्य यांच्याविषयी प्रेम बाळगून त्यांची सर्वांगीण सेवा करणारे खाली नमूद केलेले साहित्यिक दिवंगत झाल्यामुळे विदर्भ साहित्य संघाला अत्यंत दुःख होत आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखांत विदर्भ साहित्य संघाचे सर्व सभासद सहभागी आहेत. ईश्वर मृतांचे आत्म्यास सद्‌गती देवो.

(१) श्री.रंगनाथ नारायण अळेकर (२) श्री.महादेव कृष्ण पाध्ये(३) सौ.शांताबाई माडखोलकर (४) श्री. सानेगुरुजी (५) श्री. श्रीधर विनायक वर्तक (६) डॉ. तुकाराम जयराम केदार (७) श्री. केशव आप्पा पाध्ये (८) श्री. भास्करराव विठोजीराव जाधव (९) श्री. गोपाळराव दाजीबा दळवी, (१०) रा.ब.ना.दा. वाडेगांवकर (अध्यक्षांकडून)

पुराणवस्तु संग्रहासाठी मध्यप्रदेशाला स्वतंत्र केंद्र हवें

(२) विदर्भ साहित्य संघाची भारत सरकारला अशी आग्रहाची विनंती आहे की त्याने पुराणवस्तूसंग्रहाच्या नवीन आयोजनामध्ये अखिल मध्यप्रदेशाकारिता त्या खात्यांचें एक स्वतंत्र केंद्र नागपूर सारख्या मध्यवर्ती ठिकाणी स्थापन करावें व त्याच्या द्वारे या राज्यांतील एखाद्या प्राचीन ठिकाणीं शक्य तितक्या लौकर उत्खननाचें कार्य सुरू करावें. (अध्यक्षांकडून)

वाङ्मयीन पुस्तकावरील विक्रीकर काढा

(३) शालेयपुस्तकांप्रमाणेच वाङ्मयीन पुस्तकांवरील विक्रीकर काढून टाकावा अशी आग्रहाची विनंती हें वि. सा. संमेलन सरकारला करीत आहे. (अध्यक्षांकडून)

विद्यापीठांच्या क्षेत्रांत बदल करा.

(४) १९५१ ची शिरगणती लक्षांत घेतां नागपूर आणि सागर या दोन्ही विद्यापीठांच्या अधिकारक्षेत्रांची पुनर्रचना करावयास पाहिजे. ज्या अर्थी आता राज्यकारभाराचा घटक जिल्ह्याऐवजी तालुका झाला आहे, त्या अर्थी ही रचना तालुकेवार करावयास पाहिजे अशी या संमेलनाची मागणी आहे.

ग्रंथाची सूची प्रसिद्ध करा.

(५) मध्यप्रदेशांत दरवर्षी जे ग्रंथ प्रसिद्ध होतात, त्या सर्व लहान मोठ्या ग्रंथांची सूची गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्याची जी पद्धत चालू होती, ती पूर्ववत सुरू करावी अशी सरकारला विनंती आहे. सरकारकडे येणाऱ्या ग्रंथाच्या प्रतींपैकीं एक प्रत विदर्भ साहित्य संघाला देणगी म्हणून देण्यांत यावी. (अध्यक्षांकडून)

नवीन गॅझेटियर तयार करा

(६) मध्यप्रदेशाचें जिल्हावार गॅझेटियर हें आतां फार जुने झालेलें आहेत. शिवाय ते ब्रिटिश राजवटींत विशिष्ट दृष्टिकोणाने लिहिले गेले आहेत. आता देश स्वतंत्र झाल्यानंतर या गॅझेटियरचें मराठी आणि हिंदी भाषांतून पुन्हां संपादन आणि प्रकाशन होणें अत्यंत आवश्यक आहे. म्हणून या संमेलनाची सरकारला अशी विनंती आहे कीं, गॅझेटियर्सच्या संपादनाच्या, संशोधनाच्या आणि मुद्रणाच्या कार्याला त्यांनी सुरवात करावी. या कामी विदर्भ साहित्य संघ सरकारला सर्व प्रकारें सहकार्य देईल. (अध्यक्षांकडून)

अनुक्रमणिका

सागर विद्यापीठांत मराठीची सोय करा

(७) मॅट्रिक्युलेशन परीक्षेत मराठी माध्यम घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांतील शिक्षण हिंदी माध्यमांतून घेणें अत्यंत त्रासदायक होतें. म्हणून या संमेलनाची सागरविद्यापीठाला अशी विनंती आहे कीं, त्या विद्यापीठाच्या महाविद्यालयांतून मराठी माध्यमांतून शिक्षण देण्याची सोय करण्यांत यावी व खाजगी मराठी भाषी विद्यार्थ्यांना मराठी माध्यमांतून परीक्षेला बसूं देण्याची सवलत द्यावी.

(अध्यक्षांकडून)

श्री. ठाकूर यांचे आभार

(८) अमरावती येथील श्री. हरिहरेश्वर प्रिंटिंग प्रेसचे चालक श्री. द. ना. ठाकूर यांनी गेलीं पांच वर्षे 'युगवाणी' मासिकाचें मुद्रण आणि प्रकाशन संघातर्फे आत्मीयतेने स्वार्थत्यागपूर्वक केलें, याबद्दल हें संमेलन त्यांचे आभारी आहे.

(अध्यक्षांकडून)

साहित्यिक संस्थांशी सहकार्य करण्याची योजना

(९) मध्यप्रदेशांतील शिक्षणसंस्था आणि साहित्यसंस्था यांचा वि. सा. संघाशी सहयोग घडवून आणण्यासाठी व त्या सर्वांच्या साहाय्याने साहित्यविषयक आस्था व उच्च अभिरुचि निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यासाठी कार्यकारी मंडळाने जी योजना केली आहे, तिचें हें संमेलन स्वागत करतें. मध्यप्रदेशांतील वरील प्रकारच्या सर्व संस्थांनी या कार्यांत सहभागी व्हावें अशी संमेलनाची त्यांना आग्रहाची विनंती आहे. या कार्याचें साहित्यिकस्वरूप व त्याचें शैक्षणिक महत्त्व लक्षांत घेऊन सरकारी शिक्षण संस्थांच्या चालकांना या योजनेमध्ये अवश्य ते सहकार्य देण्याची मोकळीक देण्यांत यावी अशी विनंती हें संमेलन शिक्षण खात्याला करीत आहे.

सूचक—श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी

अनु.—श्री. चंद्रशेखर माडखोलकर

नाट्य संस्थेवरील करमणूककर माफ करा

(१०) ज्या अर्थी नाट्य आणि नृत्य ही समाजशिक्षणाचीं आणि सदभिरुचीच्या संवर्धनाचीं प्रभावीं साधनें आहेत आणि ज्या अर्थी सिनेमासारख्या यांत्रिक साधनांच्या प्रसंगामुळे या दोन्ही कलांची योग्य वाढ खुंटून गेली आहे, त्या अर्थी नाटक आणि नृत्य या दोन्ही कलांच्या धंदेवाइक व हौशी व इतर सर्वप्रकारच्या सार्वजनिक प्रयोगांवरील करमणुकीचा कर अजिबात नाहीसा करावा अशी मध्यप्रदेश सरकारला या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे.

सूचक—श्री. मा. ज. कानेटकर

अनुमोदक—प्राचार्य वि. प्र. मोहगांवकर

निरीक्षक समिती नेमण्याची मागणी.

(११) प्रादेशिक राज्यकारभार शिक्षण खातें आणि विद्यापीठें यांतून मराठीच्या हितसंबंधांचें संरक्षण योग्य रीतीने केले जातें कीं नाही, हें पाहण्यासाठी मध्यप्रदेश सरकारने वि. सा. संघाच्या सहकार्याने एक संयुक्त निरीक्षक समिती नेमावी अशी या संमेलनाची सरकारला आग्रहाची विनंती आहे.

सूचक—श्री. ए. श्री. पटवर्धन

अनुमोदक—श्री. ना. रा. वामणगांवकर

परिभाषेच्या शब्दांची तपासणी करा

(१२) डॉ. रघुवीर यांनी परिभाषा तयार करण्याचे जे प्रदीर्घ श्रम घेतले त्याबद्दल हें संमेलन त्यांचे साभार अभिनंदन करतें. तथापि त्यांची परिभाषा कांहीं ठिकाणी मराठीच्या प्रकृतीला अनुरूप नाही आणि ती वापरतांना केव्हा केव्हा अर्थाचा गोंधळ उडतो असा अनुभव आहे. म्हणून हें संमेलन असें ठरवितें की, वि. सा. संघाने डॉ. रघुवीर यांची परिभाषा मराठीच्या प्रकृतीच्या दृष्टीने तपासावी आणि मराठीच्या प्रकृतीशी विसंगत अशा त्या पारिभाषेतील शब्दांऐवजी दुसरे योग्य शब्द सुचवावे. तसेंच त्या शब्दांचा प्रसार सामान्य जनतेंत आणि सरकारांत होईल असा प्रयत्न करावा. या कार्यासाठी कार्यकारी मंडळाने एक समिती नेमावी.

सूचक—प्रा. ग त्र्यं. देशपांडे
अनुमोदक—प्रा. वा. कृ. चोरघडे.

राजभाषा अधिनियम दुरुस्त करा

(१३) मध्यप्रदेश सरकारने "मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५० (१९५० चा २४ वा कायदा)" या नांवाचा कायदा नुकताच मंजूर करून इंग्रजीच्या जागी मराठी आणि हिंदी या दोन्ही राजभाषा म्हणून स्वीकारण्याची तरतूद केली आहे. तिच्याबद्दल वि. सा समेलन म. प्र. सरकारचें आभारपूर्वक अभिनंदन करतें परंतु या कायद्याच्या कांही कलमांत जी भाषा वापरली आहे, ती हिंदी व मराठी या दोन्ही भाषांना राजभाषेचा समान दर्जा देण्याच्या सदहू कायद्याच्या कलम नं. २ मधील व्याख्यांशी विसंगत व मराठी भाषेला अन्यायकारक आहे. अन्याय दूर करण्यासाठी या कायद्यांत योग्य त्या दुरुस्त्या केल्या गेल्या पाहिजेत. ह्या दुरुस्त्या कायदेशीर भाषेंत तयार करण्यासाठी खालील समिती नियुक्त करण्यांत येत आहे.

(१) श्री. ग. त्र्यं. देशपांडे (२) श्री. पु. य. देशपांडे (३) श्री. ए. श्री. पटवर्धन (आमंत्रक.)

समितीने तयार केलेल्या दुरुस्त्यांना कायद्यांचे महत्व प्राप्त करून देण्यासाठी म. प्र. विधान सभेंतील विशेषतः मराठीभाषी सदस्यांनी नेटाने प्रयत्न करावेत अशी या संमेलनाची त्यांना आग्रहाची विनंती आहे.

(अध्यक्षांकडून)

हिंदी आणि मराठी राजभाषा झाल्यामुळे आवश्यक झालेल्या बाबी

(१४) ज्या अर्थी मध्यप्रदेशांत हिंदी व मराठी या दोन्ही राजभाषा म्हणून घोषित केल्या गेल्या आहेत, त्या अर्थी मध्यप्रदेश सरकारने खाली दिलेल्या सूचनां-प्रमाणे व्यवस्था करावी अशी या संमेलनाची आग्रहपूर्वक मागणी आहे.

१. मध्यप्रदेशांतील हायस्कुलांत अहिंदी भाषी विद्यार्थ्यांना ज्या प्रमाणे हिंदी भाषेचें शिक्षण आवश्यक करण्यांत आलें आहे, त्याच प्रमाणे सर्व अ-मराठी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचें शिक्षण आवश्यक करण्यांत यावें.

२. महाविद्यालयीन शिक्षणक्रमांत इंग्रजी माध्यमाच्या ऐवजी मराठी माध्य-माची जेथे योजना झाली आहे, तेथे सरकारी महाविद्यालयांत हिंदी माध्यमांतूनहि शिक्षण देण्याची व्यवस्था सरकारने केली आहे. त्याचप्रमाणे जेथे हिंदी माध्यमाची

व्यवस्था झाली आहे, तेथे मराठीभाषी विद्यार्थ्यांसाठी मराठी शिक्षणाची व्यवस्था करण्यांत यावी.

३. हें राज्य द्विभाषी आहे हें लक्षांत घेतां या प्रदेशांतील प्रत्येक अधिकाऱ्याला मराठी भाषेचें योग्य तें ज्ञान–म्हणजे निदान प्रवेशपरीक्षेइतकें (मॅट्रिक्युलेशन स्टँडर्ड) ,तरी–असणें आवश्यक करावें, व सरकारी कर्मचाऱ्यांना हिंदीचें शिक्षण देण्यांसाठी सचिवालयांत हिंदीचे वर्ग सरकारतर्फे चालविण्यांत येत आहेत, त्याचप्रमाणे मराठीचे वर्गहि सुरूं करून अ–मराठी कर्मचाऱ्यासाठीच मराठीच्याहि अभ्यासाची सोय करण्यांत यावी.

४. भाषिक प्रश्नांच्या विचारासाठीं लोकभाषा विभागातर्फे एक समिति नेमण्यांत आली आहे असें समजतें या समितीचें स्वरूप अधिक व्यापक करून तींत दोन मराठी व दोन हिंदी बिनसरकारी सभासदांना स्थान द्यावें. व मराठी सभासदांची नियुक्ती करण्याचा अधिकार विदर्भ साहित्य संघाला द्यावा.

५. नागपूर येथील सचिवालयांतील व विभागाच्या संचालकांच्या कार्यांतील प्रत्येक फाईल दोन्हीं भाषांत लिहिली जाणें शक्य आहे. कारण प्रशासनाची पारिभाषिक शब्दावली एकच आहे. म्हणून मराठी अधिकाऱ्यांना मराठी भाषेंत व अ–मराठी भाषिकांना हिंदी भाषेंत लिहिण्याची मोकळीक असावी.

६. सर्व प्रकारच्या सरकारी आणि जनपदसारख्या स्वायत्त संस्थांकडून लावण्यांत येणाऱ्या सूचनांचे फलक मध्यप्रदेशांत सर्वत्र मराठी भाषेंतहि असावेत.

७. हिंदी भाषेच्या शिक्षणासाठीं व प्रचारासाठीं मध्यप्रदेश सरकारने ज्या योजना करून त्यांना आर्थिक सहाय्यहि दिलें आहे, त्याचप्रमाणें मराठी भाषेच्या शिक्षणासाठीं व प्रचारासाठीं योजना करून त्यांनाहि आर्थिक साह्य द्यावें.

वरील ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या बाबतींत सरकारला योग्य सहकार्य देण्याचें हें संमेलन आश्वासन देत आहे. (अध्यक्षांकडून)

मध्यप्रदेश सरकारचे आभार

(१५) विदर्भ साहित्य संघाच्या विदर्भ साहित्य मंदिरासाठीं जमीन व विदर्भ साहित्य संघाच्या यंदाच्या कार्याकरितां ५ हजार रुपयांची देणगी देऊन मध्यप्रदेश सरकारनें आपलें एक महत्वाचें कर्तव्य पार पाडलें, याबद्दल हें संमेलन मध्यप्रदेश सरकारचें अभिनंदन करते. व सरकारनें केलेल्या सहाय्याबद्दल त्यांचे आभार मानतें. विदर्भ साहित्य संघाच्या वाढत्या व्यापाकडे लक्ष देऊन ही देणगी दरवर्षी वाढत्या प्रमाणांत मिळावी आणि मंदिर बांधण्यासाठींहि भरीव आर्थिक साह्य मिळावें अशी या संमेलनाची सरकारला विनंती आहे. (अध्यक्षांकडून)

मंदिर आणि निधिसमितींची संयुक्त सभा

ता. १ जुलै १९५१ रोजी नागपूर येथे संघाध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या निवासस्थानी मंदिर समिति आणि निधिसमिति यांची संयुक्त सभा होऊन तींत पुढील निर्णय करण्यांत आले—

(१) दोन्ही समितींच्या कार्याचा समन्वय करण्याच्या आणि कामें त्वरित उरकण्याच्या दृष्टीने खालील सदस्यांची एक संयुक्त उपसमिति नेमण्यांत आली.

१ संघाध्यक्ष २ न्या. मू. मंगळमूर्ति ३ श्री. पु. य. देशपांडे ४ श्री. करंजगांवकर ५ श्री. आ. रा. देशपांडे ६ श्री. नानासाहेब जोग ७ श्री. ग. त्र्यं. माडखोलकर संघाध्यक्ष हे या समितीचे अध्यक्ष राहतील व श्री. जोग हे आमंत्रक राहतील. समितीची गणसंख्या तिघांची राहील.

(२) कार्यकारी मंडळाने नेमलेल्या सर्व समित्यांचे आणि उपसमित्यांचे संघाध्यक्ष आणि सरचिटणीस हे अधिकारपरत्वें सभासद रहावेत आणि संघाध्यक्ष हे उपस्थित राहिल्यास त्यांनीच समितीचे अध्यक्षपद स्वीकारावें अशी शिफारसही समिति कार्यकारी मंडळाला करीत आहे.

(३) वि. सा. संघातर्फे मंदिर निधीला जे कर्ज देण्यांत येत आहे त्यावर व्याज आकारण्यांत येऊं नये अशी शिफारस कार्यकारी मंडळाला करण्यांत आली.

राजभाषा अधिनियम सुधार समिति.

अकोला येथें भरलेल्या वि. सा. संघाच्या १३ व्या संमेलनांत मध्यप्रदेश सरकारच्या राजभाषा अधिनियमांत मराठी भाषेला अन्यायकारक अशी जी कलमें आहेत तीं दुरुस्त करण्याच्या दृष्टीने सुधारणा सुचविण्यासाठी श्री. पु. य. देशपांडे प्रा. ग. त्र्यं देशपांडे आणि श्री. ए. श्री. पटवर्धन (आमंत्रक) यांची एक समिती नेमण्यांत आली होती. या समितीने दुरुस्ती बिलाचा मसुदा तयार केला. तो मूळ इंग्रजी मसुदा पृ. २८७वर स्वतंत्रपणे दिला आहे.

श्री. पटवर्धन यांनी मध्यप्रदेश विधान सभेचें प्रमुख महाराष्ट्रीय सदस्य, भारतीय संसदेचे प्रमुख महाराष्ट्रीय सदस्य व म. सा. परिषद, मराठवाडा, परिषद, नागपूर प्रा. कां. कमेटी आणि महाविदर्भ सभा यांचे अध्यक्ष आणि पदाधिकारी, व बिहारचे राज्यपाळ लो. ना. नामदार मा. श्री. अणे श्री. शंकरराव देव, श्री. रा. कृ. पाटील प्रभृति कार्यकर्ते अशा एकूण एकोणतीस सद्गृहस्थांकडे हा दुरुस्ती बिलाचा मसुदा पाठविला. मध्यप्रदेश विधान सभेच्या महाराष्ट्रीय सदस्यांपैकीं डॉ. खेडकर, डॉ. एकबोटे श्री. बेलसरे, श्री. कोचर, श्री. कदम आणि श्री पाठक यांनी हे दुरुस्ती बिल असेंब्ली कार्यालयाकडे पाठविलें असल्याचें श्री पटवर्धन यांना कळविलें आहे.

वि. सा. मंदिराला देणग्या

वि. सा. मंदिराला पुढील व्यक्तींनी देणग्या दिल्या आहेत—

(१) अॅडव्होकेट आर. एस्. डबीर, नागपूर, रु. १००.

(२) श्री. कृ. गो. भोमुले, मालक, पॉप्युलर स्टोअर्स, नागपूर. रु. ५१

(३) सौ. गिरिजाबाई नवाथे नागपूर, रु. ५

या शिवाय श्रीमति सीताबाई जयवंत यांनी वि. सा. संघाला श्री. सरस्वतीची रौप्य प्रतिमा दिली असून, श्री. मो. सा. शहाणे यांनी भरीव रकमेची पुस्तकें दिलीं आहेत.

या सर्व दात्यांचा वि. सा. संघ मनःपूर्वक आभारी आहे.

वि. सा. संघाचे नवे आजीव सदस्य

(१) श्री. गो. आ, भोंसुले, नागपूर (२) सौ. विजया रा. श्रोती, नागपूर (३) वि. ल. खरे नागपूर (४) सौ. अनसूयाबाई काळे, (५) श्रीमंत ताराबाई बुटी,

नागपूर. (६) श्री. आ. रा. देशपांडे, नागपूर (७) श्री. र. गो. ओक, जबलपूर. (८) सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, नागपूर.

विदर्भ साहित्यसंघाचा गृहप्रवेश

ता. ९-७-५१ रोजी सकाळी ७॥ वा. उत्तर अंबाझरी रस्त्यावरील विदर्भ साहित्य संघाच्या प्रशस्त जागेंत गृहप्रवेशाचा समारंभ थाटाने झाला. पुष्करिणीचें जलसंस्करण आणि वृक्षारोपण असा त्रिविध धार्मिक कार्यक्रम आंखलेला होता; व श्री. दामलेगुरुजी यांनी त्याचें पौरोहित्य समग्रज्ञेने केलें. या सभारंभाला श्रीमंत बाबूरावजी देशमुख' श्रीमंत पूर्णचंद्रराव बुटी, श्री ब्रिजलालजी बियाणी, न्या. अण्णासाहेब मंगळमूर्ती डॉ. शिवाजीराव पटवर्धन, सौ. विमलाबाई आणि श्री. बाबासाहेब देशपांडे, सौ. हिराबाई आणि श्री. बाबासाहेब भोसुले, श्री. आ. रा. देशपांडे, श्रीमंत आबासाहेब देशमुख पारवेकर, हैद्राबादचे प्रो. माढेकर, जबलपूरचे श्री. काकासाहेब लेले आणि श्री. बाबुरावजी ओक, संघाचे नागपुरांतील पूर्वाध्यक्ष, निरनिराळ्या समित्यांचे कार्यकर्ते वृतव्यावसायिक आणि सदस्य हजर होते.

सकाळी ७॥ वा. धार्मिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला; व ८। वा. गृहप्रवेश करण्यांत आला. गृहप्रवेशाच्यावेळीं अग्रभागीं हातांत ताम्रकलश घेतलेल्या सौ. कुसुमावती देशपांडे, त्यांच्या दोन्ही बाजूंना हातांत मंगलदीप आणि नैवेद्य घेतलेल्या सौ. विमलाबाई देशपांडे आणि सौ. सिंधुताई जोग, नंतर हातांत सरस्वतीची मूर्ति घेतलेले उपाध्यक्ष श्री. बाबासाहेब देशपांडे, नंतर वि. सा. संघाचे धन चांदीच्या ताटांत घेतलेले कोषाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, या पदाधिकाऱ्यांच्या मागून संघाचे 'उपकर्ते' श्रीमंत बाबुरावजी देशमुख, अकोला अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. ब्रिजलालजी बियाणी, मंदिर-निधि समित्यांचे अध्यक्ष न्या. अण्णासाहेब मंगळमूर्ति व त्यांच्या मागून पूर्वाध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, मंदिरसमितीचे आमंत्रक श्री. नानासाहेब जोग, संघाचे कार्यवाह श्री. माडखोलकर आणि श्री. सगदेव अशी, प्रदक्षिणेची आयोजना करण्यांत आली होती. तदनुसार लोढकुटीला प्रदक्षिणा घातल्यानंतर गृहप्रवेशाचा मुख्य विधी पूर्ण झाला. नंतर सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. हिराबाई भोसुले, सौ. सिंधुताई जोग, सौ. प्रभावती सगदेव प्रभृति भगिनींनी सौ. कुसुमावतीबाईना औक्षण केल्यावर सर्व अभ्यागतांना प्रसाद वाटण्यांत आला. त्यानंतर पुष्करिणीचें जलसंस्करण करण्यांत आलें. नंतर आरती आणि मंत्रपुष्प होऊन सर्व मंडळीना प्रसाद वाटण्यांत आला.

अशा रीतीने मुख्य धार्मिक विधि पूर्ण झाल्यावर सौ. कुसुमावती देशपांडे आणि श्री. सगदेव यांचीं भाषणें झालीं. सौ. कुसुमावतीबाई म्हणाल्या—

"ता. १६ मे १९५१ रोजीं ज्या वेळी विदर्भसाहित्यमंदिराच्या पूर्व तयारीचें हें काम आम्ही हाती घेतलें, त्या वेळी आमच्याजवळ पैसा नव्हता आणि माणसेंहि हाताशीं नव्हतीं. पण, मंदिरसमितीचे आमंत्रक श्री. नानासाहेब जोग यांनी मोठ्या हिंमतीने कामाला प्रारंभ केला आणि विदर्भ साहित्यसंघाचे उपकर्ते श्रीमंत बाबुरावजी देशमुख हे तत्परतेने आमच्या पाठीशी उभे राहिले. बाबुरावजींचें अपरिमित औदार्य आणि नानासाहेबांचें अपरिमित कष्ट यांच्यामुळेच खरोखरी गृहप्रवेशाचा हा मंगल योग आज आला आहे. आमचा पहिला बेत पक्क्या इमारतीच्या कामाला सुरुवात करण्याचा होता. पण, नागपूर इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या द्वीपाच्या

योजना अद्याप पूर्ण झालेल्या नसल्यामुळे आम्हाला ही तात्पुरती लोहकुटी उभारून कार्यालय येथे आणावें लागत आहे. तथापि ता. १५ सप्टेंबरपासून मंदिराच्या मुख्य इमारतीच्या कामाला सुरुवात होणार असून, येत्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर तिचें उद्घाटन करण्याचा आमचा निश्चय आहे. हा आमचा निश्चय तडीस जाणें हें मुख्यतः नागपूरांतील आणि मध्यप्रदेशांतील जनता आणि धनिकवर्ग यांच्या औदार्यावर अवलंबून आहे. आमचे शिल्पविद् श्री. भाईसाहेब करंजगांवकर आणि स्थपति श्री. थेरगांवकर या उभयतांनी परिश्रमपूर्वक मंदिराच्या बांधकामाची योजना आणि तिचें अंदाजपत्रक हीं तयार केलीं. मध्यप्रदेश सरकार आमची योजना लक्षांत घेऊन भरीव देणगी मंदिरनिधीला देईल, अशी आमची अपेक्षा आहे. पण तत्पूर्वी येत्या सप्टेंबरपर्यंत एक लाख रुपये तरी आम्हांला उभे करतां आले पाहिजेत. म्हणून आजच्या या मंगल प्रसंगीं मराठी भाषेविषयी प्रेम आणि आस्था असलेल्या मध्यप्रदेशांतील सर्व वर्गाच्या लोकांना आणि धनिकांना अशी कळकळीची विनंती आहे कीं, मराठी भाषेच्या उत्कर्षाच्या या कार्याला त्यांनी सढळ हाताने मदत करून विदर्भ साहित्यमंदिराच्या रूपाने मराठीचें बलशाली केंद्र या राज्यांत निर्माण करण्याचें आमचें स्वप्न सफल करून दाखवावें!"

श्री. सगदेव यांनी जाहीर केलें कीं "आजच्या या मंगल प्रसंगीं आपणां सर्वांचे आभार मानतांना एक आनंदाची घोषणा मला करावयाची आहे. ती अशी कीं, जबलपूरचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते श्री. काकासाहेब लेले आणि श्री. बाबुरावजी ओक हे दोघे आज या समारंभाला हजर असून विदर्भ साहित्यसंघाचें पुढील अधिवेशन जबलपूरला भरविण्याचें निमंत्रण त्यांनी दिलें आहे."

मंगल वृक्षांचें आरोपण

यानंतर सौ. कुसुमताई देशपांडे यांच्या हस्तें पारिजात, चंपक, बकुल, अशोक आणि आम्र या पांच मंगल वृक्षांचें आरोपण विधिपूर्वक करण्यांत आलें. शेवटी पानसुपारी होऊन हा छोटेखानी वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आटोपला.

★

परीक्षा समिति

माहे जानेवारी १९५१ मध्ये झालेल्या परीक्षांचा अहवाल.

वि. सा. संघातर्फे घेण्यांत आलेल्या जानेवारीच्या परीक्षांना निरनिराळ्या १३ केंद्रांतून एकूण १९५ विद्यार्थी बसले. त्यांपैकी ९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. खाली दिलेल्या केंद्रांच्या नांवापुढे केंद्राधिकारी व त्यांचे सहकारी यांची नांवें दिलीं आहेत. परीक्षासमिति वि. सा. संघातर्फे त्यांची आभारी आहे. संघाने चालविलेल्या या कामांत सर्वांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

परिक्षा दरवर्षी दोनदा म्हणजे जानेवारीच्या व ऑगष्टच्या पहिल्या आठवड्यांत सुरू होतात. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख अनुक्रमें १५ डिसेंबर व १५ जुलै ही असते. त्या त्या ठिकाणच्या उमेदवारांनी येथील केंद्रव्यवस्थापकांच्या तर्फेच आपले अर्ज पाठविणे सोईचें असतें. कोणत्याहि एका परीक्षेसाठी कमीत कमी दहा विद्यार्थी असल्यास त्या त्या ठिकाणी स्वतंत्र केंद्र देण्यांत येतें. सविस्तर माहितीसाठी

सर्व पत्रव्यवहार 'कार्यवाह, परिक्षा समिति, वि. सा. संघ. उत्तर अंबाझरी रस्ता नागपूर नं. १' या पत्त्यावर करावा.

वि. सा. संघातर्फे होणारी साहित्य पारंगत परीक्षा हीच फक्त वर्षातून एकदा म्हणजे ऑगस्ट मध्ये होत असते.

केंद्रव्यवस्थापक

(१) अमरावती—श्री. द. शं. फडके.

(२) अकोला —श्री. प्र. ना. खोडे, श्री. दिक्षित, शिक्षक, न्यू. इं. हायस्कूल.

(३) आर्वी —श्री, रा. य. सूर्यकर, श्री. न. रा. फाले, श्री. या. बे. हणवंते आणि श्री. ह. ध. सगणे.

(४) चांदा —श्री. तु. ना. काटकर, श्री. ल. सी. डोंगे, आणि श्री. ओंकार ढेमे.

(५) जबलपूर —सौ. मनोरमाबाई नावलेकर, सौ. उषाबाई नावलेकर आणि सौ. विद्याबाई चिटणीस.

(६) दारव्हा —श्री. कृ. आ. पाठक, रा. श्री. म. जिर्गे व श्री. कृ. भा. लिमये हेडमास्तर, एडेड हायस्कूल.

(७) नागपूर —प्रा. पां. कृ. सावळापूरकर, आणि सौ. सुशीलाबाई सावळापूरकर.

(८) नांदुरा —श्री. म. के. राजूरकर

(९) भंडारा —श्री. ना. ल. पोतदार आणि श्री. गोडबोले.

(१०) यवतमाळ—श्री. शं. द. मेलग; श्री. म. के. उपाध्ये, शिक्षक, सरकारी हायस्कूल; श्री. देशमुख, शिक्षक, श्री शिवाजी हायस्कूल; सुपरिंटेंडेंड, नॉर्मलस्कूल आणि मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल.

(११) वरूड —श्री. [illegible] ग. टाकोडे, श्री. जी. आर. पवार आणि एम्. जी. देशमुख.

(१२) वर्धा —श्री. व. पं. तांदळे, श्री. भाऊ मांडवकर आणि श्री. म. ता. राजूरकर.

(१३) साकोली —श्री. द. ना. हुद्दार, श्री. प्र. ना. चन्ने आणि श्री. वी. जे. मार्डीकर.

खालील सद्गृहस्थांनी परीक्षक म्हणून काम केलें त्याबद्दलहि परीक्षा समिती वि. सा. संघातर्फे आभारी आहे—

प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. म. ना. अदवंत, प्रा. भ. श्री. पंडित, प्रिं. ह. ना. नेने, प्रा. अ. ना. देशपांडे, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, श्री. रा. पु. सगदेव आणि सौ. उषाताई कोलते.

उत्तर अंबाझरी रस्ता,
नागपूर नं. १
ता. १ जुलै १९५१

रा. पु. सगदेव,
कार्यवाह,
परीक्षा समिती–वि. सा, संघ,

राजभाषा अधिनियम

MADHYA PRADESH ACT No. XXIV OF 1950

THE MADHYA PRADESH OFFICIAL LANGUAGES ACT, 1950

(Received the assent of the Governor on the 27th October 1950; assent first published in the *Madhya Pradesh Gazette*, on the 3rd November 1950.)

An Act to declare the official language for the State of Madhya Pradesh.

Preamble.

WHEREAS it is expedient to provide for the adoption of Hindi and Marathi as languages to be used for the official purposes of the State of Madhya Pradesh.

It is hereby enacted as follows :—

Short title and extent.

1. (1) This Act may be cited as the Madhya Pradesh Official languages Act, 1950.

(2) It extends to the whole of Madhya Pradesh.

Definitions.

2. In this Act, unless there is anything repugnant in the subject or context, "Hindi" means Hindi with Deonagari as its script and "Marathi" means Marathi with Balbodh as its script.

Official Languages for official purposes of State.

3. (1) Subject as hereinafter provided, Hindi and Marathi shall be the official languages of the State for all purposes.

(2) The State Government may, by notification, direct that in any specified area and with effect from any specified date Hindi or Marathi or both shall be used in respect of such official purposes as may be specified in the notification.

Language to be used in Bill etc.

4. The Language to be used in :—

(a) All Bills to be introduced or amendments thereto to be moved in the State Legislative Assembly;


(b) all Acts passed by the State Legislative Assembly;

(c) all Ordinances promulgated under Article 213 of the Constitution of India;

(d) all Orders, rules, regulations and byelaws issued by the State Government under the Constitution of India or under any law made by Parliament or the Legislature of the State;


shall, on and from such date as the State Government may in respect of each of the items aforesaid appoint by notification, be Hindi.

विदर्भ साहित्य मंदिराचा गृहप्रवेश
(९ जुलै १९५१)



सौ. कुसुमावती देशपांडे, सौ. विमलाबाई देशपांडे, श्री. पु. य. देशपांडे, श्री. बाळासाहेब ढवळे, मा. ब्रिजलाल बियाणी, प्रा. श्री. ना. बनहट्टी, श्रीमंत बाबुरावजी देशमुख, डॉ. मा. गो. देशमुख.

★



मा. ब्रिजलाल बियाणी, श्रीमंत बाबुरावजी देशमुख, सौ. कुसुमावती देशपांडे, (मागे) श्री. रा. पु. सगदेव, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. पु. य. देशपांडे.

अनुक्रमणिका

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

द्वैमासिक, ऑगस्ट १९५१

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

(१) विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें

(२) वि. सा. संघाच्या परिक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

(३) वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

(४) वि. सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

(५) वि. सा. संघाल[illegible]ठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करत[illegible]ाटी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी प्रेमी जनतेने तन-मनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तीत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक : प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका